वर्ष १ अंक ४

# अंगारमळा

डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी २०१८

युगात्मा जयंती उत्सव
उपोषणाने साजरा




## सरसकट कर्जमुक्तीच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी केले राज्यभर उपोषण

युगात्मा शरद जोशींवर श्रद्धा आणि विचारावर निष्ठा असणाऱ्यांचा युगात्मा परिवार

# युगात्मा परिवार मोबाईल ॲप




* युगात्मा परिवार मोबाईल ॲप web बेस पायावर आधारीत असल्याने वापरकर्त्याच्या मोबाईलमधील मेमरीचा उपयोग करत नाही.
* त्यामुळे हे App क्लिन करण्याची गरज नाही.
* मोबाईल Hang होणार नाही.
* युगात्मा परिवार मोबाईल ॲप गुगल प्ले स्टोअर (Google Play) उपलब्ध करून देण्यात आले आहे.
* डाउनलोड करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा. >>>

https://play.google.com/store/apps/details?id=com.andromo.dev633912.app614211

Play Store

युगात्मा परिवार मोबाईल ॲप डाऊनलोड करण्यासाठी आपल्या मोबाईलवरिल Play Store वर क्लिक करा.

सर्च मध्ये Yugatma Pariwar टाईप करा.

इन्स्टॉल करा.

## Screen Shot



# अंगारमळा

**Title Code :** MAHMAR47450

**वर्ष १ । अंक ४ । २ डिसेंबर २०१७**

**मूल्य : रु. ५०**

**अंगारमळा** हे त्रैमासिक मालक, संपादक, मुद्रक, प्रकाशक, गंगाधर मुटे यांनी त्रिवेणी ऑफसेट वर्क्स, प्रयाग ३१२, दक्षिणामुर्ती चौक, महाल, नागपूर-४४००३२ येथे छापून, मु.पो. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा-४४२३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

संपादक
**गंगाधर मुटे**

अंक मांडणी
**प्रकाश बोपीनवार**

वार्षिक वर्गणी : रु. १५० केवळ
संपर्क :
**अंगारमळा**
**मु.पो. आर्वी (छोटी)**
**ता. हिंगणघाट, जि. वर्धा**
**पीन कोड - ४४२ ३०७**
Email : angarmala2016@gmail.com
Mob. 9730582004, 9730786004

**ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी :**
Angarmala
Punjab National Bank
Branch Hinganghat (Wardha)
A/c No. 0202002100027538
IFS Code : PUNB0020200

अंकातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**Title Code :** MAHMAR47450

## अंतरंग

अनुक्रमणिका ........ १
संपादकीय ........ २
चौथे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन, मुंबई ........ ३
युगात्मा जयंती उत्सव उपोषणाने साजरा (कव्हरस्टोरी) ....... अंगारमळा ब्युरो ........ ४
स्वराज्य आंदोलनातील विविध प्रवाह ........ शरद जोशी ........ ८
शेतमालाच्या किमान आधारभूत किमती ........ ११
पुन्हा एकदा उत्तम शेती ........ शाम पवार ........ १२
भारतीय सणांचे अनर्थशास्त्र ........ गंगाधर मुटे ........ २३
शेतमाल - महागाईची परिभाषा व ग्राहकांची मानसिकता .... सतीश देशमुख ........ २६
शेतकऱ्यांची फसवणूक करणारी स्वामिनाथन यांची शिफारस अमर हबीब ........ २८
हिंदु जातिप्रथा और ब्राह्मणों की निंदा ........ एड. दिनेश शर्मा ........ २९
शिक्षणव्यवस्थेची प्रचलित रचना मोडायलाच हवी ........ हेरंब कुलकर्णी ........ ३१
शेतकरी पुत्रांचा स्वाभिमान ........ पंकज गायकवाड ........ ३३
सुगीचा सण : दिवाळी ........ प्रज्ञा बापट ........ ३४
सुकाणू समितीची बैठक (अनुभवाचे बोलके बोल) ........ पंकज गायकवाड ........ ३६
शेतकरी आंदोलकांची शीरगणती ........ ३६
शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे करणार? (अंतराची आंदोलने) ऍड प्रकाश पाटील ...... ३७
भास्करराव बोरावके यांना भावपूर्ण श्रद्धांजली, शोकसंवेदना ........ ३८
कार्यकर्त्यांचे ''भाऊ'' भास्करभाऊ ........ ॲड. अनंत उमरीकर .... ३९
सचित्र वृत्तांत ........ ४४
वीज तोडणी : शेतकऱ्यांनी संघटित विरोध करावा ........ अनिल घनवट ........ ४५
शेतकरी संघटना वृत्त
भाजप व काँग्रेस कार्यकर्त्यांचा शेतकरी संघटनेत प्रवेश ...... रत्नाकर चटप ........ ४५
संक्षिप्त वृत्त ........ ४६
ऊस परिषद सांगली, सांगली ऊस परिषदेचे ठराव ........ ४७

**- संपर्क प्रतिनिधी -**

⌘ **श्री. रामेश्वर अवचार**, विशेष प्रतिनिधी, मो. ९९६०३३३४३७ ⌘ **श्री. अभिमन्यु शेलार**, पुणे, मो. ९५६१५६५६२५ ⌘ **प्रा. भुपेश मुडे**, मुंबई, मो. ९२२३५३८०३० ⌘ **श्री. निवृत्ती करडक**, नाशिक, मो. ९३७१२५९५४५ ⌘ **श्री. कडुआप्पा पाटील**, धुळे, मो. ९३७१२७२७८१ ⌘ **श्री. रमेश खांडेभराड**, जालना, मो. ९४२१३२३६१३ ⌘ **श्री. मदन सोमवंशी**, लातूर, मो. ९७६४०६१८७७ ⌘ **श्री. सतीष देशमुख**, अकोला, मो. ९६०४९१२३५१ ⌘ **श्री. राजु झोटींग**, यवतमाळ, मो. ९६७३३४६६३५ ⌘ **श्री. शालीक पाटील नाकाडे**, गडचिरोली, मो. ९४०४२२०४३९ ⌘ **श्री. धोंडबा गावंडे**, वर्धा, मो. ९४२००६२८७६ ⌘ **श्री. दिलीप भोयर**, अमरावती, मो. ९४२००७४८८४ ⌘ **श्री. दगडूजी शेळके**, जळगांव, मो. ७७१९९६१०२५ ⌘ **श्री. शरद ठाकर**, परभणी, मो. ८२७५३३६६७५

# संपादकीय....

**त्रैमासिक अंगारमळा आता मासिक स्वरूपात!**

अंगारमळ्याचा वर्षाचा शेवटचा अंक वाचकांच्या हाती सुपूर्द करताना अतीव आनंद होत आहे. जेमतेम पाचच अंक काढल्याने अत्यानंद होऊन हुरळून जाण्याइतपत काय आहे, असा अनेकांना प्रश्न पडणे अगदीच स्वाभाविक आहे. एखादे त्रैमासिकच काय अगदी दैनिक नियतकालिक सुद्धा प्रकाशित करून ते यशस्वीपणे चालवण्याची आपल्या देशालाच तशी थोर परंपरा आहे. दिल्ली पासून थेट गल्लीपर्यंत हजारो नव्हे लक्षावधी नियतकालिके प्रकाशित करून ती यशस्वीपणे चालवली जात आहे. तरीही मग यात हुरळून जाण्यासारखे काय आहे? असा प्रश्न कुणाला पडला तर तो नक्कीच चुकीचा नाही.

शेतकरी संघटना म्हणजे ऐतिहासिक देदीप्यमान शेतकरी चळवळ. सदस्य नोंदणी केली असती तर सदस्यसंख्या काही कोटी संख्येच्यावर गेली असती. ज्या संघटनेला खिशातील पैसे खर्च करून कार्य करणाऱ्या पाईकांच्या रूपाने अमाप लोकाश्रय आणि तोही तब्बल तीन तपाएवढा प्रदीर्घ काळ लाभला, त्या संघटनेला मात्र सर्वोच्च नेतृत्वाची प्रबळ इच्छा असूनही एखादे दैनिक वृत्तपत्र किंवा निदान साप्ताहिक तरी चालवता आलेले नाही. का आले नाही, त्या कारणांचा इथे मी उहापोह करणार नाही, पण संक्षिप्तरूपात ठामपणे एवढ्या निष्कर्षापर्यंत सहज पोचता येते की, शेतकरी संघटनेसारख्या विचाराधिष्ठित, तर्कशुद्ध, तर्ककर्कश व सैद्धांतिक मूल्यांशी तडजोडीस वाव नसलेल्या कर्तव्यकठोर आर्थिक चळवळीला सांप्रतकाळात एखादे नियतकालिक चालवणे जवळजवळ अशक्यप्राय आहे. १९८६ पासून शेतकरी संघटक, नंतर आठवड्याचा ग्यानबा परत पुन्हा ''शेतकरी संघटक''. प्रकाशनस्थळांचा विचार केला तर आंबेठाण. तेथून नासिक, त्यानंतर पुणे, परत आंबेठाण आणि आंबेठाणवरून औरंगाबाद. या सर्व प्रवासाचा मी जवळूनचा साक्षीदार आणि सहभागी सहकलाकारही आहे. प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे सारखे ऋषितुल्य संपादक शेतकरी संघटकला मिळाले म्हणून काही काळ तरी संघटक चालू शकला. नाही तर शेतकरी संघटक हा विषय कधीचाच संपुष्टात आला असता.

सर्व अडथळे पार करून नियतकालिक चालवायचे म्हटले तरी त्यानंतर आणखी एक प्रश्न पुढ्यात आ वासून उभा राहतो, तो म्हणजे वाचकांचा. सद्यस्थितीत पैसे खर्च करून वाचणारा जो वाचकवर्ग आहे त्याला रुचेल असे लिहायचे म्हटले तर मूळ उद्देशालाच तडा जातो. त्यामुळे त्यांच्या अभिरुचीला रुचेल असे लिहिण्याचे प्रयोजन उरत नाही. ज्यांच्यासाठी लिहायचे असते ते वाचायला तयार नाहीत. मुळात भारतातील शेतकरी मुकाच आहे. तो बोलत नाही, वाचत नाही आणि लिहीतही नाही. त्याच अर्थाने शेतकर्‍यांची संघटनाही निरक्षर असते. त्यांच्या कार्याची दखल बेदखल असते. आम्ही फक्त इतिहास घडवू, इतिहास लिहिणारे लिहीत बसतील हा शेतकरी संघटनेच्या पाईकांचा बाणेदारपणा शूरत्वाला साजेलसा निःसंशय आहे पण यात दस्तावेज जतन करण्याकडे दुर्लक्ष होते, ही अक्षम्य घोडचूक आहे, हे लक्षात घेणेही अत्यंत निकडीचे आहे. मागे एकदा वर्ध्याच्या भाषणात युगात्मा शरद जोशी म्हणाले होते की, ''संघटनेचा कार्यकर्ता वाचक नाही. ही तशी निरक्षर लोकांची संघटना आहे. जेव्हा जुन्या काळी शेतकरी संघटक निघायचा त्याला पिन असायची, ती पिनही न काढताच 'आमच्या घरी फार पूर्वी पासून शेतकरी संघटक सुरू आहे' असे सांगायची. तो उघडायचा नाही, वाचायचा नाही, त्यात एखादा चांगला लेख आला तर त्याच्याबद्दल पत्र वगैरे टाकून कळवलं आहे, असं कधी झालं नाही. पण आमच्याकडे पहिल्यापासूनचे सगळेच अंक आहे असं मात्र आवर्जून सांगायची.

पण पिढ्यानपिढ्याच्या अबोलतेला बोलते करून लिहिते वाचते करणे, हे आव्हानात्मक कार्य असले तरी आपल्यासाठी तितकेच आनंददायीही ठरत असते. याच आनंदप्राप्तीच्या मोहापायी पुन्हा एक पाऊल पुढे टाकण्याचे आपण धाडस करूया.

त्रैमासिकाला मासिकात रूपांतरित करण्याच्या कामाला लागूयात आणि या कामात सर्वांचे यथाशक्ती सहकार्य लाभावे, अशी सामूहिक प्रार्थनाही करूयात!

# चौथे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन, मुंबई

**दिनांक : बुधवार, ३१ जानेवारी २०१८ स्थळ : रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, दादर, मुंबई**

**ऑनलाईन अग्रिम प्रतिनिधी नोंदणी (Advance Booking)**

**प्रतिनिधी सहभाग शुल्क : शुल्काची रक्कम इच्छेनुसार पण अनिवार्य**

**प्रतिनिधी सहभाग नोंदणीची पद्धत :**

- सभागृहाची आसन क्षमता लक्षात घेता गैरसोय होऊ नये म्हणून आपली जागा अग्रिम आरक्षित करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.
- प्रतिनिधी सहभाग शुल्क म्हणून स्वेच्छेने यथाशक्ती शुल्काची रक्कम अदा करणे अनिवार्य आहे. भरलेल्या रकमेची रीतसर पावती संमेलनस्थळी किट मध्ये दिली जाईल.
- एक ते पाच प्रतिनिधी सहभाग शुल्क सामूहिकपणे भरुन एकत्रितपणे ऑनलाईन नोंदणी करू शकतात.
- प्रतिनिधींना २ वेळ भोजन, २ वेळ चहा, अल्पोपहार, माहिती किट आणि सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
- ऑनलाईन अग्रीम नोंदणी केल्यानंतर SMS द्वारे किंवा दूरध्वनीद्वारे प्रतिनिधीला नोंदणी क्रमांक ७२ तासाचे आत कळवला जाईल.
- निवासाची व्यवस्था करणे शक्य न झाल्याने दिलगीर आहोत.
- पुरेशी नोंदणी झाल्याबरोबर कोणत्याही क्षणी नोंदणी बंद केली जाईल. पूर्वसूचना देणे शक्य होणार नाही.
- झालेल्या नोंदणीमधूनच परिसंवादातील वक्ते, कवी आणि गझलकार निवडले जातील.
- नोंदणी झालेल्या सर्व वक्ते, कवी आणि गझलकार यांना व्यासपीठावर संधी मिळेलच असे नाही, याची नोंद घ्यावी.
- कोणत्याही सबबीखाली नोंदणीची रक्कम परत मिळणार नाही.
- **महत्वाची सूचना :** नाव शक्यतो मराठीतच लिहावे, जेणेकरून प्रमाणपत्रावर नाव चुकीचे येणार नाही.

**प्रतिनिधी सहभाग शुल्क कसे भरावे :**

**पर्याय क्र. १ : ऑनलाईन किंवा थेट शुल्क खालील खात्यात जमा करावे.**

Punjab National Bank
Branch - Hinganghat
/c Name SHETI RTH PRBODHINI
/c No 0202000105179647
IFSC Code - PUNB0020200
MICR Code - 442024005

✻ ✻ ✻ ✻

**पर्याय क्र. २ : खालील पत्त्यावर मनीऑर्डर करावा.**

शेती अर्थ प्रबोधिनी
मु.पो. आर्वी छोटी. ता. हिंगणघाट जि. वर्धा. पिन - ४४२३०७

मनीऑर्डर फॉर्मवर प्रतिनिधीने स्वतःचा पूर्ण पत्ता आणि मोबाईल नं. लिहिणे आवश्यक.

✻ ✻ ✻ ✻

**ऑनलाईन नोंदणी :**

शुल्क भरून झाले की, Transaction No/Refference No / मनिऑर्डर किंवा पावतीचा नंबर हाती ठेऊन ऑनलाईन नोंदणीसाठी http://www.baliraja.com/node/add/rep2018 या लिंकवर फॉर्ममध्ये माहिती भरून प्रकाशित करावे.

**टीप :** ऑनलाईन नोंदणीचा फॉर्म भरण्यापूर्वी LOG IN (www.baliraja.com चे सदस्य नसणाऱ्यांनी SIGN IN व नंतर LOG IN) करून नोंदणी केल्यास त्यांना त्यांची नोंदणी www.baliraja.com/rep-18b या लिंकवर पाहता येईल.

✻ ✻ ✻ ✻

**पर्याय क्र. ३ : ईमेल द्वारे प्रतिनिधी नोंदणी**

पर्याय १ किंवा २ प्रमाणे सहभाग शुल्क भरून झाले की abmsss2015gmail.com या ईमेलवर खालीलप्रमाणे माहिती भरून ईमेल करावा.

ईमेलच्या विषयात ''अग्रिम प्रतिनिधी नोंदणी'' लिहिणे आवश्यक आहे.

१. पूर्ण नाव (शक्यतो मराठी):
२. पूर्ण पत्ता :
३. तालुका :
४. जिल्हा :
५. स्त्री/पुरुष :
६. वय :
७. ईमेल :
८. मोबाईल नंबर :
९. भरलेले प्रतिनिधी सहभाग शुल्क रुपये :
१०. Txn/Ref/Rcpt No :
११. शुल्क भरण्यासाठी वापरलेला पर्याय :
१२. शुल्क भरल्याचा दिनांक :

आपल्या सर्वांच्या सहकार्याच्या अपेक्षेत!

आपला स्नेहांकित
**गंगाधर मुटे**
**कार्याध्यक्ष**
**४ थे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन, मुंबई**

# युगात्मा जयंती उत्सव उपोषणाने साजरा..!

## कव्हरस्टोरी

**सरसकट कर्जमुक्तीच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी केले राज्यभर उपोषण**

महाराष्ट्र सरकारने कर्जमाफीच्या नावाखाली निकषांची चाळणी लावून शेतकऱ्यांसोबत पोरखेळ सुरु केला असून शेतकर्यांकना कर्ज माफी नव्हे तर कर्जमुक्ती द्यायची आहे अशा आशयाची वेळोवेळी वक्तव्ये करणाऱ्या मुख्यमंत्री मा. फडणवीसांनी प्रत्यक्षात मात्र कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांची घोर फसवणूकच केलेली आहे. त्याच्या निषेधार्थ ३ सप्टेंबरला युगात्मा शरद जोशी यांच्या ८२ व्या जन्मदिवशी वर्धा येथील शास्त्री पुतळ्याजवळील बच्छराज भवन मध्ये सामुहिक उपोषण आंदोलन करण्यात आले.

देशातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती झाल्याशिवाय मी डोळे मिटणार नाही असे शरद जोशी नेहमी म्हणायचे पण क्रूर नियतीने अवेळीच डाव साधला आणि त्यांचे स्वप्न अधुरे राहून गेले. युगात्मा शरद जोशींच्या ८२ व्या जन्मदिवसाचे निमित्त साधून राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्त करून सर्व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणारी कर्जमुक्ती जाहिर करण्यास राज्यसरकारला भाग पाडण्यासाठी एक दिवसाचे उपोषण करून शरद जोशींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शेतकऱ्यांवरील सर्व कर्जे अनैतिकच असल्याने विनाअट, विनानिकष सातबारा पूर्णपणे कोरा करा, वीज बिलातून शेतकऱ्यांची पूर्णतः मुक्तता करा, शेतीमालाचे भाव पाडण्यासाठी निर्यात शुल्क वाढवणे, निर्यातीवर बंदी अथवा निर्बंध लादणे, चढ्या दराने परदेशातून शेतमालाची आयात करणे, आंतरराज्य वाहतुकीवर बंदी घालणे, व्यापारी साठ्यांवर मर्यादा घालणे, विक्री किमतीवर मर्यादा घालणे आदी उपाय कायमस्वरूपी बंद करा, शेतीला जाचक ठरणारे कायदे रद्द करा, शरद जोशी प्रणीत मार्शल प्लान (भारत उत्थान कार्यक्रम) लागू करा आदी मागण्यांच्या पूर्ततेसाठी हे सामुहिक उपोषण करण्यात आले.

***

**आंबेठाण :** युगात्मा शरद जोशी यांच्या कर्मभूमीत सौ. सरोजताई काशीकर, अनिल चव्हाण, अभिमन्यू शेलार, शरद गद्रे, सीमा नरोडे, सुरज काळे, कान्ताभाऊ लोणारी, वसंत लोणारी, गजानन गांडेकर, हनुमंत दवणे यांचेसहित कार्यकर्त्यांनी एक दिवसाचे उपोषण केले.




**वर्धा :** सकाळी ८ वाजता शरद जोशींच्या प्रतिमेला रविभाऊ काशीकर यांचे हस्ते पुष्पमाला अर्पण करून उपोषणाला सुरुवात झाली. याप्रसंगी संपन्न झालेल्या सभेला शेतकरी संघटना ट्रस्टचे अध्यक्ष रवी काशीकर, जिल्हाध्यक्ष गंगाधर मुटे, शैलजा देशपांडे, मधुसूदन हरणे, सतीश दाणी, मोहनराव देशमुख, पांडुरंग भालशंकर, नीलकंठ घवघवे, नंदुभाऊ काळे, अरविंद बोरकर, मन्साराम कोल्हे, प्रकाश ढोक, खुशाल हिवरकर, माणिकराव उघडे, हेमराज इखार, रेखा हरणे, विजय बढे, संध्या राउत, प्रीती घवघवे, जीवन गुरनुले आदींनी मार्गदर्शन केले तसेच दत्ता राउत, विवेक मुटे, अरविंद राउत, गणेश मुटे यांनी गायलेल्या शेतकरी गीतांना प्रेक्षकांनी उत्फुर्तपणे दाद दिली.

****





**परभणी :** शेतकऱ्यांचे पंचप्राण शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त सोनपेठ तालुक्यातील वडगाव स्टे,कोठाळा,नरवाडी, सोनपेठ,वाडी पिंपळगाव,थडी उक्कडगाव,शेळगाव,कान्हेगाव, बोरी, ढेंगळी पिंपळगाव, मानोली, धनेगाव, दिग्रस, झोडगाव, गोगलगाव, खरबा, तिडी पिंपळगाव, देवळगाव, डासाळा येथे शेतकरी उपवास आंदोलन करण्यात आले. श्री गोविंद जोशी, गजानन देशमुख, सुधीर बिंदू, माधव जाधव, रामकिशन भांबट, अनंत पवार, रामेश्वर बावरकर, राजाभाऊ गोरे, विश्वनाथ देशमुख, पांडुरंग लांडगे, उत्तम जीवने, गोपाळराव देशमुख, दगडूबा वजीर, सोमनाथ नागुरे, अमरदीप नागुरे, पंडितअण्णा भोसले, माणिकराव काळे, अण्णा जोगदंड, भागवत बचाटे, रमेश मोकाशे, खंडेराव घुमरे, रामभाऊ शिंदे, प्रल्हाद बरसाले, शिवाजी पाटील, संपत कटारे यांचे सहीत हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

****



**नागपूर :** नरखेड तालुका शेतकरीसंघटनेच्या वतीने १९८५पासुन युगात्मा शरद जोशींचा वाढदिवस साजरा केल्या जातो. उपोषणाला राम नेवले,मदनकामडे, अरविंद देशमुख, अरुण केदार, वसंत वैद्य, रामचंद्र बहरुपी, शेषराव हरणे, ढोकणे प्रकाशचरडे यांचेसहित१५०शेतकरी हजरहोते.

****

**सांगली :** जिल्हा कार्यालय येथे शरद जोशी यांच्या जयंती निमित्त लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

****







**जालना :** गांधी चमन जुना जालना,घोडेगाव, वलखेड, पिरकल्यान, निरखेडा येथे शेतकऱ्याचे पंचप्राण शरद जोशी यांची जंयती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सौ गीताताई खांडेभराड, पुजाराम तात्या, गंगाताई जाधव,रमेश खांडेभराड, गजानन पाटील भाडवले,संरपच गणपतराव खांडेभराड,उपसंरपंच तुकाराम खांडेभराड,भरत खांडेभराड, रामभाऊ मोहिते, दामोधर


खांडेभराड, ज्ञानदेव खांडेभराड, मारोती खांडेभराडइत्यादी शेतकरी उपस्थीत होते.

****

**नाशिक :** येवला, धुळगाव व अन्य ठिकाणी शरद जोशी यांची जंयती उपोषण करून साजरी करण्यात आली.या प्रसंगी शेतकरी संघटनेचे जनक शरद जोशी यांच्या जीवन कार्यावरसंध्याताई पगारे, जाफरभाई पठाण, शाहीर चंद्रभान बोराडे, बापूसाहेब पगारे, एकनाथ गायकवाड, योगेश सोमवंशी, बाळासाहेब गायकवाड,सुभाष सोनवणे,अरूण जाधव, योगेश गायकवाड, प्रभाकर भोसले, बापूसाहेब गायकवाड, राजेंद्र जाधव, भिमराज गायकवाड, दत्तु पाटील सोनवणे, वाल्मिक गायकवाड, परशराम सोनवणेइत्यादी वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

****








## शून्यातून विश्व

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम –**

वडील नावाडी होते. विद्यार्थीदशेत असताना ते वर्तमानपत्र विकत होते. ते शास्त्रज्ञ झाले व नंतर राष्ट्रपती झाले.



अकोट.




मुर्तीजापूर जि. अकोला




जिल्हा धुळे




अकोला


## शून्यातून विश्व

**शेक्सपिअर –**

वडील खाटीकखान्यात नोकरी करत होते रात्री नाट्यगृहाच्या आवारात घोडागाडी सांभाळता सांभाळता एका नाटककाराचा जन्म झाला.

# स्वराज्य आंदोलनातील विविध प्रवाह

युगात्मा शरद जोशी



गांधीजी आणि काँग्रेस यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याचा लढा झाला हे खरे. परंतु स्वातंत्र्याच्या लढ्यात दुसरे काही प्रवाहच नव्हते आणि सर्व वर्ग जातींचे यच्चयावत् समाज गांधीप्रणित काँग्रेसच्या झेंड्याखाली लढ्यात ठाकले होते असे म्हणण्यास काही ऐतिहासिक आधार नाही. पारतंत्र्य, गुलामी ही लाजिरवाणी, अपमानास्पद गोष्ट आहे; आपल्या देशावर लांबून आलेल्या परकीयांचे राज्य असावे ही काही फारशी स्पृहणीय गोष्ट नाही; राजकीय दास्यामुळे देशाचे आर्थिक शोषण होत आहे आणि देश कंगाल बनत चालला आहे. स्थूलमानाने एवढ्याच विषयावर सगळ्या देशात सहमती होती. पण स्वातंत्र्यालढ्याची उद्दिष्टे काय, साधने काय, कार्यक्रम काय, वेळापत्रक काय याबद्दल स्वातंत्र्याच्या चळवळीत मतप्रवाह होते.

**ही भटांची पोरे विनाकारण शुद्रातिशुद्र मुलांच्या मनांत इंग्रजांविषयी अप्रीती निर्माण करून, त्यांच्या हाती पिस्तुल-बॉब देऊन त्यांना चुकीच्या मार्गास लावतात, अशा मार्गानी स्वराज्य मिळणे नाही आणि मिळाले तरी तो जुन्या पेशवाईचा नवा अवतार असेल, त्यात बहुजन समाजाला विकासाचे आणि प्रगतीचे मार्ग बंदच राहतील अशी बहुजनसमाजाच्या धुरीणांची स्पष्ट भूमिका होती.**

**जहाल 'राष्ट्रीय'**

इंग्रजाचे वर्चस्व सर्व देशभर प्रस्थापित झाल्यानंतर सार्वभौमत्व गमावलेले संस्थानिक, नव्या सरकारी न्याय महसूल व्यवस्थेने बांधले गेलेले जहागीरदार, जमीनदार, कायद्याचे राज्य तयार झाल्यामुळे नाखूष झालेले ठग आणि पिंढारी, थोडक्यात इंग्रज येण्यापूर्वी ज्यांचा अंमल देशावर चालला होता असे सर्व घटक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली सरदारदरकदार जातिबांधवे आणि आश्रित मंडळी यांची इंग्रजविरोधी भावना अत्यंत तीव्र होती. इंग्रज आल्यामुळे आपल्या हातातील सत्ता गेली याचे त्यांना परमदु:ख होते आणि इंग्रजांना कोणत्या का प्रकाराने होईना, देशातून काढून लावता आले तर, राजकीय सत्तेचा वारसा पेलू शकणारे या देशात दुसरे कोणीच नसल्यामुळे आपणच पुन्हा सर्वसत्ताधीश बनू अशी त्यांना मोठी आशा होती. देश गुलाम का झाला? समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान या सर्वच क्षेत्रांत आपण इतके मागासलेले का राहिलो? हे प्रश्नही त्यांना अप्रस्तुत वाटत होते. आपण सर्वार्थाने सर्वच दृष्टींनी श्रेष्ठ, सदाकाळ श्रेष्ठ होतो आणि आहोत; केवळ दुर्भाग्याने किंवा चक्रनेमिक्रमाने आपल्याला वाईट दिवस आले आहेत; इंग्रज येथून निघून गेले की सर्व दुर्भाग्य संपेल अशी या मंडळींची बुद्धी.

१८५७ च्या बंडाचा उठाव प्रामुख्याने या समाजाने केला. बंडाला सर्वसाधारण जनतेचा पाठिंबा तर नाहीच, सहानुभूतीदेखील नव्हती. त्यामुळे, या सरंजामी लोकांचीही एकजूट होऊ शकली नाही. इंग्रजांना काढून लावले तर नंतर आपल्या पैकी कोणाच्या हाती जाईल, काय सांगावे? त्यापेक्षा, 'खाविंद चरणाविंदी मिलिंदायमान' होण्याचा मार्ग अनेकांना प्रशस्त आणि श्रेयस्कर वाटला. सहाजिकच, बंडाचा बीमोड झाला. पण, या बंडाचा धसका इंग्रजांनी इतका जबरदस्त घेतला की भारतीय समाजव्यवस्थेत हस्तक्षेप न करण्याचे आश्वासन खुद्द राणीच्या जाहिरनाम्याने दिले. कंपनी सरकारने दलित आणि मागासवर्गीय जातींना प्रोत्साहन देऊन ब्राह्मण आणि क्षेत्रिय वर्गांचे वर्चस्व जाणीवपूर्वक कमी करण्याचे धोरण चालवले होते 'सती' सारख्या प्रथा मोडून काढण्यात कंपनी सरकार व तिचे अधिकारी मोठ्या उत्साहाने जुटत. राणीच्या जाहिरनाम्याने ते धोरण संपवून फक्त तटस्थ तत्त्व लागू झाले. देशातील समाजव्यवस्थेत मागासवर्गीयांना उठून उभे राहता येईल इतकीही ढवळाढवळ न करण्याचे ठरले म्हणजे जुन्या सवर्णांना आणि धनदांडग्यांना रानच खुले झाले. इंग्रजी अंमल परंपरागत समाजव्यवस्थेच्या उतरंडीला अनुसरूनच म्हणजे सवर्णांच्या माध्यमातूनच होणार होता. दोनचार पुस्तकांचा अभ्यास करून इंग्रजी अंमलाखाली नोकरदारी गाजवण्याची शक्यता तयार झाली. मुंबई - कलकत्यासारख्या शहरात नव्याने सुरू झालेल्या व्यापार, गिरण्या यांनीही काहींना सामावून घेतले. इंग्रजी राज्यात मिळालेल्या या फायद्यांनी समाधान न झालेले असेही अनेक होते. या असंतुष्ट सवर्ण समाजातूनच बॉब-पिस्तुल यांचे पंथ निघाले. समाजसुधारणेला हात न लावता राजकीय सत्तेचाच पाठपुरावा करण्याचा आग्रह धरणारे जहालपंथी याच परंपरेतले. अर्थकारण, समाजकारण सर्व बाजूला ठेवून राष्ट्रवादाचा उदोउदो करावा व या घोषांनी बहुजन समाजाला त्यांच्यावरील अन्यायाचा आणि शोषणाचा विसर पाडावा अशी राष्ट्रवादी परंपराही याच प्रवाहातून पुढे प्रकटली. आर्यसमाज, विवेकानंद, हेडगेवार, हिंदुमहासभा, जनसंघ आणि अलिकडची भारतीय जनता पार्टी व शिवसेना, विश्व हिंदु परिषद इत्यादी याच सरंजामी जहाल राष्ट्रवादी परंपरेतील पिलावळ.

इंग्रजी अमलाचा जाच होणारा आणखी एक वर्ग होता. इंग्रजी अमलात इंग्रजी शिक्षणाचा, तंत्रज्ञानाचा, व्यापार-व्यवस्थेचा, कारखानदारीचा फायदा घेऊन आपले बस्तान ठाकठीक बसवलेला एक मोठा वजनदार समाज मुंबई, कलकत्ता, मद्रास अशा मोठमोठ्या शहरात उदयास येत होता. इंग्रजी राज्य नष्ट व्हावे, इंग्रजांनी संपूर्ण स्वराज्य देऊन या देशातून चालते व्हावे हे संभव नाही, फारसे आपल्या हिताचेही नाही. इंग्रजी राज्य हे एक वरदान आहे. त्यामुळे देशात शांतता, सुव्यवस्था, न्याय, व्यापारउदीम यांचे राज्य येत आहे याचा या वर्गाला प्रामाणिक संतोष वाटत होता. इंग्रजी राज्य संपवण्याने वा बॉबपिस्तुलाचा दहशतवाद पसरण्याने या समाजाचे काहीच भले साधण्यासारखे नव्हते. इंग्रजी वेष परिधान करून गव्हर्नरच्या दरबारी किंवा कलेक्टरच्या घरच्या मेजवानीस निमंत्रण आले की सर्व पितर स्वर्गात गेल्याची कृतकृत्यता मानणारी ही आंग्लविद्याविभूषित मंडळी. यांचे मागणे लई नव्हते. आय.सी.एस. परीक्षेत भारतीयांना अधिक जागा द्याव्यात, त्यांच्यासाठी वयाची अट ढिली करावी. परीक्षेत बसणे अधिक सोपे व्हावे यासाठी हिंदुस्थानातही परीक्षा घेतली जावी, कर कमी करावेत, आयातीवरील जकात वाढवावी, लष्करावरील खर्च कमी करावा, लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जबाबदार कायदेमंडळांची स्थापना करावी; थोडक्यात, इंग्रजी सत्तेच्या छत्राखालीच वाढती सत्ता संपादन करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा हा वर्ग होय.

या वर्गातून काँग्रेसचा जन्म झाला. लोकांचे प्रतिनिधित्व करणारी अशी एक संस्था असावी या कल्पनेला खुद्द गव्हर्नर जनरल साहेबांचीही सहानुभूती होती. दरवर्षी नाताळच्या सुट्टीत कोणत्याही मोठ्या शहरी जमावे, अस्खलित इंग्रजी, सुटाबुटातील विद्वानांनी वक्तृत्व गाजवावे, सरकारकडे शिफारशी पाठवाव्यात, हळूहळू लोकांच्या प्रतिनिधित्वावर, अनौपचारिक का होईना, हक्क सांगणारी एक प्रतिनिधी संस्था उभी रहावी असा काँग्रेसचा मवाळ कार्यक्रम.

देशात विरोधी पक्षाचे काम करणारा एक मंच असावा ही गोष्ट व्हाईसरॉय साहेबांनाही मान्य होती. काँग्रेसने मंजूर केलेल्या काही शिफारशी सरकार अंमलातही आणत होते, पण लवकरच काँग्रेसच्या प्रतिनिधिक स्वरूपाबद्दल आणि उपयुक्ततेबद्दल मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. बहुसंख्य रयतेच्या इच्छाआकांक्षा, तसे पाहिले तर मवाळांच्या कार्यक्रमाशी आधिक जुळणाऱ्या होत्या. अंमलात बलुतेदारी बुडाली, शेतीवर टाच आली, राजसत्ता आणि धनसत्ता यांपासून वंचित होऊनही भटशाही माजली. त्यांनी जन पिडले होते. पण तातडीने इंग्रज निघून जावेत यात मवाळांप्रमाणे बहुजन समाजाला काही विशेष स्वारस्य नव्हते. पण मवाळ नुसतेच सभा, परिषद भरवायचे. जहाल काहीबाही खटाटोप करीत सरकारविरूद्ध धीटपणे उभेतरी रहात, लिहित बोलत. जहालांना बहुजन समाजात वाढती सहानुभूती मिळू लागली. सवर्ण सरंजामी नेते तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणून लोकमान्य होऊ लागले. खुद्द काँग्रेसमध्येही जहाल आणि मवाळ यांची साठमारी होऊ लागली. मवाळांचा कार्यक्रम थोडाफार फरकाने इंग्रजी सत्तेत मान्य होण्यासारखा होता. याउलट, सर्व जहाल चळवळ सर्व मार्गांनी मोडून काढण्याचा त्यांचा निर्धार होता आणि तरीही जहालांची लोकप्रियता वाढत होती. जहाल काय आणि मवाळ काय, दोन्ही फारतर लोकसंख्येच्या ५% लोकांचे प्रतिनिधित्व करणारे यापेक्षा जास्त नाही.

**बहुजन समाजाचे काय?**

देशातील बहुजन समाजाचा कोणी ना त्राता, ना नेता, जातिव्यवस्थेच्या चक्रात पिढ्यान्पिढ्या भरडला गेलेला हा समाज इंग्रजी सत्तेच्या काळात आपली गुलामगिरी संपेल आणि थोडे बरे दिवस येतील, बहुजन समाजाला विद्या मिळाली तर इंग्रजी अंमलात ते सुखी होतील अशा आशेत होता. १८५७ च्या बंडानंतर राणीच्या जाहिरनाम्यात परंपरागत जातिव्यवस्थेच्या उतरंडीस जीवदान मिळाले. भटशाही इंग्रजी राज्याचे महत्त्वाचे अंग बनले. शेतीवरील कर आणि इंग्रजी व्यापारामुळे उद्ध्वस्त होणारे गावोगावचे बलुतेदार यांना वाली कोणीच राहिला नाही. या समाजाची राजकीय भूमिका काय होती? इंग्रजांचे राज्य म्हणजे काही अनंत काळ टिकायचे नाही. आज ना उद्या त्यांना येथून जावेच लागेल; पण इंग्रजी अंमलाच्या रूपाने येथील शुद्रातिशुद्रांस विद्येचे दरवाजे उघडे होत आहेत. जातिव्यवस्था मोडली पाहिजे. विषमता संपली पाहिजे तरच लोकांचे एकमेव राष्ट्र तयार होईल आणि त्यानंतरच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला सुरूवात होईल. तोपर्यंत केवळ 'नॅशनल काँग्रेस' म्हटल्याने काही 'राष्ट्र' तयार होत नाही, परंपरागत सवर्ण समाजाच्या म्होरक्यांनी चालवलेल्या जहाल आणि मवाळ दोन्ही स्वातंत्र्यचळवळींबद्दल बहुजनसमाजास आपुलकीची भावना असण्याचे काहीच कारण नव्हते, ही भटांची पोरे विनाकारण शुद्रातिशुद्र मुलांच्या मनांत इंग्रजांविषयी अप्रीती निर्माण करून, त्यांच्या हाती पिस्तुल- बॉब देऊन त्यांना चुकीच्या मार्गास लावतात, अशा मार्गानी स्वराज्य मिळणे नाही आणि मिळाले तरी तो जुन्या पेशवाईचा नवा अवतार असेल, त्यात बहुजन समाजाला विकासाचे आणि प्रगतीचे मार्ग बंदच राहतील अशी बहुजनसमाजाच्या धुरीणांची स्पष्ट भूमिका होती.

जोतिबा फुल्यांनी सत्यशोधक समाजाच्या साहित्यात हा विचार स्पष्टपणे मांडला. इंग्रजी राज्य हे हिंदुस्थानला मिळालेले 'ईश्वराचे अतर्क्य वरदान' आहे असे मानणाऱ्या नेमस्तांचीही भूमिका अशीच होती. समाजसुधारणा की राजकारण या टिळकआगरकरी वादातही मूळ सूत्र तेच आहे. पुढे आंबेडकरी दलित चळवळीतही तथाकथित राष्ट्रीय चळवळीच्या सवर्ण धुरीणांच्या खऱ्याखुऱ्या हेंतुविषयी जबरदस्त संशय आढळून येतो. अलिकडे, अरूण शौरी यांच्या लिखाणात डॉ. बाबासाहेब

आंबेडकर हे स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या काळात इंग्रजांना सोयीस्कर अशी भूमिका घेत असल्याबद्दल टीका आढळते. बाबासाहेबांचे अनुयायी त्या टीकेचा निषेध करतात. यातच बाबासाहेबांच्या चळवळीचा पराभव आहे. जातिव्यवस्था समूळ नष्ट होईपर्यंत होणारी स्वातंत्र्याची धडपड ही खरीखुरी राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ असूच शकत नाही. गोऱ्या इंग्रजांच्या हातातील सत्ता थोडीफार आपल्याही हाती यावी याकरिता एतद्देशीय प्रतिष्ठांनी मांडलेला हा खेळ आहे अशीच १९३६ सालापर्यंततरी बहुजन समाजाची भूमिका होती. आणि यात शरम वाटण्यासारखे काहीच नव्हते आणि नाही. महात्मा फुले यांनी ही भूमिका स्वच्छपणे मांडली आंबेडकरवादी महात्मा फुल्यांशी नाते सांगतात, पण बाबासाहेबांचा स्वातंत्र्य आंदोलनाचा मार्ग टिळक नेहरू यांच्यापेक्षा अलग असल्याचे नाकारतात हे बाबासाहेबांचे दुर्दैव आहे. चळवळ मोडीत निघाल्यातच जमा होती, पण मवाळ चळवळीस जहालांच्या धसरगुंडीचा काही लाभ मिळत नव्हता. जहाल आणि मवाळ दोघेही बाजूस सरून बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे स्वातंत्र्याचे एक नवे आंदोलन उभे राहण्याची शक्यता तयार होत होती.

एवढ्यात महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून हिंदुस्थानात परतले. स्वातंत्र्याच्या आंदोलनासाठी त्यांनी नवीन संस्था काढली नाही, काँग्रेसमध्येच प्रवेश केला. सुटबुटधारी काँग्रेसजनाच्या सम्मेलनात मोहनदार करमचंद गांधी उभे राहिले. इंग्रज शासनाच्या न्यायप्रियतेवर विश्वास ठेवून भारतीय परंपरा आणि अध्यात्म, सत्य आणि अहिंसा यांच्या आधाराने स्वातंत्र्य चळवळीची बांधणी, पण त्याबरोबरीनेच समाजसुधारणेच्या आणि बहुजन समाजाच्या आर्थिक हिताच्या कार्यक्रमांचा आग्रह या गांधीप्रणालीने देशात मोठे चैतन्य निर्माण केले. जहालांची सद्दी संपली आणि काँग्रेस आंग्यवेभाषा विभूषितांची परिषद न राहता एक आंदोलन बनले. गांधीच्या आगमनाने काँग्रेस तरारून उठली, बहरली, फोफावली आणि विस्तारली. सवर्ण चळवळीच्या धाकट्या नेमस्त पातीचा विजय झाला. जहाल मिटले, मवाळ बाजूस झाले. गांधीजींच्या आध्यात्मिक सत्याग्रही आंदोलनाने बाजी मारली.

पण ही सारी उच्चभ्रू समाजातीलच द्वंद्वे. गांधीच्या प्रभावामुळे बहुजन समाजाच्या चळवळी निष्प्रभ झाल्या आणि मावळत चालल्या. सरदार वल्लभभाई पटेल इत्यादींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने शेतकऱ्यांत जागृती निर्माण केली. काँग्रेस आदिवासीपर्यंत पोहोचली. अखेरीस, बहुजन समाजाची स्वतंत्र चळवळ चालू ठेवणे अशक्य झाल्यामुळे बहुजन समाजाने नेते फैजपूर काँग्रेसमध्ये स्वतंत्रता चळवळीच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील होऊन गेले. स्वतंत्रता चळवळीच्या या गांधीप्रणित मध्यप्रवाहात दोन समाज शेवटपर्यंत एकजीव होऊ शकले नाहीत. बहुजन समाजाचे खानदानी नेते काँग्रेसमध्ये जाऊन मिळाले तरी शुद्रातिशुद्रांच्या चळवळीचे बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते काँग्रेसी मध्य प्रवाहापासून दूर राहिले, एवढेच नव्हे तर, वेळोवेळी काँग्रेस आणि दस्तुरखुद्द महात्माजींशीही वादविवाद आणि संघर्ष करत राहिले. गांधीवादी चळवळीबद्दल मुसलमान समाजाच्या मनातही खोलवर रूजलेल्या गंभीर शंका होत्या. तो समाजही बहुसंख्येने स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर झाला. त्याची परिणती देशाच्या फाळणीत आणि पाकिस्तानच्या निर्मितीत झाली.

१९३० सालच्या सत्याग्रह अयशस्वी झाला. प्रतिकात्मक सत्याग्रह, विधायक कार्यक्रम अशा सव्यापसव्यात काँग्रेस कार्यकर्त्यांना गुंतवून ठेवून एका तऱ्हेने गांधीजी खंदकात, काही नवीन दिशा दिसण्याची वाट पहात होते. याच काळात समाजवादी विचाराचे झंझावत सुटले आणि बहुजन समाजातील प्रश्नांची तड समाजवादी विचारधारा आणि कार्यक्रम यांच्या आधाराने लावू पाहणारे एक नवीन नेतृत्व उदयास येऊ लागले. दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागले. महायुद्ध पेटले. त्यांत इंग्रजांना विजयही मिळाला, पण त्या प्रयासात साम्राज्याच्या सिंहाची कंबर मोडली. भारतातील साम्राज्य आता भारतीयच भद्र लोकांच्या माध्यमातून चालवता येणार नाही हे स्पष्ट झाले. साम्राज्य चालू ठेवायचे तर लाखोंच्या संख्येने इंग्रजी प्रशासक व लष्कर येथे खडे ठेवावे लागेल. आणि तरीही एवढी जबरदस्त किंमत देऊनही साम्राज्य फार काळ टिकणार नाही, हे स्पष्ट झाले. इंग्रजींनी देश सोडून परत जाण्याचे ठरवले.

सत्तांतराच्या वेळी बहुसंख्य जनतेची प्रतिनिधी म्हणून मान्यता काँग्रेसला होती हे खरे; पण काँग्रेसमध्ये शहरी, व्यापारी, कारखानदार, जमीनदार, शेतकरी, गांधीवादी, समाजवादी अशा अनेक मतप्रवाहांचे मिश्रण होते. बहुजन समाजाच्या हितांचे रक्षण करणारी, हिंसाअहिंसेच्या काथ्याकुटाची फारशी पर्वा न करणारी चळवळ कोसळली तर फार झपाट्याने समाजवादी बहुजन चळवळ संघर्षाला खडी होईल आणि मग सत्तेचे हस्तांतरण शांततेत आणि सुव्यवस्थेने करणे दुष्कर होईल हे इंग्रजांनी ओळखले. देशाची फाळणी करून भारतातील सत्ता काँग्रेसमधील भद्र लोकांच्या हाती सोपवणे इंग्रजांच्या आर्थिक, राजकीय हिताचे होते.

**गांधी – विचार पहिला बळी**

स्वातंत्र्य आले, पंडित नेहरू पंतप्रधान झाले. इंग्रजी अमदानीत धन, विद्या आणि सत्ता संपादन केलेल्या, चामडीचा रंग सोडल्यास सर्वतोपरी इंग्रजी असलेल्या नेतृत्वाकडे सत्ता गेली. महात्मा गांधीच्या जनआंदोलनाच्या सामर्थ्याची आता या शहरी भद्र नेतृत्वास काही आवश्यकता राहिली नव्हती. गोडसेने गांधीजींचा देह संपवला. नंतर लगेच नेहरूंनी गांधींच्या अर्थविचारावर आणि राजकीय विचारावर हल्ला चढवला. 'गावकेंद्री अर्थव्यवस्था, शेती आणि ग्रामोद्योगास आणि न्यूनतम शासन' याऐवजी 'शहरी उद्योगधंद्याचा प्रभाव असलेली सर्वकष सत्ता शासनाच्या हाती एकवटणाऱ्या व्यवस्थे' कडे देशाची वाटचाल चालू झाली. आणि ५० वर्षात देशावर अनर्थ कोसळला.

स्वातंत्र्याच्या चळवळीतील वेगवेगळे प्रवाह, त्यांची प्रकृती

आणि इतिहास यांचे विवेचन स्वातंत्र्यानंतर कोसळलेला अनर्थ समजावून घेण्यासाठी फार महत्त्वाचे आहे.

हजारो वर्षे गुलामगिरीत राहिलेल्या बहुजनसमाजाला संघटित होऊन आपली भूमिका मांडण्याची संधी इंग्रजी अमदानीत निदान तीनदा आली. कंपनी सरकारच्या उदार धोरणाचा फायदा दिसू लागतो, न लागतो तोच चपात्यांच्या बंडाचा डोंब उसंळला. आणि बहुजन समाज मागे ढकलला गेला. जहाल चळवळ कोसळल्यानंतर बहुजन समाजाची चळवळ उभी राहू शकली असती, पण तीही संधी गेली. दुसरे महायुद्ध पेटल्यामुळे समाजवादी बहुजनसमाजाची चळवळ खुडली गेली. स्वातंत्र्य आले ते जोतिबा फुल्यांच्या भाकिताप्रमाणे पेशवाईचे नवे रूप घेऊन आले. गोऱ्या इंग्रजांची जागा काळ्या इंग्रजाने घेतली. गांधीवादी ग्रामीण अर्थव्यवस्था त्यांना परवडणारी नव्हती. याउलट, समाजवादाच्या नावाखाली सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याची शक्यता दिसताच आंग्लाळलेल्या काँग्रेसने गांधीनेतृत्वाचा मुखवटा सहज फेकून दिला. स्वातंत्र्यानंतर 'ब्राह्मणी' समाजवादाचा अवतार झाला आणि अनर्थपरंपरेची सुरूवात झाली.

**आत्मपरीक्षणाच्या तीन कसोट्या**

स्वराज्याच्या आंदोलनातील अंत:प्रवाह पाहता गेल्या ५० वर्षातील घडामोडींचे मूल्यमापन करणे किती बिकट आहे याची कल्पना यावी. स्वातंत्र्यानंतरच्या घसरगुंडीचे विश्लेषण करताना तीन प्रकारे सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. देशाच्या आजाराचे निदान थातुरमातूर असून चालणार नाही. ओळखलेल्या आजारांवर परिणामकारक उपचार झाले तर देशाचे नष्टचर्य संपण्याची निश्चिती हवी; अशा अभ्यासात कोणत्या व्यक्तींच्या बडेजावाचा अडसर असता नये. अखेरीस स्वातंत्र्य चळवळीच्या प्रकृतीचीही परखड चिरफाड करण्यात हयगय होता कामा नये.

**(पूर्वप्रकाशित–१९९८)**

♦ ♦ ♦

# सन २०१७-१८ हंगामासाठी केंद्र शासनाने जाहिर केलेल्या किमान आधारभूत किंमती (Minimum Support Price (MSP))

केंद्र शासनाने सन २०१७–१८ या हंगामासाठी विविध कृषी उत्पादनांच्या सुधारीत किमान आधारभूत किंमती (Minimum Support Price (MSP)) जाहिर केल्या आहेत. देशात कडधान्य आणि तेलबीयांचे उत्पादनास प्रोत्साहित करण्यासाठी तूर, उडीद, मूग, भुईमुग (शेंगा) व सोयाबीन यासाठी प्रति क्विंटल रु. २००/ – तसेच सुर्यफूल, तीळ व कारळे यासाठी प्रति क्विंटल रु. १००/– बोनस जाहिर केला आहे. सदर बोनस जाहीर किमान आधारभूत किंमतीवर द्यावयाचा आहे. सन २०१७–१८ या हंगामासाठी सुधारीत किमान आधारभूत किंमती (एफ.ए.क्यू. दर्जाच्या) प्रती क्विंटल खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पिकाचे नांव | प्रकार | २०१५–१६ MSP (रक्कम रु.) | २०१६–१७ MSP (रक्कम रु.) | २०१७–१८ MSP (रक्कम रु.) | २०१७–१८ साठी जाहिर केलेली | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाढ (रक्कम रु.) | बोनस (रक्कम रु.) | एकूण वाढ (रक्कम रु.) |
| १. | धान | साधारण | १४१० | १४७० | १५५० | ८० | ०० | ८० |
| | | अ–ग्रेड | १४५० | १५१० | १५९० | ८० | ०० | ८० |
| २. | ज्वारी | हायब्रिड | १५७० | १६२५ | १७०० | ७५ | ०० | ७५ |
| | | मालदांडी | १५९० | १६५० | १७२५ | ७५ | ०० | ७५ |
| ३. | बाजरी | | १२७५ | १३३० | १४२५ | ९५ | ०० | ९५ |
| ४. | मका | | १३२५ | १३६५ | १४२५ | ६० | ०० | ६० |
| ५. | नाचणी (रागी) | | १६५० | १७२५ | १९०० | १७५ | ०० | १७५ |
| ६. | तूर | | ४६२५ | ५०५० | ५४५० | २०० | २०० | ४०० |
| ७. | मूग | | ४८५० | ५२२५ | ५५७५ | १५० | २०० | ३५० |
| ८. | उडीद | | ४६२५ | ५००० | ५४०० | २०० | २०० | ४०० |
| ९. | कापूस | मध्यम स्टेपल | ३८०० | ३८६० | ४०२० | १६० | ०० | १६० |
| | | लांब स्टेपल | ४१०० | ४१६० | ४३२० | १६० | ०० | १६० |
| १०. | भुईमूग | | ४०३० | ४२२० | ४४५० | ३० | २०० | २३० |
| ११. | सुर्यफूल | | ३८०० | ३९५० | ४१०० | ५० | १०० | १५० |
| १२. | सोयाबीन | पिवळा | २६०० | २७७५ | ३०५० | ७५ | २०० | २७५ |
| १३. | तीळ | | ४७०० | ५००० | ५३०० | २०० | १०० | ३०० |
| १४. | कारळे | | ३६५० | ३८२५ | ४०५० | १२५ | १०० | २२५ |

# पुन्हा एकदा उत्तम शेती

ब्राह्मणेत्तर चळवळीतील पहिले साप्ताहिक पत्र 'दिनबंधू' १८७७मध्ये सत्यशोधक चळळीचे कार्यकर्ता कृष्णराव पांडुरंग भालेराव यांनी सुरू केले. याच काळात त्यांनी 'बळीबा पाटील आणि १८७७चा दुष्काळ' या नावाने शेतकरी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी लिहिली. या कादंबरीच्या प्रस्तावनेत ते लिहितात ''आमच्या शेतकरी लोकांविषयी विचार केला तर खरोखरच फार दु:ख वाटते. यांच्यावर आजपर्यंत जेवढे अंमलकर्ते होत आले त्यातील बहुतेकांना किंबहुना सर्वांनाच शेतकऱ्यांची स्थिती माहिती नव्हती व ती नसतेच. तसेच आपणावर राज्यकर्ते कोण आणि कोठील आहेत, कोण गेले व कोण आले; आमच्या जमिनीवर वसूल का घेतात, ते कोठे नेतात, त्याचे काय करतात हेही शेतकऱ्यास असावे तसे माहीत नाही!! म्हणूनच या बलाढ्य समाजावर (हिंदुस्थानावर) परक्यांचे ऐषआराम निर्विघ्नपणे चालतात. आमच्या शेतकऱ्यांना त्याचे शुभाशुभ नसते. कोठून असणार? अडाणी अथवा निर्दय धन्याच्या बैलास दु:ख होते म्हणून ते कधीच त्रासमुक्त होण्याचा इलाज करीत नाहीत. ज्ञान असेल तर उपाय सुचेल. आमचे शेतकरी पशुवत असण्याचे कारण तरी हेच होय.'' याशिवाय भालेकर गावोगावी फिरून शेतकऱ्यांमध्ये जागृतीचे कार्य करीत. शेतकरी शेतकरी उठा हो उठा! असे त्यांचे कळकळीचे सांगणे होते. सप्टेंबर १९०२ मध्ये कऱ्हाड प्रांतातील करंजगाव येथे केलेल्या एका व्याख्यानात ते सांगतात, ''शेतकऱ्यास साधारण प्रतीचे शिक्षण मिळवून देण्याचे कामी सरकारकडून व या देशातील विद्वान व धनवान लोकांकडून लवकर प्रयत्न केले पाहिजेत. तसेच त्यांच्या मोठाल्या गावी लहान लहान उद्योगशाळाही सुरू झाल्या पाहिजेत. नाहीतर एक दोन पिढ्यानंतर शेतकरी इतके खालावले जातील, की ते आपल्या वतनी गावास व जमिनीस मुकून अजिबात भटकू लागतील. इतर धंद्याचे ज्ञान नाही, सहवास नाही, वळण नाही आणि त्या संबंधाने चौकसपणाने कधी विचारही केला नाही. अशा शेतकऱ्यांवर इतर उद्योग करून पोटे भरण्याचा प्रसंग गुदरल्यावर त्याच्या हाल अपेष्टेस काय पहायचे!' असे सांगून पुढील वक्तव्यात, शेतकरी समाज कित्येकदा प्रत्येक दिवशी किंवा आठवड्यात गुरुवार, एकादशी अशा दिवसात गाणी बजावण्यात कसा वेळ घालवितात. महिना-महिना शेतकरी दूर दूरच्या यात्रा, जत्रा, तमाशांसारख्या कार्यक्रमासाठी रात्री रात्री पुरुष-स्त्रिया मुले हजारोंच्या संख्येने कसा वेळ घालवतात, पैसा दवडतात. दु:खे पदरी पाडून घेतात याचे वर्णन सांगून, या त्यांच्या उद्योगात समाजातील ब्राह्मण, मारवाडी, पारशी या वर्गाचे लोक हिंडतात काय? असा सवाल ते उपस्थित करतात. वानगीदाखल १२५-१५० वर्षांपूर्वीचे आणि शेतकरी समाज जीवनाचे वास्तव दाखविणारे हे लेखन. याच काळात महात्मा ज्योतिबा फुले यांची 'शेतकऱ्याचा असूड', 'गुलामगिरी', 'ब्राह्मणाचे कसब' ही पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यावेळच्या धार्मिक, सांस्कृतिक व ब्राह्मणी वर्चस्ववाद कुप्रथांचे भयाण वास्तव आणि शेतकरी समाजाची दारूण स्थिती यासंबंधी कठोर मांडणी त्यात त्यांनी केली आहे. आजच्या खेड्यापर्यंत पोहोचलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शिक्षणाचा प्रभाव पाहता, ज्ञानेश्वरीतील मराठी इतकीच विद्यार्थ्यांना फुल्यांची मराठी भाषा दुर्बोध वाटण्याचीच जास्त शक्यता आहे. आणि त्यामुळे मुळातून महात्मा फुले किती लोक वाचतील याबद्दल साशंकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर २०व्या शतकाच्या उत्तरार्धात शरद जोशी यांनी सुरू केलेल्या शेतकरी संघटनेच्या सुरवातीचा काळ आठवतो. गावोगावी भटकंती करून शेतकऱ्यांशी संवाद साधत संघटना कार्याला सुरवात झाली. कारण आपण जे काही लिहू ते एकतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणार नाही. आणि जरी पोहोचले तरी शेतकरी समाज ते वाचणार नाही. याची त्यांना खात्री पटली होती. त्यामुळे शरद जोशी यांनी या काळात जो संघर्ष केला, जे परिश्रम घेतले ते सर्वांनी पाहिले आहेत. इतके प्रास्ताविक करण्याचा उद्देश असा की, एकोणिसावे शतक आणि आजच्या २१व्या शतकातही ग्रामीण वास्तव जीवनात कोणताही गुणात्मक फरक झालेला नाही, हे लक्षात यावे. आज ग्रामीण भागात यात्रा, तमाशे मनोरंजनाचे जुने कार्यक्रम यांचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले असले तरी नव्या आणि बिभत्स स्वरूपाच्या कार्यक्रमांची भर पडली आहे. भपकेबाज स्वरूप पुढे येत आहे. सर्वत्र रस्त्यावर गणेशोत्सव, देवी-देवतांचे उत्सव, दहिहंडी, बैलगाडा शर्यती यांचे प्रभाव वाढले आहेत. मोठे खर्च त्यासाठी केले जातात. त्यातून धार्मिक आणि सांस्कृतिक प्रथाचे ओंगळ समाजातले लोकप्रतिनिधी, स्वत:ला सामाजिक कार्यकर्ते म्हणविणारे लोक यांची समाजविघातक आणि घातक स्पर्धा या प्रवृत्ति वाढताना दिसतात. त्याचबरोबर सरकारी तिजोरीवर यातील खर्चाचा भार टाकला जातो. यातील घातक स्पर्धा भेदाभेदांच्या भिंती उभारण्यास कारणीभूत ठरत आहेत. यात भर म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इथल्या सरकारांनी भारतीय शेतकऱ्यांच्या समस्यांविषयी जी धोरणे अवलंबिली त्यातून त्यांच्या वैचारिक दिवाळखोरीने हे भयाण वास्तव अधिकच अंध:कारमय होत आहे. आणि त्याचा परिणाम म्हणून शेतकरी आत्महत्या करू लागला. लक्षावधी कुटुंबे निराधार होत आहेत. ग्रामीण समाज

जीवन अधिकच उद्‌ध्वस्त होत चालले आहे. या परिस्थितीत सुरुवातीला शरद जोशी यांनी ''इंडिया'' आणि ''भारत'' हे द्वैत मांडले. त्यावेळी त्याची टिंगल टवाळी करण्यात इथल्या आर्थिक व राजकीय क्षेत्रातल्या बुद्धिमंतांनी धन्यता मानली. आपल्या अभ्यासाची निरिक्षणे नोंदवताना शरद जोशी यांनी ''नागरी समाजाची बधिरता'' या अनुषंगाने काही विचार मांडले. त्याकडेही सर्वांनी दुर्लक्ष केले. स्वत:च्या ताटात अधिक कसे ओढता येईल असा विचार करताना नागरी समाज कसा स्वार्थी विचार करतो याची खंत आजही कुठेच दिसत नाही. राजकीय गणिते जुळविण्याच्या मतलबी हेतूने राजकीय पक्षही त्याला खतपाणी घालताना दिसताहेत.

इतकेच नाही तर डंकेल प्रस्ताव, खुल्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार, करण्याच्या वेळी शरद जोशी यांनी एकाकी लढा दिला व संघर्ष केला त्याची गांभीर्याने दखल नागरी घटकाने घेतलेली नाही. भारतीय शेतीउद्योग व जागतिक खुली बाजारपेठ आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरचा परिणाम याची मांडणी करण्याचा शरद जोशी यांचा आकांत देशाने व शेती अर्थव्यवस्थेने विशेष गांभीर्याने घेण्याची गरज कालही होती व आजही आहे.

संघटना उभारणी आणि संघटनेच्या सर्व आंदोलनात भारतीय शेतकऱ्यांच्या कर्तृत्वावरचा आपला ठाम विश्वास शरद जोशी यांनी अढळ ठेवला, हे त्यांच्या ठायी असलेल्या संतत्वाचे लक्षण म्हणावे लागेल. ''बुडती हे जन, न देखवे डोळा...'' अशा विचारातून व निष्ठेतून त्यांनी आपले कर्तव्यकर्म म्हणूनच कार्य केले. तथापि शेतकरी कुटुंबातला एक घटक म्हणून आमचा कृतघ्नपणा मला सतत अस्वस्थ करीत आला आहे. मी अनुभवलेले केवळ दोन प्रसंग यासाठी नमूद करीन. अगदी सुरुवातीला १९८० साली कांद्याच्या भाववाढीसाठी चाकणच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आंदोलन झाले, त्यावेळचा प्रसंग. शरद जोशी यांनी अनेक दिवस यासाठी उपोषण केले. या कार्यक्रमात तालुक्यातील एक ज्येष्ठ समाज कार्यकर्ते सहभागी राहिले. उपोषणासाठी साहेबांच्या बरोबर बसले. त्यांना चांगला धडा शिकवावा या विचाराने काही शेतकरी बांधवांनी त्यांच्या शेतातील संपूर्ण पाईपलाइन उखडून टाकली. अगदी अलिकडचा दुसरा प्रसंग, आमच्या भागातील खासदार आमदार असलेल्या लोक प्रतिनिधींच्या संदर्भातला. काही कारणाने बैलगाडा शर्यतीवर न्यायालयाकडून बंदी आली. या शर्यती पुन्हा सुरू कराव्यात यासाठी या लोकप्रतिनिधींनी अनेकदा शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व केले. शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी सतत दारिद्र्याच्या खाईत लोटला जाऊन लाखोंच्या संख्येने आत्महत्या करीत आहेत. शेतकरी संघटनेने यासाठी उभारलेल्या संघर्षात ३०-३५ वर्षांच्या काळात या लोकप्रतिनिधींनी वा त्यांच्या अनुयायांनी सहभाग घेतलेला नाही. किंवा या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना सहानुभूती म्हणून आपले धार्मिक सण, उत्सव साधेपणाने पाळल्याचे दिसले नाहीत. त्यामुळे केवळ मतांच्या राजकीय स्वार्थासाठी की वैचारिक हीन मनोवृतीतून ते असे कार्यक्रम घेतात असा प्रश्न पडतो. किंवा शतकानुशतके शेतकऱ्याला अज्ञानात वा नशेत ठेवण्याचा कार्यक्रम तर ते पुढे चालवित नाहीत ना, असे वाटू लागते. खरे तर नवीन अर्थशास्त्रीय समस्यांना सामोरे जाण्यासाठी व शेतकऱ्याला त्याच्या दारिद्र्यातून बाहेर काढण्यासाठी शेतीचे नवे तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योगाची उभारणी, व्यापक हितसाठी शेतकऱ्यांचे संघटन व प्रबोधन यासाठी या लोकांनी कार्यक्रम करण्याची अधिक गरज आहे. ते घेतले जात नाहीत. उलटपक्षी आजच्या संगणकीय युगात हे शेतकऱ्यांच्या पोरांना बैलाची शेपटी पिरगळायलाच शिकवित आहेत याचे आश्चर्य वाटते. माझ्या मते अशा प्रकारचे लोक प्रतिनिधी आणि त्यांना निवडून देणारे वैचारिक दारिद्र्याने भरकटलेले हे ग्रामीण मतदार शेतकरी या वर्गाची ही बधिरता सुधारणांना व संघटना वाढीला जास्त घातक ठरली आहे.

काही प्रमाणात विषयांतराचा दोष स्वीकारूनही मी एक मुद्दा या ठिकाणी मांडू इच्छित आहे. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची महान परंपरा लाभली. प्रबोधनाची मोठी चळवळ या संप्रदायाने चालविली आहे. संतांच्या विचारांची शिकवण आणि आदर्श जीवनपद्धती त्यातून जीवनमुक्तीच्या मार्गाचे दिशादर्शन या प्रबोधनातून मांडण्याचा खटाटोप या सांप्रदायातील महाराज मंडळी तळमळीने करीत आहेत. हा त्यांचा प्रयत्न सदोष असला तरी त्यांचा प्रयत्न समाजाला निश्चितपणे हितकारक ठरणारा आहे असे मान्य करावेच लागेल. ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही मार्गाचा उहापोह त्यांच्या प्रबोधनातून केला जात आहे. समाज जीवनातील दोषांवर नेमकेपणाने भाष्य करून समाजात माणसाला सन्मार्गाला लावण्यासाठी कोणत्या गुणांची जोपासना केली पाहिजे याचे मार्गदर्शन करणारे हे प्रबोधन आहे.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई, एकनाथ, नामदेव, तुकाराम आणि या प्रभावळीतील अनेक संतांच्या शिकवणुकीचा प्रचार-प्रसाराचे हे कार्य शतकानुशतके सुरू आहे आणि त्यामुळे वारकरी सांप्रदाय सातत्याने वृद्धिंगत राहिला आहे असे दिसून येते. या आदर्श साप्रंदायात प्रेरणा घेऊन या हजारो हरिभक्त परायण मंडळी हे कार्य करीत आहेत. या सांप्रदायाच्या परंपरेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विश्ववंद्य गाडगेबाबा या पूर्वसुरींनी व त्यांचे अनुयायी यांनी समाजपरिर्वतनाचे काम केले आहे. आजही करीत आहेत. खेड्यातील कृषी संस्कृती आणि समाजजीवन यांचे माझ्याही

जीवनात अतूट नाते आहे. चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीच्या मागच्या कालखंडाकडे वळून पाहिल्यानंतर काही ठळक गोष्टी जाणवतात. जुन्या चालीरिती आणि त्यातील घातक कुप्रथा यामध्ये या मंडळीच्या प्रभावाने घडून आलेले विधायक बदल लक्षात येतात. उदाहरण घ्यायचे झाले तर पशुहत्या बंद झाल्याचे महत्त्वाचे उदाहरण देता येईल. ग्रामीण महाराष्ट्रात जवळजवळ प्रत्येक गावी काही देवदेवतांची छोटी-मोठी मंदिरे आहेत. त्यांना ग्रामदैवते असे संबोधले जाई. त्यामध्ये लक्ष्मीआई, म्हसोबा, चिडोबा आणि वेगवेगळे बाबा आणि शेतकऱ्यांचे कुलदैवत समजले जाणारे खंडोबा अर्थात मल्हारी देव यांचा समावेश असे. या देवतांच्या ज्या वेगवेगळ्या पूजा पद्धती होत्या त्यामध्येच पशुबळी देण्याच्या प्रथेचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. हजारो प्राण्यांचे बळी त्यावेळी दिले जात. खेड्यापाड्यातील बहुतेक लोकांचा विशेषकरून कृषिव्यवसायाशी संबंधित लोकांचा त्यात मोठ्या प्रमाणावर समावेश होता. या देवतांच्या मंदिराबाहेर आणि परिसरात रक्ताचे ओघळ वाहाताना मीही पाहिले आहेत. विश्ववंद्य गाडगेबाबा आणि त्यांचे अनुयायी यांनी या कुप्रथांच्या विरुद्ध जी जनजागृती केली त्याचा परिणाम आणि वारकरी सांप्रदायाचा वाढता प्रभाव यामुळे या कुप्रथा आज जवळपास बंद झाल्या आहेत. आचार आणि विचार यांचा प्रभाव किती परिणामकारक होतो, याचं हे उदाहरण आहे. आज शेती व्यवसायातून फार मोठ्या प्रमाणात लोक बाहेर पडताहेत. विशेषकरून तरुणवर्ग या व्यवसायात कमी होतो आहे. कारण त्या व्यवसायातील परिस्थिती त्यांना तसे करण्यास कारणीभूत ठरली आहे. मात्र त्यांचे दुष्परिणाम अत्यंत घातक ठरू लागले आहेत. तीस वर्षांहून अधिक काळ दररोज शेती व्यवसायातील माणूस आत्महत्या करीत आहे. त्याचे प्रमाण वाढत चालले आहे. कठोर शब्दांत मांडायचे तर हा देश शेतकऱ्यांची स्मशानभूमी होऊ लागला आहे. आज लोकशाही सरकारची धोरणे या आत्महत्या थांबविण्यासाठी फोल ठरताहेत. अशावेळी या सांप्रदायात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या शेतकरी कुटुंबातील तरुण-तरुणी महाराजांनी वेगळ्या प्रबोधनाची चळवळ उभी करणेची आवश्यकता आहे असे वाटते. आळंदी देहू या परिसरात सतत वावर असणारा आणि वारकरी संप्रदायाला मानणारा मी एक घटक आहे. शेकडो कीर्तनांच्या कार्यक्रमांना मी उपस्थित राहिलो आहे. फार कमी महाराज मंडळी शेतकरी वर्गाची व्यथा आणि त्यातून सावरण्यासाठी आवश्यक मनोबल तयार करण्यासाठी या प्रबोधनातून बोलताना दिसतात. बहुतेक सर्वच कीर्तनातून रामायण, महाभारत, पुराणे यातील विविध संदर्भ कथाविषय घेतले जातात. ते आवश्यक असतीलही. परंतु सध्याच्या वास्तव जीवनातील परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रबोधन आवश्यक झाले पाहिजे. कारण कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांची आत्महत्या ही समाजाला फार मोठा कलंक आहे. हा कलंक समूळ नष्ट व्हावा यासाठी सर्वांनीच काम करण्याची आवश्यकता आहे. लहानपणापासून मी कीर्तनातून बळीराजाची कथा ऐकत आलो आहे. बळीराजा हा फार धर्मनिष्ठ आणि दानशूर राजा होता. पृथ्वीवरच्या शेतकऱ्यांचा हा महान राजा. त्याच्या राज्यात प्रजा अत्यंत सुखी आणि समाधानात जगत होती. या राजाच्या दरबारातून कुणीही रिक्त हस्ते परत जात नव्हता. आणि त्यामुळे त्याच्या राज्याच्या विस्तार तर फार मोठा होताच तथापि या राज्याचे सामर्थ्य व कीर्ती सतत विस्तारत होती. ती इतकी की देवांना त्याचा हेवा वाटू लागला. आपले सिंहासन हा राजा काबीज करेल की काय अशी भिती इंद्राला देखील वाटू लागली. देवदेवतामध्ये खलबते झाली; आणि कोणत्याही उपायाने त्या राजाचे प्रस्थ कमी करावे, असा घाट घालण्यात आला. त्यासाठी जगाची पालनकर्ती देवता विष्णू यांना पाठविण्याचे ठरले. विष्णू बटू ब्राह्मणाचे 'वामन' अवतारात या राजाकडे आले. तपस्वी रूपातील विष्णू दरबारात आल्यानंतर राज्याच्या प्रथेप्रमाणे त्याच्या इच्छेचे दान देणे राजाचे व्रत होते. वामनाला तशी विनंती केली गेली. विशिष्ठ हेतू धरून देव विष्णू या रूपात आलेत याची बळीराजाला कल्पना आली नाही. वामन अवतारातील विष्णुने आपल्याला तीन पावले जमीन मिळावी अशी मागणी केली. त्याप्रमाणे बळीराजाने कबूल केली. काही विपरित हेतूने आलेल्या वामनाने विराट रूप धारण केले. पहिले पाऊल टाकले तर सारी पृथ्वी त्या पावलात व्यापली गेली. दुसरे पाऊल टाकले त्याने स्वर्ग व्यापला. आणि तिसरे पाऊल कुठे ठेवू अशी पृच्छा बळीराजाला केली. बळीराजाने आपले मस्तक त्याच्यापुढे केले आणि मस्तकावर तिसरे पाऊल ठेवण्यास सांगितले. वामनाने आपले पाऊल बळीराजाच्या मस्तकावर ठेवले. पाऊल ठेवताच बळीराजा पाताळात गेला. म्हणतात तिथे आता बळीराजाचे राज्य आहे. बळीराजाच्या दानाने प्रसन्न झालेल्या वामन रूपातील विष्णूने आपले खरे स्वरूप प्रकट केले. आणि राजाला वर मागून घेण्यास सांगितले. बळीराजाने दररोज दरबारात येता-जाताना आपले दर्शन व्हावे अशी इच्छा त्यावेळी प्रगट केली आणि शेवटी सांगितले जाते की, आजही विष्णूदेव बळीराजाच्या दरबारात द्वारपाल आहेत. आणि या ठिकाणी ही कथा संपते. पुढे बळीराजा कधी होणार हे कुणीही महाराज सांगत नाहीत. आणि बळीराजाची प्रजा असलेल्या शेतकऱ्याला चांगले दिवस कधी येणार हेही त्यामुळे कुणी सांगू शकत नाही. अशा या विपरित परिस्थितीत आपल्या आयुष्याच्या शेवटी 'पुन्हा एकदा उत्तम शेती' हा मंत्र उद्घोषित करणारे शरद जोशी हाच आशेचा किरण दिसतात. यासाठी शरद जोशी यांनी विद्यमान

परिस्थितीत तीन पावले टाकण्याची विनंतीवजा सूचना आपल्या शेतकरी पाइकांना केली आहे. त्यातले पहिले पाऊल आहे, जागतिक हवामान बदल आणि तपमानवृद्धी यामुळे निर्माण होणाऱ्या उत्पादनाच्या तुटवड्याच्या परिस्थितीत शेतकऱ्याने आपल्या उत्पादनाच्या किंमती आपल्या हाती ठेवण्याच्या अधिकाराचा वापर करणे व दुसरे पाऊल म्हणजे शेतकऱ्यांनी कुटिरोद्योग म्हणून इथेनॉल(शेततेल) किंवा तत्सम जैव इंधनाचे उत्पादन सुरू करणे आणि तिसरे पाऊल म्हणून शेतकऱ्यांनी बाजारपेठ आणि तंत्रज्ञान स्वातंत्र्य मिळविण्याची यशस्वी लढाई करणे. शेतकऱ्याची आत्महत्या थांबावी आणि जगाचा पोशिंदा असलेल्या या समाज घटकाला देशातील इतर घटकाप्रमाणे सन्मानाने जगता यावे, यासाठी सर्वांनीच प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे. यासाठी भविष्यकाळाची अपरिहार्यता म्हणून शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिक भावनेने वरीलप्रमाणे तीन पावले टाकण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे.

– २ –

शरद जोशी यांच्या ६९व्या वाढदिवसानिमित्त सप्टेंबर २००४ मध्ये ''शेतकऱ्यांच्या आर्थिक असंतोषाचे जनक, खासदार शरद जोशी'' हा लेख मी लिहिला.

शतकानुशतके अन्यायाखाली दडपल्याने गलितगात्र झालेल्या समाजाला जागे करण्यासाठी समाजहितैषी महामानव प्रयत्न करीत आले आहेत. महाराष्ट्रालाही अशी महान परंपरा लाभली आहे. २०व्या शतकाच्या उत्तरार्धात शरद जोशी यांनी उभी केलेली वैचारिक आणि प्रबोधनात्मक चळवळ अनेक दृष्टीने वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण होती असे निश्चितपणे म्हणता येते. नव्या आर्थिक क्रांतीला जन्म देणारी चळवळ म्हणून ती दीर्घकाळ परिणाम करणारी ठरली आहे. अधिक काही लिहिण्यापूर्वी या ठिकाणी नमूद करतो, ज्येष्ठ पत्रकार आणि शरद जोशी यांचे आद्य चरित्रकार भानू काळे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक 'अंगारवाटा... शोध शरद जोशींचा' हा चरित्रग्रंथ सिद्ध केला आहे. त्याचे वाचन किंबहुना पारायणे शेतकरी कुटुंबात व या समाजघटकांचे हित करू इच्छिणाऱ्यांनी केली पाहिजेत. इतके ते महत्त्वपूर्ण उतरले आहे. या ग्रंथांची तातडीने हिंदी आणि इंग्रजी या भाषेत भाषांतरे होऊन ग्रंथ प्रसिद्ध होणे गरजेचे आहे. देश पातळीवर या ग्रंथाचे वाचन होऊन नव्या शेतकरी क्रांतीला त्यातून बळ मिळणार आहे हे निश्चित. याशिवाय आणखीही दहा अभ्यासकांनी शरद जोशी यांच्या वैचारिक मांडणीचा आणि जीवनाचा अभ्यास करून लिखाण केले तरी त्यांचा परिपूर्ण जीवनालेख व त्यांच्या कार्याचे महत्त्व सांगून पूर्ण होणारे नाही असे वाटते.

ज्या कुटुंबाने आपल्या पाच-सात पिढ्यांत शेती केलेली नव्हती. अशा उच्चकुलीन समजल्या गेलेल्या ब्राह्मण कुटुंबात शरद जोशी यांचा जन्म झाला. आयुष्याच्या चाळिशीनंतर अतिशय सुखासीन जीवन त्यागून कोरडवाहू शेती करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. एकप्रकारे जाणीवपूर्वक हाती कटोरा घेण्याचेच व्रत आरंभिले. पुणे जिल्ह्यातील आंबेठाण या खेडेगावात २२-२३ एकर कोरडवाहू जमिनीचे क्षेत्र घेऊन शेतीच्या प्रयोगाला सुरुवात केली. स्वत:च्या अर्थशास्त्रीय अभ्यासाच्या परिपुष्ठतेसाठी प्रत्यक्ष अनुभूती घेण्याकामी त्यांनी सुरू केलेला हा प्रयोग एक प्रकारे ज्ञानयज्ञ होता हे कालांतराने सिद्ध झाले. शेती करायला सुरुवात केल्यानंतर अल्पावधीतच हा कसा आतबट्ट्याचा व्यवहार आहे हे त्यांच्या अनुभवाला आले. आपला शेतीचा उद्योग फायदेशीर होण्यासाठी अन्य काही पर्यायांचा (शेतीपूरक कुक्कुटपालन, सामुदायिक शेतीचा प्रयोग) अवलंब करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तथापि त्यातही त्यांना यश लाभले नाही. आजूबाजूला पिढीजात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांशी आपल्या अनुभवांची पडताळणी सुरू असताना अनेक कारणामुळे शेतीउद्योग तोट्याचा अर्थात अधोगतीला जाणारा होतो आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या अस्मानी आणि सुलतानी स्वरूपाच्या दोनही कारणांचा त्यांचा शोध सुरूच होता. शेतकऱ्यांना या संबंधीचे वास्तव पटवून देण्यासाठी शरद जोशी यांचे प्रयत्न सुरू झाले. शेतीउद्योगातले वास्तव आणि त्यावरील उपाय म्हणून शेतकऱ्यांचे संघटित प्रयत्न याचे महत्त्व त्यांनी जाणले. चुकीचे नियोजन, बाजार व्यवस्थेतील सरकारी चुकीचे धोरणे यात बदल घडवून आणण्यासाठी त्याविरुद्धचा संघटीत संघर्ष अपरिहार्य दिसू लागला. परंतु सगळ्यात मोठा प्रश्न होता तो विखुरलेल्या शेतकरी घटकाला संघटीत करण्याचा. आपण कष्ट करून निर्माण केलेल्या शेतमालाला आपण स्वत:च भाव मागून घेतला पाहिजे, याची जाणीव शेतकऱ्याला नव्हती. एकतर शेतकरी आपल्या उत्पादन खर्चाचे गणित नीटपणे मांडीत नव्हता. या उद्योगात आलेल्या नवनवीन तंत्रज्ञानाची त्याला माहिती नव्हती. आणि ते अवलंबण्याची त्याची आर्थिक कुवतही नव्हती. शेतीमालाचे मूल्य ठरविण्याची पद्धतिसुद्धा संपूर्णपणे चुकीची होती, ही पद्धती त्यांना समजावून देणे आवश्यक होते. त्यासाठी शरद जोशी यांनी स्वत: शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून ते समजावून देण्याचा प्रयत्न केला. एकप्रकारे अग्नीदिव्यच होते ते. पहिला प्रयोग त्यांच्या मनात निश्चित झाला. चाकण परिसरात त्यावेळी शेतकऱ्यांचे कांदा हे महत्त्वाचे पीक होते. अनुकूल वातावरण लाभून उत्तम पीक होत असे. दरवर्षी या पिकांचे उत्पादन वाढत होते. चाकण आणि अन्य बाजारपेठेतून माल पाठविला जाई. योग्य भाव मात्र कधीही मिळत नव्हता. आणि शेतकरी अडचणीत येत होता. स्वत: कांद्याचे उत्पादन शरद

जोशीही घेत होते. त्यांनाही हाच अनुभव होता. १९८० साली चाकण बाजारात कांद्याचे भाव नीचांकी म्हणजे २०-२५ पैसे किलो इतके खाली आले. शरद जोशी यांनी कांद्याला भाव वाढून मिळावा म्हणून ऐतिहासिक असे कांद्याचे आंदोलनाची घोषणा केली. स्वत: त्यासाठी उपोषण केले. कांद्याच्या भावाचे गणित शेतकऱ्यांना अगोदरच समजावून दिले गेले होते. त्यामुळे या भागातील शेतकरी स्वंयस्फूर्तीने आंदोलनाची वेगवेगळी तंत्रे वापरून आंदोलनात सहभागी झाले. सरकारला आंदोलनाची दखल घ्यावी लागली. कांद्याला भाव वाढून मिळाला आणि सरकारी यंत्रणेमार्फत वाढीव दराने कांदा खरेदीचा निर्णय कार्यवाहीत आला. फार मोठे असे हे ऐतिहासिक यश होते. या आंदोलनाच्या प्रसंगाने जे मंथन झाले त्यातून शरद जोशी यांनी संघटनेच्या दोन मूलभूत सिद्धांताची मांडणी केली. पहिला सिद्धांत होता, शेतीमालाला उत्पादन खर्च भरून निघेल इतका तरी किमान भाव मिळालाच पाहिजे आणि दुसरा शेतकऱ्याला त्याच्या घामाचे योग्य मूल्य मिळालेच पाहिजे. शेतकऱ्यांच्या मन आणि विचारांची केलेली मशागत फळाला येत असल्याचा अनुभव अपेक्षेप्रमाणे आला असे शरद जोशींना वाटले. आणि १९८०च्या दशकात ऊस आंदोलन(निफाड १९८०), तंबाखूच्या भावाचे आंदोलन(निपाणी १९८१), दूध आंदोलन(१९८२), राजीवस्त्र विरोधी आंदोलन(१९८५), कपासीच्या भावाचे आंदोलन(सुरेगाव १९८६), दारू दुकानबंदी आंदोलन(१९८९) अशा प्रकारची विविध आंदोलने झाली आणि शेतकऱ्यांचा असंतोष वाढत गेला. महाराष्ट्रातच नाही तर अन्य प्रांतातही या आंदोलनाचे पडसाद घुमू लागले. झोनबंदी विरोधी आंदोलन, ऊस परिषद, ज्वारी परिषद, धान-गहू यासाठी भावाचे आंदोलन(१९९७ पंजाब हरियाना) यातून सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी शेतकरी रस्त्यावर उतरला. याचबरोबर शरद जोशी यांच्या प्रचारयात्रा, प्रशिक्षण शिबिरे संघटनेच्या महिला आघाडी बांधणीचे चांदवडचे विशाल ऐतिहासिक अधिवेशन, लक्ष्मीमुक्तीसाठीचे अभियान या कार्यक्रमांनी वातावरण चांगलेच ढवळून निघाले. देशाला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झाली. राजकारण्यांचा उत्सवाचा नाटकी आवेश सुरू असताना देशातील वास्तव परिस्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी शरद जोशी यांनी ''जनसंसद'' भरविण्याचा निर्णय घेतला. आंबेठाणला संघटना कार्यकारिणीची बैठक होऊन साहेबांनी आपली कल्पना विषद केली. अमरावतीला जनसंसद घेण्याचा निर्णय झाला. जनसंसदेच्या खर्चासाठी निधीची सुरुवात साहेबांनी त्यावेळी खिशातून दहा हजार देवून स्वत:पासूनच केली. तन-मन-धन हे सर्वस्वाने संघटना उभारणीसाठी साहेबांनी दिले आहे. या मंथनातून स्वातंत्र्य का नासले? हा दस्तऐवज तयार झाला.

डंकेल प्रस्तावाला देशभर विरोधी सूर असताना या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी राज्यभर दौरा करून शरद जोशी यांनी आपली भूमिका शेतकरी, उद्योजक व व्यापाऱ्यांपर्यंत पोहोचवली. अखेरीस भारत सरकारने गॅट करारावर सही केली हे आपण पाहिले.

शेतकरी संघटनेचे प्रत्येक अधिवेशन हा एक ज्ञानयज्ञ होता. खुल्या मैदानात लाखो शेतकरी पाईक बसलेले. स्टेजवर माईकसमोर शरद जोशी, त्या त्या वेळच्या देशातील आणि जागतिक पातळीवर सुरू असलेल्या घडामोडींचे सखोल चिंतन सोप्या मराठीत मांडीत. मांडणीतील विश्लेषण व मूल्यमापन इतके अचूक आणि बिनतोड होई की कुणालाही मनात कसलीही शंका किंवा प्रश्न उरत नसे. मला वाटते, अॅडम् स्मिथ, माल्थस ही अर्थशास्त्रातील बाप मंडळी आणि त्यांच्या वंशावळीतील अर्थशास्त्रज्ञ आपले सिद्धांत बदलत्या संदर्भात शरद जोशी यांच्या तोंडून पुन्हा प्रस्तावित करताहेत इतके ते परिणामकारक होई. अधिवेशनात नव्या आंदोलनाची घोषणा केली गेली की, मैदान घोषणांनी दणाणून जाई. नव्या उमेदीने संघटना पाईक आंदोलनाच्या तयारीला अर्थात युद्धाला बाहेर पडत.

आंदोलनाची अशी देदिप्यमान परंपरा सर्वांनी अनुभवली आहे. संघटनेच्या या असंतोषाने बिथरलेल्या सरकारांनी अनेक प्रकारच्या अनैतिक आयुधांचा वापर करून संघटना पाईकाना आणि नेतृत्वाला जेरीस आणण्याचे कुकर्म पार पाडले. अनेक संघटना कार्यकर्त्यांचे रक्त त्याकामी सांडले याचा इतिहास सर्वांनी अनुभवला आहे.

शरद जोशी स्वत:च स्वत:चे उत्तम समीक्षक होते. कर्जमुक्त शेतकरी हे आपले अंतिम ईप्सित अजून खूप दूर आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणूनच त्यांनी स्वत: म्हटल्याप्रमाणे संघटनेच्या आंदोलनाचा इतिहास हा अर्धसत्य आहे आणि अर्धसत्य नेहमीच धोकादायक असते असे त्यांचे विश्लेषण आहे. पूर्ण सत्य अर्थात अंतिम यश अवघड असून त्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची तयारी होती. शेतकऱ्यांसाठी हे दुसरे स्वातंत्र्ययुद्ध आहे आणि हे युद्ध जिंकण्यासाठी तेवढेच कठोर बलिदान द्यावे लागणार, याची मांडणी साहेबांनी केली आहे. तथापि ती भूमिका समजून घेण्यासाठी आम्ही कमी पडलो की काय असे म्हणावे लागेल. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थ जो शरद जोशी यांना अभिप्रेत होता तो त्यांच्या अनुयायांना पूर्णपणे समजलेला नाही हे म्हणणे धाडसाचे ठरू नये.

– ३ –

आज स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर देशात शेतकरी दररोज वाढत्या संख्येने आत्महत्या करीत आहे. सामाजिक व राजकीय व्यवस्थेत याविषयीची जाणीव पूर्णपणाने बोथट झाली

असल्याचे वातावरण सर्वत्र आहे. खरेतर या कालावधीत भारतीय शेतकऱ्याने अनेक विक्रम केले. जगातील अनेक देशापुढे अन्नधान्यासाठी झोळी पसरणारा देश अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण केला. उत्पादन निश्चितपणाने वाढले. परंतु हे उत्पादन करणारा उत्पादक शेतकरी कंगाल होत गेला आणि आत्महत्या करू लागला; याची गंभीर दखल देशाने घेतली नाही. यासंदर्भात केले जाणारे लेखन आणि होत असलेल्या चर्चा ऐकताना किती संवेदनहीन पातळीवर ही व्यवस्था पोहोचली आहे, याचे आश्चर्य वाटू लागते. कोणत्या पक्षाच्या राजकीय कालखंडात किती शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आणि कोणत्या पक्षाच्या काळात त्याचे प्रमाण कसे कमी झाले याचीच चर्चा वर्षानुवर्षे राजकीय पक्षांचे विद्वान प्रवक्ते आणि नेते करताहेत आणि स्वत:च स्वत:ची पाठ थोपटून घेऊन समाधानात मिरवताहेत. शेतकऱ्याच्या आत्महत्या सुरू झाल्यानंतर आजपर्यंत किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्याची निश्चित गणती, त्याची मुलभूत कारणमीमांसा याचा शोध घेण्याची तीव्रता राज्यकर्ते दाखवित नाहीत. उलट वेगवेगळी कमी-जास्त आकड्यांची गणिते मांडून त्यातच आपल्या कर्तृत्वाची धन्यता मानताना दिसताहेत. दि. २३/८/२०१६ ची घटना. झाडाच्या एका फांदीला शेतकरी वडिलांचे फाशी घेतलेले शरीर लटकलेले आहे आणि त्याच झाडाच्या दुसऱ्या फांदीला त्याच्या तरुण मुलाचे फाशी घेतलेले शरीर लटकले आहे. याची कोणती प्रतिक्रिया उमटली समाजात?

वर्तमानपत्रात एका कोपऱ्यात आलेली चार ओळींची बातमी. एखादा फडतूस व्यंगचित्रकाराने फडतूस राजकीय विषयावर केलेल्या व्यंगचित्राला जेवढी प्रसिद्धी प्रसारमाध्यमे देतात तेवढीही जागा या विदारक घटनेला समाजात राहिली नाही. राजकीय प्रवक्ते, नेते यांना चर्चा करताना याची कोणतीही शरम वाटताना दिसत नाही. आजचे महाराष्ट्रातले फडणवीस सरकार कर्जमाफी केल्याची दिवाळी आनंदाने साजरी करीत आहे. एक नवीन अफलातून कल्पना त्यासाठी त्यांनी शोधून काढली आहे. हा उत्सव, मंत्रालयात व अन्य ठिकाणी; या गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याला बोलवून कर्जमाफीचे सन्मानपत्र देऊन साजरा केला जात आहे. आश्चर्य वाटते, कष्ट करून घाम गाळणाऱ्या आणि अनेक पटींनी उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला कर्जमाफी दिली जातेय आणि तीही सन्मानपत्र देऊन! शेतकऱ्याने उत्तम फ्रेम करून अभिमानाने घरात लावण्यासाठी ही प्रमाणपत्रे वापरायची काय? ज्यामुळे त्या शेतकऱ्याच्या भावी पिढ्यांनी आपल्या गुन्हेगार वाड-वडिलांना मायबाप सरकारने कर्जमाफ करून माफी दिली याचा इतिहास गात बसावे, अशी राजकर्त्यांची आणि त्यांच्या पाठीराख्यांची इच्छा आहे काय? यापेक्षा अधिक कोणत्या कोणत्या मार्गाने शेतकऱ्यांची चेष्टा सरकारला करायची आहे, माहिती नाही, आणि म्हणूनच सुप्रीम कोर्टाने या संदर्भात या देशातल्या सरकारांनी चुकीची शेती धोरणे अवलंबल्याचा आणि शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर शेतकऱ्याला कर्जमाफी देणे हा उपाय योग्य नसल्याचा काढलेला निष्कर्ष सरकारांनी गांभीर्याने घेतलेला दिसला नाही. खरेतर या पार्श्वभूमीवर या देशात कृषी धोरणासाठी आर्थिक आपत्तीजनक परिस्थिती जाहीर करून विशेष उपाय अवलंबण्याची आवश्यकता आहे. एक प्रकारे आर्थिक आणिबाणी जाहीर करून कठोर आर्थिक नियोजन त्याकामी गरजेचे आहे.

मी स्वत: शेतकरी कुटुंबातला घटक आहे आणि मला त्याचा कायम अभिमान वाटत आला आहे. अर्थशास्त्रातले थोडेफार कळत असले तरी अर्थशास्त्री किंवा अभ्यासक नाही. मात्र आयुष्यातला महत्त्वाचा काळ शरद जोशी यांच्या सान्निध्यात राहाण्याची संधी मिळाली. अखेरच्या श्वासापर्यंत हा माणूस शेतकरी आत्महत्या थांबविता येत नाही, याची वेदना आणि त्यासाठी आवश्यक असणारी शेतकऱ्याची कर्जमुक्ती हे साध्य गाठता आले नाही, असे घोकत होता हे मी अनुभवले आहे. ही वेदना घेऊन शेतकऱ्याच्या कोणत्यातरी पापाचे ओझे स्वत:च्या डोक्यावर मारून हा अश्वत्थामा काळाच्या पडद्याआड गेला. शेतकऱ्याच्या डोक्यावर स्वातंत्र्यानंतर जी कर्जे आली ती चुकीच्या सरकारी आर्थिक धोरणाचा परिणाम आहेत आणि म्हणून ती सर्व अनैतिक आहेत. या अनैतिक कर्जातून शेतकऱ्याला कर्जमुक्ती हाच एकमेव मार्ग आहे, हे गणिताने शरद जोशी यांनी सिद्ध केले तरी त्याची गंभीर दखल राज्यकर्त्यांनी घेतलेली नाही; इतके आम्हाला निश्चितपणाने समजले आहे.

शेतमालाचे रास्त भाव हा एक कलमी कार्यक्रम दिसायला साधा सोपा पण आमुलाग्र परिवर्तन घडवून आणणारा असून, आजपर्यंतच्या सर्व सामाजिक-अर्थशास्त्रीय विचारांचे सर्व संदर्भ बदलून टाकणारा आहे; या विचाराच्या वेगवेगळ्या अंगाचे, वेगवेगळ्या परिणामांचे परीशीलन जाणत्यांनी केले पाहिजे अशी आपली अपेक्षा खुलेपणाने शरद जोशी यांनी आपल्यासमोर मांडली आहे. शेतीमालाच्या रास्त भाव मागणीसाठी संघटनेने केलेली विविध आंदोलने ही संघटनेने मांडलेल्या विचारांच्या स्पष्टीकरणार्थ दाखविलेले प्रात्याक्षिके आहेत, अशीच त्यांची मांडणी होती. प्रत्यक्ष शेती करणारा शेतकरी व शेती व्यवसायाशी निगडीत सर्व घटकांना या व्यवसायातील येणाऱ्या आव्हानांचा सक्षमपणे मुकाबला करता यावा, यासाठी अनेक प्रयोगांची मांडणी शरद जोशी यांनी केली. त्याची सर्वांगांनी चर्चा झालेली नाही. त्याचा नव्याने अभ्यास होण्याची आवश्यकता आहे.

पारंपरिक शेती व्यवसायाच्या जोडीला प्रक्रिया उद्योग, व्यापारी शेती व्यवस्थापन आणि शेतीव्यवसायाशी निगडीत हातांना अधिकचे काम या उद्दिष्टांनी मांडलेली चतुरंग शेतीची संकल्पना.

शेती व्यवसायातील कल्पकता आणि गुणवत्ता यांचा वापर करून निर्माण होणाऱ्या मालासाठी स्वत: उभारलेली मॉलची चैन यांची उभारणी याकामी मांडलेली शिवार ॲग्रोची प्रा. लि. कं. संकल्पना.

शेतकऱ्याला उद्योजक बनविण्यासाठी आणि सरकारच्या जमीन संपादन कायद्याला समर्थ पर्याय निर्माण करून, ग्रामीण भारतात उद्योगाची उभारणी करण्याच्या उद्देश्याने मांडलेली भामा उद्योगनगरी उभारणीची संकल्पना.

जागतिक अर्थव्यवस्थेने निर्माण होणाऱ्या आव्हानांना आणि तंत्रज्ञानाने प्रगत होत जाणाऱ्या शेती व्यवसायाच्या पायाभरणीसाठी सुरू केलेली शेतकरी संघटना कॉम्प्युटर नेटवर्क (संगणक साक्षरता) मोहीमेची संकल्पना.

भविष्यात जगासमोर उभा ठाकलेल्या इंधन समस्येवर आपला देश स्वयंपूर्ण करण्याबरोबरच शेतकऱ्याला समृद्धीकडे नेण्याची क्षमता असणाऱ्या इथेनॉल (शरद जोशी यांनी 'शेततेल' म्हटलेल्या) निर्मितीची संकल्पना.

या संकल्पना संघटना पाईकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शरद जोशी यांनी प्रचंड परिश्रम घेतले. आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा वेळ याकामी खर्ची घातला. इतकेच नाही, फार मोठा अर्थिक भुर्दंडही सोसला आहे. शेतकरी घटकाची बधिरता किती टोकाची आहे; याचा जो अनुभव 'भामा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. कंपनी'च्या उभारणीच्या वेळी आला. तो अत्यंत विषण्ण करणारा होता. दोन-तीन वर्षे सातत्याने शरद जोशी यांनी या प्रयोगाच्या उभारणीसाठी कष्ट उपसले. आंबेठाणला नियमित बैठका, गावोगावी फिरून सर्व शेतकरी सदस्यांपर्यंत माहिती पोहोचवणे, उद्योग व्यवसायतले तज्ज्ञ, तांत्रिक माहिती तज्ज्ञ यांचे सहाय्य, राजकीय व्यवस्थेला माहिती पुरविणे, प्रकल्पासाठी आर्थिक व कायदा यादृष्टीने यंत्रणा उभारणे असा सगळा खटाटोप यासाठी करावा लागला आहे. अनेकांनी आपले आर्थिक व अन्य स्वरूपाचे नुकसान सहन करून साहेबांनी मांडलेल्या या भविष्यातल्या पथदर्शक प्रयोगासाठी त्यांच्याबरोबर काम केले. संघटनेच्या वाटचालीतले हे एक स्वतंत्र मांडणीचे प्रकरण आहे. त्यावेळच्या महाराष्ट्र राज्य सरकारने संघटनेच्या या मागणीला सकारात्मक पाठिंबा व्यक्त करून कार्यवाही केली. तथापि या प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या कुटुंबा-कुटुंबातील, गावा गावातील शेतकऱ्यांचे असलेले दुराग्रह - अडचणी आणि या प्रकल्पाच्या संपूर्ण माहितीचे अज्ञान यातून मार्ग निघू शकला नाही आणि या वाटचालीत विघ्न येत गेली.

'शेतकरी संघटना कॉम्प्युटर नेटवर्क' या संगणक साक्षरता प्रयोगाच्या अयशस्वितेसाठी, या योजनेत निवड करण्यात आलेल्या संघटना पाईक कार्यकर्त्यांची अकार्यक्षमता कारणीभूत ठरली आहे.

शरद जोशी यांनी व्यापक हेतू दृष्टीसमोर ठेवून प्रबोधनाची व शेतकऱ्याला उद्योजक बनविण्याच्या हेतूने सुरू केलेली हे चळवळ नव्याने अभ्यासण्याची गरज आहे, असे वाटते.

शेत जमीनीचे मालक असणाऱ्या शेतकऱ्याच्या संमतीशिवाय त्याची जमीन सरकारला कोणत्याही कारणासाठी घेता येणार नाही. त्याचप्रमाणे शेती करण्याची इच्छा नसणाऱ्या शेत जमीन मालकाला आपले क्षेत्र उचित किंमतीला हस्तांतरीत करण्याची मुभा देऊन दुसऱ्या व्यवसायात जाण्यासाठी स्वातंत्र्य मिळावे अशी संघटनेची भूमिका आहे.

शेतकऱ्याला सन्मानाने या देशात जगता आले पाहिजे, उभा राहता आले पाहिजे ही शरद जोशी यांची तळमळ होती. असे कर्तृत्व कुणा संघटना पाईकाने केले तर त्याचे त्यांना अत्यंत कौतुक वाटे, समाधान वाटे. अशा काही संघटना पाईकांमध्ये मी स्वत:ही आहे, याचा मला निश्चित आनंद आहे. अल्पसे का होईना समाधान शरद जोशी यांना मला देता आले.

खेड तालुक्यात चाकणजवळ अनेक गावातून महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने हजारो एकराचे जमीनीचे क्षेत्र संपादित केले. या प्रकल्पातला मी प्रकल्पबाधित शेतकरी आहे. माझ्या कुटुंबाचे आणि माझे स्वत:चे असे मिळून बरीच जमीन क्षेत्र महामंडळाने संपादित केले. सरकारी हिशोबाने मिळालेली जमीनीची किंमत आणि नव्याने करण्यात आलेल्या कायद्याप्रमाणे विकसित क्षेत्रातले काही थोडे क्षेत्र प्रकल्पग्रस्त म्हणून मला मिळाले. बराच संघर्ष या संदर्भात करावा लागतो. जमीनीचा मोबदला म्हणून मिळालेली रक्कम आणि बँकेकडून कर्ज उभारून मी या परतावा म्हणून मिळालेल्या प्लॉटवर हॉटेल प्रोजेक्ट उभा केला. या प्रकल्पाचे उद्घाटन, प्रकृती ठिक नसतानाही उपस्थित राहून स्वत: शरद जोशी यांनी केले. माझे व माझ्या मुलींचे कौतुकही केले. त्यानंतर आंबेठाणला जाताना निदान दोन-तीन महिन्यातून एकदा ते या हॉटेलवर येत आणि समाधान व्यक्त करीत. शरद जोशी यांचा ८० वा वाढदिवस हॉटेलवरच साजरा झाला. त्या दिवशी त्यांनी हॉटेलवरच मुक्काम केला. शरद जोशी यांचा हा अखेरचा वाढदिवस.

हॉटेलच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना शरद जोशी यांनी 'शाम पवार यांनी या प्रकल्प उभारणीस आलेले आपले अनुभव लिहून काढावेत, ज्यामुळे ते वाचून इतरांना मार्गदर्शक ठरू शकतील' अशी जाहीर सूचना केली. साहेबांच्या सूचनेची

अंमलबजावणी करण्याची अजूनही मला हिंमत होत नाही. कारण मला प्रश्न आहे. एम.आय.डी.सी, शासनाचे महसूल खाते, मंत्रालयातले अनुभव, पोलीस खात्याचे अनुभव किती खरे आणि कसे नमुद करणार. दडवून-लपवून लिहायचे असतील तर ते न लिहलेलेच चांगले, असे वाटून मी शांत आहे आणि साहेब नसल्यामुळे तगादा लावणारेही कुणी नाही हे चांगले आहे. या प्रकल्प उभारणीत अखेरच्या टप्प्यात शरद जोशी, महाराष्ट्र बँक, महाळुंगे शाखा व्यवस्थापक, अभिषेक, पुणे ग्रामीण पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी, राम जाधव व डॉ. जय जाधव यांनी मद्तीचा हात दिला याचा उल्लेख केला नाही तर मात्र ते कृतघ्नपणाचे होईल इतकेच नमूद करतो.

शरद जोशी यांनी मृत्यूपूर्व आपले इच्छापत्र केले. त्यानुसार केलेल्या, विश्वस्त मंडळाच्या हाती त्यांनी आपली कोट्यावधीची स्थावर जंगम मालमत्ता सूपूर्द केली आहे. ज्यायोगे आपले कार्य पुढे चालूच राहिल. मात्र यासंदर्भात आलेले दोन अनुभव या ठिकाणी नमूद करतो ज्यामुळे समाजातला कृतघ्नपणा आणि हीन मनोवृत्ती याची कल्पना येते.

शरद जोशी हयात असताना शांत असलेल्या, ज्यांनी त्यांना जमीन विकली त्या कुटुंबातले काही लोकांनी शासनाच्या खात्याकडे खोट्या स्वरूपाचे तक्रारअर्ज करून ट्रस्टच्या नावे नोंदी करण्याकामी अडथळे निर्माण केले. आणि त्यामुळे महिना-दोन महिन्यात होणारी कामे २ वर्षे रेंगाळत राहिली. याच्यापुढची कडी केली ती सरकारी सेवेतल्या महाभागांनी. जमिनीच्या नोंदी प्रकरणात तलाठी हा सर्वात महत्त्वाचा आणि मूलभूत घटक. वर्षभर आम्ही त्यांच्याकडे हेलपाटे मारले. या कामासाठी सरकारी खात्याशी संबंधित एका माझ्या मित्राची मी मदत घेत होतो. साहेबांच्या कार्याबद्दल त्याला अत्यंत आदर होता. तोही मनापासून सहाय्य करी. नोंदी करण्याच्या अखेरच्या टप्प्यात तालुक्याच्या ठिकाणी आम्ही तिघेजण तलाठी/ मंडलाधिकारी यांच्याकडे गेलो. आमचा (गैर) समज होता, शरद जोशी व संघटना यांचे काम असल्यामुळे या मंडळीची काही वेगळी(!) अपेक्षा नसणार. त्यामुळे महसूल खात्याचा चांगला अनुभव असूनही मी गाफील राहिलो. संगणकावर नोंद करण्याच्या वेळी त्या महोदयांनी माझ्या मध्यस्थ मित्राच्या कानात सांगून काही अपेक्षा व्यक्त केली. त्यालाही आश्चर्य वाटले असावे. भीत-भीत त्याने मला ती बाब सांगितली. आमचा नाइलाज होता. आम्ही तिघांनी आपापल्या खिशात असलेली माया एकत्र केली आणि त्या महोदयांच्या मागणीप्रमाणे त्याला देऊन टाकली. त्यानंतर ती नोंद पूर्ण झाली असा संदेश आम्हाला पोहोचला.

ज्या व्यक्तीच्या कर्तृत्वाने आंबेठाणसारख्या गावाचे नाव जगाच्या नकाशावर पोहोचले. ज्यांच्या विचारांची मुद्रा एका कालखंडावर नोंदली गेली. त्या महान व्यक्तित्वाच्या कार्याविषयीची ही सार्वत्रिक उदासिनता. यदुनाथ थत्ते यांच्या उद्गारांची मला याप्रसंगी आठवण झाली. श्रेष्ठ विचारवंत नरहर कुरूंदकर यांच्याविषयी बोलताना एकदा यदुनाथजी म्हणाले होते, 'हा माणूस जर अन्य दुसऱ्या देशात झाला असता तर त्या देशातल्या लोकांनी त्यांच्या प्रवासासाठी हेलिकॉप्टरची सोय करून दिली असती; परंतु आपल्याकडे हा माणूस एस.टी., रेल्वे या साधनांनी प्रवास करतो; कधी-कधी रात्र-रात्र स्टेशनवरच थांबून पुढचा प्रवास करतो.' साहेब! याच आपल्या भारत देशाचा मी एक दुर्भागी नागरिक आहे.

- ४ -

दिनांक २७,२८, २९ व ३० जानेवारी २००५ या कालावधित जालना येथे झालेले संघटनेचे दहावे अधिवेशन आणि दि. १० नोव्हेंबर २००५ रोजी परभणी येथे झालेला 'रौप्य महोत्सवी मेळावा' या मैलाचा दगड ठराव्यात अशा सन २००५ मधील दोन महत्त्वाच्या घटना. संघटनेत नवे पर्व घेऊन आलेल्या महत्त्वपूर्ण घटना म्हणून उल्लेखनीय.

'सावध ऐका पुढल्या हाका' अशा निनादात, जल्लोषात तुतारी फुंकली गेली आणि उज्ज्वल भविष्याचे स्वप्न, नवी उर्जा घेऊन उभा ठाकलेल्या शरद जोशी यांच्या नेतृत्वाने उपस्थित संघटना पाईक कृतकृत्य झाले. दिपून गेले. पंचवीस वर्षांच्या खडतर व संघर्षमय वाटचालीनंतर नवनिर्मणाचे नवचैतन्याचे वारे वाहू लागल्याचे सगळ्यांच्या अनुभवाला आले. वयाची ७० वर्षे पूर्ण केली असतानाही शरद जोशी यांच्या प्रत्येक शब्दांतून व कृतीतून नवा प्रकाश, भविष्यकाळाचे भव्यदिव्य स्वप्न व्यक्त होताना जाणवत होते आणि शरद जोशी यांच्या व्यक्तित्वातील 'ऐशी कळवळ्याची जाती, करि लाभाविण प्रिती'' अशा वेगळ्या रूपात-अवतारात प्रतीत होताना जाणवत होते.

कृषी क्षेत्रात आलेले नव-नवीन तंत्रज्ञान, नवी दिशा, भविष्याची नवी आव्हाने आणि या सर्वांना सामोरा जाण्यासाठी संघटना पाईकांची तयारी, याकामी हा ज्ञानयज्ञ सुरू होता. शरद जोशी यांचे सखोल चिंतन, भविष्याचे अचूक दिशादर्शन याची अनुभूती यावेळी सर्वांनी घेतली. याच दिशेने वाटचाल करीत संघटनेची पुढची दोन अधिवेशने झाली.

दि. ८,९,१० नोव्हेंबर २००८ सालचे ३ दिवसांचे औरगांबाद येथे झालेले अकरावे अधिवेशन आणि त्यानंतरचे दि. ८,९,१० नोव्हेंबर २०१३ या कालावधीत चंद्रपूर येथे झालेले बारावे अधिवेशन; या अधिवेशनांची घोषणा होती, 'पुन्हा एकदा उत्तम होती.' शरद जोशी म्हणाले, 'कुणी म्हणतील, आंदोलनाची, रस्त्यावर उतरायची व तुरुंगात जाण्याची भाषा करणारे, शरद जोशी तंत्रज्ञानाची भाषा

करायला लागले, बिचारे दमले बरं कां! मी त्यांना सांगू इच्छितो, मी म्हतारा झालो हे खरे आहे, पण मी दमलो नाही, मी तुमच्यात आलो आहे, काळाशी सुसंगत ताजा विचार घेऊन आलो आहे, आणि तुम्हाला सावधही करायला आलो आहे.'

अत्यंत विपरित परिस्थितीत संघटनेचे अकरावे अधिवेशन औरंगाबाद येथे झाले. सन २००५ ते २००७ या कालावधीत शेतकऱ्यांच्या १ लाख ६० हजार आत्महत्या झाल्या. निराशेच्या गर्तेत ढकलल्या गेलेल्या शेती उद्योगाला नव-संजीवनी देण्याकामी आपल्यासोबतचे सैन्य घेऊन शरद जोशी यांची लढाई सुरू होती. इतक्या विपरीत परिस्थितीतही स्वत:वरील आणि आपल्या निष्ठावान संघटना पाईकांच्यावरचा त्यांचा विश्वास, त्यांच्या, 'बंदुकीच्या जोरावर जे जगतात ते बंदुकीनेच मरतात, आम्ही शेतकरी बंदुकीने जगणारे नाही, आम्ही आंदोलने केली, पण शांततापूर्ण मार्गांनी केली' या शब्दांतून व्यक्त झाला आहे. औरंगाबाद अधिवेशनाचे निमंत्रण देण्यासाठी स्वत: शरद जोशी यांनी संपूर्ण मराठवाडा, पुणे, धुळे, जळगाव, नासिक हे जिल्हे आणि उर्वरित महाराष्ट्राचा दौरा केला. सभा-सभातून आवाहन करून अधिवेशनाचे निमंत्रण, 'आत्महत्या करू नका; आज नाही तर उद्या कर्जफेड होईल' असा धीर देण्यासाठी नाही, तर शेती हा इतर कोणत्याही व्यवसायापेक्षा श्रेष्ठ आहे, हे आपल्याला पुन्हा एकदा दाखवून द्यायचे आहे, असे आवाहन या प्रेषिताने या वेळी केले.

या संपूर्ण दौऱ्यात आणि अधिवेशनाच्या तीन दिवसात शरद जोशी यांनी जे विचार मांडले, ते लेखन केले याची स्वतंत्रपणाने मांडणी करणे आणि त्याचा स्वतंत्रपणाने अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी नव्या संगणकीय युगाची भाषा समजून तिचा अवलंब करणारी नवी पिढी घडविण्याकामी हा सर्व खटाटोप सुरूच ठेवावा लागणार आहे.

हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाचे आणि जैविक तंत्रज्ञानाचे फायदे दिसू लागल्यानंतर आपल्यासमोर जे प्रश्न उभे ठाकले ते नवीन प्रश्न; जुन्या समस्या संपल्या तरी नवीन समस्या येतात आणि पहिल्यापेक्षाही त्या भयानक आहेत, त्यांचा सामना कसा करायचा याचे दिशादर्शन या अधिवेशनात झाले. त्याचबरोबर कोणतेही तंत्रज्ञान पूर्णत: निर्दोष असूच शकत नाही आणि एखाद्या तंत्रज्ञानाचे तोटे त्याच्यापेक्षा प्रगत तंत्रज्ञानानेच कमी करता येतात. आधीच्या तंत्रज्ञानाकडे माघारी जाऊन नाही; त्यामुळे प्रगत तंत्रज्ञानाची कास धरल्याने अर्थात पूजा करण्यानेच पुढे जाता येईल, अशी नवी दिशा दाखविणारे हे अधिवेशन. जे शेती करू इच्छितात त्यांनी शेती कशी करावी; याविषयी औरंगाबाद अधिवेशनात विशेष मार्गदर्शन झाले. हरित क्रांतीच्या पुढच्या चार तंत्रज्ञानाचा विचार व त्याची प्रात्याक्षिके या अधिवेशनात दाखविली गेली. इतकेच नाही तर 'शेतकऱ्यांनो जगायचे असेल तर एकच मंत्र जगा, तो म्हणजे ''एटी, ईटी, बी.टी. आणि आय.टी.'' असा संदेश या अधिवेशनाने अधोरेखित केला आहे. 'या ऐतिहासिक अधिवेशनाला तुम्ही काहीही झाले, तरी येणे चुकवू नका, नाही तर तुमची नातवंडे तुम्हाला हसतील आणि विचारतील, अरे, ते औरंगाबादचे अधिवेशन होते, आणि तुम्ही गेला नाहीत?' अशी कळकळीची विनंती या वेळी शरद जोशी यांनी केली.

जगद्‌गुरू तुकाराम महाराजांनी आपल्या एका अभंगात अज्ञानी मूढ जन आणि सुज्ञजन यांची व्याख्या समजून सांगताना, मूढ जनांची दगडाशी तुलना केली आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी माझा उपदेश नाही, तर सूज्ञ जनांना त्यांच्या उद्धारासाठी मार्ग मी दाखविला आहे, असा अभिप्राय नोंदविला आहे. माझ्या मताने, शरद जोशी यांनी 'पुन्हा एकदा उत्तम शेती' हा मंत्र अशाच सूज्ञ जनांच्यासाठी सांगण्याचा एवढा कष्टप्रद प्रवास केला आहे; असे आपल्याला वाटत नाही काय?

या अधिवेशनप्रसंगी दोन महत्त्वाचे इशारे कठोरपणे शरद जोशी यांनी आपल्या संघटना पाईकांना दिले आहेत. एक म्हणजे, 'जोपर्यंत शेतकऱ्यांचे खरे मित्र कोण आणि ढोंगी मित्र कोण, हे शेतकऱ्यांना समजत नाही तोपर्यंत कर्जमुक्ती होणार नाही, आणि म्हणून निदान शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती होईपर्यंत शेतकरी संघटनेतून जो कोणी फुटून निघेल तो आपला शत्रू आहे, असे समजा आणि त्याप्रमाणे त्याच्याशी व्यवहार करा.' मला वाटते, हिमालयाची उंची असलेल्या या माणसाने अनेकदा संघटना अखंड रहावी यासाठी आमची क्षमा मागितली आणि ती अव्हेरली गेली; याचे पापक्षालन करण्याची संधी जर गमावली गेली तर; इतिहासात शेतकऱ्यांचे मारेकरी अशी तुमची नोंद झाल्याशिवाय राहणार नाही. आणि शरद जोशी यांचे नाव घेऊन वेगवेगळ्या मार्गाने काम करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांचे स्वयंघोषित नेत्यांची आजची चाललेली धडपड ही केवळ त्यांच्या वैयक्तिक आस्तित्त्वासाठी चाललेली केविलवाणी धडपड असून त्याचा शेतकऱ्याच्या भल्यासाठी काहीही उपयोग होणार नाही; तर तो शेतकऱ्यांच्या प्रती द्रोह आहे असेच म्हणावे लागेल. दुसरे म्हणजे, सरकारे नेहमीच शेतकऱ्याशी दुष्टपणाने वागत आली आहेत; हा त्यांचा दृष्टपणा पुढे चालूच राहणार असेल. तर; शेतकऱ्यांना या लोकांवर अवलंबून राहून चालणार नाही. शेतकऱ्यांना अशा तऱ्हेने, वेगळ्या पद्धतीने शेती करावी लागणार आहे; की जिथे सरकार असो किंवा नसो, थोडी हिंमत दाखविली, थोडे वेगळे वागलात, अगदी निवडणुकीच्या वेळेस आपल्या जातीच्या उमेदवारांना मत देण्याचे जरी बंद

केले आणि शेतकरी संघटनेच्या उमेदवारांना आमदार आणि खासदार म्हणून मते मिळवून दिली, तरच तुम्हाला शेती चालविता येईल; दुसऱ्या कोणालाही मते दिली तर तुमची शेती टिकू शकत नाही.' हा इशारा देताना त्यांनी स्वत:विषयीची एक खंतही उघडपणे व्यक्त केली आहे. शरद जोशी म्हणतात, 'शेतकरी राजकीयदृष्ट्या संवेदनशील होऊ शकला नाही. कारण जितक्या प्रमाणामध्ये दलितांमध्ये डॉ. आंबेडकरांना राजकीय ध्रुवीकरण करता आले, त्या प्रमाणात, मी करू शकलो नाही, हे माझे मोठे अपयश आहे.' मला वाटते, हे अपयश शरद जोशी यांनी त्यांच्या स्वत:कडे घेतले असले तरी खऱ्या अर्थाने ते वैचारिक दौर्बल्याने ग्रासलेल्या आम्हा शेतकऱ्यांचे आणि वैयक्तिक महत्वाकांक्षेपोटी संघटनेचे तुकडे पाडण्यास कारणीभूत ठरलेल्या संधिसाधू तथाकथित पुढारी म्हणवून घेणाऱ्यांचेच अधिक आहे. आजची शेतकऱ्यांची आणि शेती क्षेत्राची अवनत परिस्थिती पाहता शरद जोशी यांनी दिलेल्या इशाऱ्यांच्याकडे अत्यंत गांभीर्याने पहाण्याची आवश्यकता आहे, असे आतातरी आपल्याला वाटत नाही काय? या ठिकाणी, मी ७० वर्षांपूर्वी दोन महान व्यक्तींनी दिलेल्या इशाऱ्याची, ज्याचा उल्लेख शरद जोशी यांनी १९९८ साली अमरावती येथे जनसंसदेच्या वेळी केलेल्या भाषणात केला आहे, त्याची पुनरूक्ती आपल्या आठवणीसाठी करतो.

भारताचे स्वातंत्र्य ज्यावेळी दृष्टीक्षेपात आले, त्यावेळी चर्चिलने असे म्हटले होते की, 'कृपा करा आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊ नका. कारण या तथाकथित अहिंसावादी चळवळीच्या मागे जे नेतृत्व तयार झालेले आहे ते कचकड्याचे आणि मेणाचे आहे. त्याला प्रशासनाची काही माहिती नाही. त्यांच्या हाती जर राज्य गेले तर जातीजातींमध्ये वैमनस्य माजेल, एकमेकांच्या रक्ताचे पाट वहातील. हिंदुस्थानातील गरिबांवर कृपा करा आणि त्यांना या नेत्यांच्या हाती सोपवू नका.' चर्चिलच्या तोंडीचे उद्‌गार म्हणून लोकांना वाईट वाटले. पण महात्मा जोतिबा फुल्यांनी काय सांगितले होते? त्यांनी सांगितले, जोपर्यंत जातीजातीतील वैमनस्य संपत नाही आणि समाजसुधारणा घडून येत नाही, त्याआधी जर कां देशाला स्वातंत्र्य मिळाले तर त्या स्वातंत्र्याचे स्वरूप पेशवाईचे होईल.' ब्रिटीशांनी चर्चिलचे ऐकले नाही. आपण महात्मा फुल्यांचे ऐकले नाही. पात्रता नसलेल्यांच्या हाती हा देश दिला गेला आणि लोकशाही किती हीन पातळीवर नेवू शकतो, हे आम्ही दाखवून दिले. आता शरद जोशी यांनी दिलेल्या इशाऱ्यांकडे आम्ही दुर्लक्ष केले, तर शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य अधिकच अंध:कारमय होईल आणि खऱ्या अर्थाने या देशातला अन्नदाता शेतकरी मारला जाऊन देश त्यांची स्मशानभूमी होईल. शरद जोशी यांनी दिलेली, 'ईडा पिडा टळणार आहे, बळीचे राज्य येणार आहे' ही घोषणा केवळ घोषणाच राहिल. ती फलद्रुप होणार नाही.

स्वातंत्र्योत्तर भारतात वेगवेगळ्या संघटना आणि राजकीय पक्षांनी शेतकऱ्यांच्या समस्या घेऊन लढे उभारले. त्यात शरद जोशी यांनी भारतीय शेतकऱ्याच्या समस्याविषयी आणि इथल्या राजकीय व्यवस्थेने अवलंबलेल्या विपरीत आर्थिक धोरणे यांचे नेमके विश्लेषण करून स्वत:ची वेगळी वाट तयार केली, जी अखेरीस जागतिक अर्थव्यवस्थेच्या महामार्गाला जाऊन मिळाली. भारतीय कृषी अर्थव्यवस्थेला व्यापक सैद्धान्तिक पाया शरद जोशी यांनी दिला; हे दुर्लक्षिता येणार नाही. तसे दुर्लक्ष करणे भारताला विनाशकारी ठरणारे आहे.

शरद जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे संघटनेत तीन मार्गांनी कार्यकर्ते आले. त्यातला पहिला वर्ग आहे भक्तीमार्गाने आलेल्यांचा, दुसरा आहे कर्ममार्गाने आलेल्यांचा आणि तिसरा ज्ञानमार्गाने आलेल्यांचा, यातल्या काहींनी व्यक्त केलेल्या त्यांच्याविषयीच्या प्रतिक्रिया बोलक्या आहेत. अरविंद वामन कुलकर्णी यांनी भारतीय अर्थशास्त्राचा क्रीयाशील जनक असा शरद जोशी यांचा गौरव करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी तुलना करताना, 'शेतकऱ्यांना सर्वार्थाने लाभलेला नेता' असा उल्लेख केला आहे. विनय हर्डीकर यांनी म्हटल्याप्रमाणे शरद जोशी, 'शेतकऱ्यांचे प्रतिभावान नेते आणि स्वतंत्रवादाचे खंदे पुरस्कर्ते' असल्याचा त्यांचा अभिप्राय. सुधाकर जाधव यांनी लिहिले, 'शरद जोशींचे वेगळेपण कोणते असेल तर ते म्हणजे त्यांनी समाजवादी विचाराच्या कैदेतून विचारकांची आणि सामान्यजनांची सुटका करण्याचा शतकातील सर्वात मोठा प्रयत्न आणि प्रयोग केला आणि त्यात ते कमालीचे यशस्वी झाले. डॉ. अविनाश धर्माधिकारी सांगतात, 'शरद जोशी यांना 'भारतरत्न' हा पुरस्कार दिला तरी तो त्यांच्या कर्तृत्वाच्या अनुषगांने कमीच आहे.' महात्मा फुले यांचा शेतकरी उद्धाराचा मार्ग अधिक व्यापक पायावर नवीन वैज्ञानिक दृष्टीकोनातून मांडण्याचा प्रयत्न शरद जोशी यांनी केला आहे. जगाला पुढील पंधराशे वर्षे पुरेल इतके विचारधन आपणा देऊन ठेवले आहे असे आत्मविश्वासाने म्हणणाऱ्या विवेकनंदाप्रमाणे जगातील शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याला वेगळे परिणाम, वेगळी दिशा देणारा माझा विचार असल्याचे शरद जोशीचे उद्‌गार, विवेकवादाचा कठोर पुरस्कर्ता असा अनेकांनी व्यक्त केलेला उल्लेख; भीकवादाचा तिरस्कर्ता, गांधीवादाचा चिकित्सक अभ्यासक आणि विश्लेषक, शेतकऱ्यांच्या असंतोषाचे जनक शरद जोशी. इत्यादी.

भारतीय शेतकरी व माय भगिनी अजूनही गुलामगिरीचे जीवन जगताहेत म्हणून आपला लढा हा शेतकऱ्यांचे दुसरे स्वातंत्र्ययुद्ध असल्याचे शरद जोशी यांनी म्हटले आहे. स्वातंत्र्याला त्याचे मोल द्यावेच लागते. आपले स्वातंत्र्याचे ध्येय

गाठण्याच्या मार्गावर त्यांची दौड वेगाने सुरू होती, आणि त्यामुळे त्यांच्यामागे धावताना संघटना पाईकांची दमछाक झाली. काही जणांनी वेगळे शॉर्टकट अवलंबण्याचा प्रयत्न केला. माझ्या मते असे शॉर्टकट शोधू पहाणारे हे आजच्या महाभारतातले अभिमन्यूच आहेत. ज्यांना चक्रव्यूहात शिरण्याचा मार्ग समजला होता परंतु ते भेदून त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग माहित नाही म्हणून ते त्यात अडकून संपणार आहेत. मात्र त्यातले दुर्दैव असे की ते इतरांना घेऊन त्यात जाताहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य लांबण्याचीच शक्यता अधिक आहे. ग्रामीण भागात काम करणारा मी एक कार्यकर्ता आहे, आणि त्यामुळे त्या ठिकाणी असलेली अगतिकता व विकृत मनोवृत्ती याचे घातक स्वरूप मला पदोपदी जाणवते. शरद जोशी यांनी दाखविलेला मार्ग सुस्पष्ट झाला नाही तर आमचे भवितव्य निश्चितच अंधःकारमय आहे. असे मला वाटते.

शेतकरी संघटनेचे कार्य सुरू होण्याअगोदरपासूनच माझा शरद जोशी यांचेशी संबंध आला. आणि शेवटी अखेरच्या दिवसापर्यंत त्यांचेशी माझा निकटचा संबंध राहिला आहे. संघटना बांधणी आणि त्यासाठी शरद जोशी यांनी मांडलेल्या विचाराने चालण्याचा मी प्रयत्न करीत आलो आहे. शेतकऱ्याला देशातील इतर नागरिकाप्रमाणे सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी शरद जोशी यांनी आयुष्यभर लढा दिला. शेतकऱ्याच्या आर्थिक आणि सर्वांगिण शोषणावरच या देशातला विकासाचा डोलारा उभारला जात असल्याचा त्यांचा सिद्धांत निश्चितच खरा आहे; असे म्हणता येते. सार्वजनिक जीवनात शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाने वाटचाल करीत असलेले शरद जोशी यांची वैयक्तिक जीवनातील अध्यात्मिक वाटचालही काही प्रमाणात मला पहायला मिळाली. आपल्या आयुष्याच्या अखेरीस शरीर विकलांग झाल्याने परावलंबित्व आल्यानंतर एका बाजूला आपल्या संघटनेच्या ध्येयासाठी वाटचाल आणि दुसऱ्या बाजूला आपल्या अंतरंगातील अध्यात्मिक तहान भागविण्याची चाललेली त्यांची पराकाष्ठा मी अनुभवली आहे. विशेष करून कुंडलिनी जागृती, योगाभ्यास याचा विचार त्यांच्या मनात कायम होता. त्याचा अनुभव आपल्याला घेता यावा असा त्यांचा प्रयत्न होता, असे मला खात्रीने वाटते. 'पुन्हा एकदा उत्तम शेती' हा त्यांच्या या आध्यात्मिक विचारांचाच एक वेगळे परिमाण घेऊन आलेला अविष्कार मला वाटतो. मला वाटते, ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली, अखेरीस सर्वांच्या कल्याणासाठी 'पसायदान' मागितले आणि आपल्या कार्याला पूर्णविराम दिला. आणि त्या मार्गाने चालण्याचा प्रयत्न आता प्रत्येकाच्या हाती आहे. त्याप्रमाणे आपल्या कार्याला एकप्रकारे स्वतःच्या मनातून निवृत्ती करण्यासाठीच शरद जोशी यांनी 'पुन्हा एकदा उत्तम शेती' हे शेतकऱ्यांसाठी पसायदान मागितले आहे.

**श्री. शाम पवार**
**महाळुंगे इंगळे**
**९८६०८९२९६७**

# शून्यातून विश्व

**विष्णूपंत छत्रे –**
घोड्याच्या पागांमध्ये चाबूकस्वार म्हणून तीन रुपये पगारावर नोकरी करत असताना स्वतःच स्वतःचा मार्ग शोधला. भारतातील पहिली ग्रेट सर्कस निर्माण केली .

**एम. एफ. हुसेन –**
मुंबईच्या फुटपाथवर सिनेमाची पोस्टर्स रंगवली. पुढच्या आयुष्यात त्यांची चित्रे शंभर कोटींना विकली गेली. भारतात चित्रकलेच्या इतिहासात एक नवा विक्रम नोंदवला गेला.

**कर्मवीर भाऊराव पाटील –**
कंदील आणि नांगराचे विक्रेते होते. कंदील, नांगर विकता विकता त्यांनी रयत शिक्षण संस्था निर्माण केली.

**यशवंतराव गडाख –**
अहमदनगर जिल्ह्यात घोडेगावला शिक्षक होते.मुलांना फळ्यावर मुळाक्षर शिकवता शिकवता त्यांनी शाळेच्या बाहेरचे जग बघितले. वयाच्या पंचविशीत सोनाईला मुळा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली.

**सुनील दत्त –**
रेडिओ सिलोनवर अभिनेत्यांच्या मुलाखती घेत असतानाच चित्रपट सृष्टीत प्रवेश झाला. अभिनेता व राजकारणी म्हणून समृद्ध आयुष्य जगले.

# भारतीय सणांचे अनर्थशास्त्र

त्या दिवशी भल्या पहाटेच चक्रधर माझ्याकडे आला होता. त्याला माझ्याकडून प्रवाशीबॅग हवी होती पंढरपूरला जायला. असा अचानक चक्रधर पंढरपूरला जायची तयारी करतोय हे ऐकून मी उडालोच. आदल्या दिवशीच माझे त्याच्याशी बोलणे झाले होते. एका खासगी कीटकनाशक कंपनीच्या कार्यक्रमाला चलतोस का म्हणून विचारले तर म्हणत होता की, त्याला निदान एक पंधरवडा तरी अजिबात फुरसत नाहीच. शेतीची आंतरमशागत करायचीय, फवारणी करायचीय, निंदन-खूरपण करायचेय. अर्थात तो खोटेही बोलत नव्हता. त्याचे शेत माझ्या शेतापासून थोड्याशाच अंतरावर असल्याने मला त्याच्या शेतीची आणि शेतीतील पिकांची इत्थंभूत माहिती होती.

चक्रधर शेती करायला लागल्यापासून पहिल्यांदाच त्याच्या शेतीत इतकी चांगली पिकपरिस्थिती होती. यंदा त्याने छातीला माती लावून सार्या गावाच्या आधीच कपाशीची धूळपेरणी उरकून टाकली होती. पावसानेही आपला नेहमीचा बेभरंवशाचा खाक्या सोडून चक्रधरला साथ दिली आणि त्याची कपाशीची लागवड एकदम जमून गेली. नशीब नेहमी धाडसी लोकांनाच दाद देत असते याची प्रचिती यावी असाच हा प्रसंग होता. त्यामुळे हुरूप आलेला चक्रधर दमछाक होईपर्यंत शेतीत राबायला लागला होता. त्याला विश्वास होता की, यंदा आपली इडापिडा टळणार आणि सावकाराच्या पाशातून मुक्ती मिळणार. भरघोस उत्पन्न आले आणि कर्मधर्म संयोगाने जर भावही चांगले मिळालेत तर ते अशक्यही नव्हते. त्यामुळे कीटकनाशक कंपनीच्या कार्यक्रमाला येत नाही म्हटल्यावर मलाही फारसे नवल वाटले नाही.

पण चक्रधर आता असा अकस्मात पंढरपूरला जायची तयारी करतोय हे मला अनपेक्षित होते. नेमके काय गौडबंगाल आहे हे जाणून घ्यायची माझ्या मनात उत्सुकता निर्माण झाली. मी प्रथम त्याच्या हातात प्रवाशी बॅग दिली, प्रवासाला शुभेच्छा दिल्या, येताना माझ्यासाठी पांडुरंगांचा प्रसाद घेऊन यावा, अशी विनंती केली आणि मग हळूच विचारले होते,

काय चक्रधर, असा अचानक कसा काय बेत आखला बुवा पंढरपूरचा?

आरं, मी कसला काय बेत आखतो पंढरीचा?तो पांडुरंगच मला बोलवायला आलाय ना स्वतःहून इति चक्रधर.

स्वतःहून थेट पांडुरंगच आला तुला निमंत्रण द्यायला? आश्चर्याने डोळे विस्फारून मी विचारले.

हं मग?इच्छा त्या पांडुरंगाची. दुसरं काय? चक्रधर निर्विकारपणे सांगत होता.

अरे, पण मी तर ऐकलंय की पांडुरंग निर्गुण-निराकार असतो. शिवाय तो बोलत पण नसतो या विषयातील आपले तुटपुंजे ज्ञान उगाळत मी बोललो.

तसं नाही रे, पंढरीचा विठोबा स्वप्नात आलाय तो त्या रावसाहेबांच्या माझ्या प्रश्नाचा उबग आल्यागत चक्रधर बोलत होता. पण आता मला संवाद थांबवणे शक्य नव्हते. माझी उत्कंठा शिगेला पोचली होती.

रावसाहेबांच्या स्वप्नात?रावसाहेब आणि तुला, दोघांनाही बोलावलं होय? मी प्रश्न फेकलाच.

आरं बाबा, तसं नाही रे. आत्ता पहाटेपहाटे विठोबा-रुक्मिणी दोघंबी रावसाहेबांच्या स्वप्नात आलेत आणि रावसाहेबांना आदेशच दिला की चक्रधरला तातडीने पंढरीला पाठवून दे. बिचारे रावसाहेब धावतपळत माझ्याकडे आलेत आणि म्हणालेत की, तू आताच्या आत्ता सकाळच्या गाडीने तातडीने पंढरपूरसाठी नीघ. मी पैशाची अडचण सांगायच्या आधीच रावसाहेबांनी माझ्या हातावर जाण्यायेण्याला पुरून उरतील एवढे पैसे पण ठेवलेत. लई मायाळू माणूस आहे बघा आपले रावसाहेब. माझ्या प्रश्नाच्या सरबत्तीला वैतागलेल्या चक्रधरने एका दमात सगळे सांगून टाकले आणि झपाझप पावले टाकत निघून गेला.

पंढरीची वारी करून चक्रधर जेव्हा परतला तेव्हा सारेच काही बदललेले होते. फवारणी अभावी कपाशीची वाढ खुंटून झाड खुरटले होते. मशागत व खुरपणी अभावी तणांची बेसुमार वाढ झाली होती. आल्याआल्या मशागत सुरू करावी तर पाऊस सुरू झाला होता. पाऊस नुसताच सुरू झाला नव्हता तर ठाण मांडून बसला होता. आकाशातील ढग पांगायचे नावच घेईना. म्हणजे झाले असे की, जेव्हा उघाड होती आणि मशागत करण्यायोग्य स्थिती होती तेव्हा चक्रधर पंढरपुरात होता आणि आता चक्रधर शेतात होता तर पावसामुळे मशागतीचे काम करणे अशक्य झाले होते. शेवटी तणाची वाढ एवढी झाली की शेतात जिकडेतिकडे गवतच गवत दिसत होते. कपाशी गवताखाली पूर्णपणे दबून गेली होती. त्यामुळे जे व्हायचे तेच झाले. एकावर्षात सावकाराच्या म्हणजे रावसाहेबाच्या कर्जाच्या पाशातून मुक्त व्हायची गोष्ट दूर, उलट कर्जबाजारीपणाचा डोंगरच वाढत जाणार होता.

रावसाहेब सावकार मात्र आनंदी होते. त्यांनी स्वप्न पडल्याची मारलेली थाप त्यांना मस्तपैकी कामी आली होती. ऋणको जर स्वयंपूर्ण झाला तर धनकोची दुकानदारी कशी चालेल? त्यासाठी ऋणको नेहमीच कर्जात बुडूनच राहावा, हीच धनकोची इच्छा असते. त्यासाठीच नाना तर्हेरच्या कप्त्या लढविण्याचे कार्य धनकोद्वारा अव्याहतपणे चाललेले असते.

मी जेव्हा ही गोष्ट अनेकांना सांगतो तेव्हा त्यांना सावकाराचाच राग येतो. कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढण्याचीही भाषा केली जाते मात्र शेतीच्या ऐन हंगामातच

पंढरपूरची यात्रा का भरते? याचे उत्तर कोणीच देत नाही. पंढरीच्या पांडुरंगाच्या भक्तवर्गामध्ये शेतकरी समाजच जास्त आहे. ज्या वेळी शेतकर्यांतनी आपल्या शेतीतच पूर्णवेळ लक्ष द्यायची गरज असते, नेमकी तेव्हाच आषाढी किंवा कार्तिकीची महिमा का सुरू होते? याचा धार्मिक किंवा पुराणशास्त्रीय विचार करण्यापेक्षा तार्किक पातळीवर विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

संपूर्ण भारतवर्षात शेतीचा हंगाम सर्वसाधारणपणे जून महिन्यामध्ये सुरू होतो आणि डिसेंबर मध्ये मुख्य हंगाम म्हणजे खरीप हंगाम संपतो. विचित्र गोष्ट अशी की, भारतातील सर्व मुख्य सण याच काळात येतात. जून मध्ये हंगाम सुरू झाला की शेतीच्या मुख्य खर्चाला सुरुवात होते. आधीच कर्ज काढून शेती करणार्या ला हे सण आणखीच कर्जात ढकलायला लागतात. या सणांच्या खर्चातून शेतकर्या ला बाहेर पडताच येणार नाही, अशी पुरेपूर व्यवस्था झालेली आहे, हेही ठळकपणे जाणवते. या काळात येणार्या सर्व सणांचे त्या-त्या सणानुरूप करावयाच्या पक्वान्नाचे मेनू ठरलेले आहेत. नागपंचमीला करंजी, लाडू, चकल्या कराव्या लागतात. रक्षाबंधनाला राखी बांधायला भावाने बहिणीकडे किंवा बहिणीने भावाकडे जायचेच असते. मग एकाचा खर्च प्रवासात होतो तर दुसर्याधचा पाहुणचार करण्यात. पोळा आला की बैलाला सजवावेच लागते. घरात गोडधड रांधावेच लागते. त्यातही एखाद्या चाणाक्ष काटकसरी शेतकर्या ने पोळ्यानिमित्त घरात पंचपक्वान्न करून खाण्यापेक्षा तेवढ्याच पैशात शेतामध्ये दोन रासायनिक खताची पोती घालायचे ठरवले तरी ते शक्य होत नाही कारण या दिवशी शेतकर्यूने आपल्या घरी गडीमाणूस जेवायला सांगणे, हा रितिरिवाज लावून दिल्या गेला आहे. परका माणूस घरात जेवायला येणार असल्याने पंचपक्वान्न करणे टाळताच येत नाही. अशा तर्हेनें शेतकर्यालला खर्चापासून परावृत्त होण्याचा मार्गच बंद करून टाकल्या गेला आहे. शिवाय पोळा हा तीन दिवसाचा असतो. वाढबैल, बैल आणि नंदीपोळा. हे तीन दिवस बैलाच्या खांद्यावर जू देता येत नाही. मग होते असे की जेव्हा उघाड असते आणि शेतात औतकाम करणे शक्य असते, त्यावेळेस पोळा असल्यामुळे काम करता येत नाही. पोळा संपला आणि जरका लगेच पाऊस सुरू झाला तर मग पावसामुळे काम करता येत नाही. कधी कधी या तर्हेतने आठवडा किंवा चक्क पंधरवडा वाया जातो. मग त्याचे गंभीर परिणाम पिकांना भोगावे लागतात.

हरितालिका, ऋषिपंचमी, मंगळागौर, कान्होबा, महालक्ष्मी-गौरीपुजन, श्रावणमास याच काळात येतात. आखाडी व अखरपख(सर्व पितृदर्श अमावस्या) या सणांचा मारही खरीप हंगामालाच सोसावा लागतो. गणपती बाप्पा आले की ठाण मांडून बसतात. शारदादेवी, दुर्गादिवी यांचे नवरात्र पाळायचे नाही म्हटले तर त्यांचा प्रकोप होण्याची भिती मनात घर करून बसली असते शिवाय यांना यायला आणि जायला गाजावाजा व मिरवणूक लागते. बाप्पांना दहा-पंधरा दिवस मोदक पुरवावेच लागतात. बदाम, नारळ खारका द्याव्याच लागतात. दुर्गादेवीची ओटी भरावीच लागते. ते संपत नाही तोच दसरा येतो, दसर्याबची नवलाई संपायच्या आधीच भुलोजी राणाच्या आठवणीने व्याकुळ झालेल्या भुलाबाई येतात. भोंडला, हादग्याला जुळूनच कोजागरी येते.

शेतीचा हंगाम अगदी भरात असतो. ज्वारी हुरड्यावर, कपाशी बोंडावर आणि तुरी फुलोर्याळवर येण्याला सुरुवात झालेली असते. अजून पीक पक्व व्हायला, बाजारात जायला आणि शेतकर्याच्या घरात पैसा यायला अजून बराच अवकाश असतो आणि तरीही आतापर्यंत डबघाईस आलेल्या शेतकर्यालचे कंबरडे मोडण्यासाठी मग आगमन होते एका नव्या प्रकाशपर्वाचे. दिव्यांची आरास आणि फटक्याच्या आतषबाजीचे. एकीकडे कर्ज काढून सण साजरे करू नये म्हणून शेतकर्या्ला वारंवार आवाहन करणार्या् शहाण्यांचे पीक येते मात्र दुसरीकडे हे सर्व सण शेतकर्यांाच्या दारासमोर दत्त म्हणून उभे ठाकत असते. दिवाळी जसा प्रकाश आणि आतषबाजीचा सण आहे तसाच पंचपक्वान्न व वेगवेगळे चवदार पदार्थ करून खाण्याचा सण आहे. शेतकर्यातने जरी सण साजरा करायचे नाही असे ठरवले तर शेजार्या च्या घरातून खमंग वासाचे तरंग उठत असताना शेतकर्याभच्या मुलांनी काय जिभल्या चाटत बसायचे? दिवाळीला नवे कापड परिधान करायचे असते. नवीन कापड खरेदीसाठी पुन्हा कर्ज काढायचे किंवा कापड दुकानातून उधारीवर खरेदी करायची. लक्ष्मीपूजनासाठी स्पेशल दिवस नेमला गेला आहे. शेतीत पिकविलेला कोणताच शेतमाल जर विक्रीस गेला नसेल तर शेतकर्याच्यिा घरात लक्ष्मी तरी कुठून येणार? मग लक्ष्मीपूजन तरी कोणत्या लक्ष्मीचे करायचे? शेतकरी ज्या लक्ष्मीचे पूजन करतो, ती लक्ष्मी उसणवारीची असून तिचे मालकीहक्क सावकार किंवा बँकेकडे असतात. त्याच्या घरावर झगमगणार्यार आकाशदिव्यांचे कॉपीराईटस जनरल स्टोअरवाल्याच्या स्वाधीन आणि घरात तेवणार्या दिवावातीतील तेलाचे सर्वाधिकार किराणा दुकानदाराच्या ताब्यात असतात. शेतीचे खर्च आणि या सर्व सणांचे खर्च भागवण्यासाठी शेतातील उभे पीक शेतकर्याच्या घरात पोचायच्या आधीच गहाण झालेले असते. या सर्व सणांनी शेतकर्यांला पुरेपूर कर्जबाजारी करून त्याच्या कमरेला धडूतही शिल्लक ठेवायचे नाही, असा निर्धारच केलेला दिसतो.

आणि सर्वात महत्त्वाची आणि उपराटी बाब अशी की डिसेंबरमध्ये माल बाजारात जायला लागला आणि शेतकर्यारच्या घरात पैसा यायला लागला की अचानक सणांची मालिका खंडीत होते. गाढवाच्या सिंगाप्रमाणे सण नावाचा प्रकारच गायब होतो. डिसेंबर नंतर जे सण येतात ते निव्वळच बिनखर्चिक असतात. तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला असे म्हणत तिळगुळाच्या भुरक्यावरच तिळसंक्रांत पार पडते. बारा आण्याच्या रंगामध्ये होळीची बोळवण केली जाते. तांदळाची खीर केली की अक्षय


तृतीया आटोपून जाते. खरीप हंगामात येणारी श्रीकृष्ण जन्माष्टमी घराघरात साजरी केली जाते. मात्र उन्हाळ्यात येणारी रामनवमी व हनुमान जयंती केवळ मंदिरातच साजरी केली जाते आणि शेतकर्यांना पदरचा खडकूही न खर्च करता फुकटातच प्रसाद खायला मिळतो. म्हणजे असे की शेतकर्याजच्या घरात जेव्हा त्याच्या कमाईचा पैसा येतो, तेव्हा त्याने त्या पैशाने सण वगैरे साजरे करण्याची अजिबात सोय नाही. स्वतः मिळविलेल्या मिळकतीतून नवीन कपडे खरेदी करायचे नाहीत. स्वत:च्या मिळकतीच्या पैशाने गोडधड-पंचपक्वान्ने करून मुलाबाळांना खाऊ घालायची नाहीत. बहिणीने भावाच्या घरी किंवा बापाने पोरीच्या घरी जायचे नाही. केवळ आणि केवळ माल विकून पैसा आला की त्याने किराणा, कापड दुकानाची उधारी फेडायची. बँका किंवा सावकाराची कर्जफेड किंवा व्याज फेड करायची आणि पुढील हंगामातील शेतीसाठी नव्याने कर्ज घ्यायला तयार व्हायचे. अजबच तर्हां आहे या कृषिप्रधान म्हणवणार्यार देशातील सणांच्या संस्कृतीची.

सणांच्या निर्मितीमागचे ऐतिहासिक महत्त्व विशद करणारे पुराणशास्त्री काहीही म्हणोत, परंतु शेतीमधल्या मिळकतीचा संचय शेतकर्यामच्या घरात होताच कामा नये, शेतकरी कायमच कर्जबाजारी राहावा हा उद्देश स्पष्टपणे डोळ्यासमोर ठेवूनच सणांची निर्मिती आणि रीतिरिवाज अगदी प्राचीन काळापासून नियोजनबद्धरितीने आखल्या गेले आहे, हे उघड आहे. ज्या हंगामात शेतीमध्ये शेतकर्या ने स्वत:ला झोकून देऊन कामे करायची असतात त्याच काळात इतक्या सणांचा बडेजाव शेतीव्यवसायाला उपयोगाचा नाही. उत्पादनासंबंधी आवश्यक तो खर्च करावयाच्या काळात सणासारख्या अनुत्पादक बाबीवर अनाठायी खर्च करणे, शेतीव्यवसायाला कधीच फायदेशीर ठरू शकणार नाही. सणांचे अनर्थशास्त्र शेतीच्या अर्थशास्त्राला अत्यंत मारक ठरले आहे, ही खूणगाठ मनाशी बांधूनच पुढील वाटचाल होणे अत्यंत गरजेचे आहे.

**– गंगाधर मुटे**

ईमेल : gangadharmute@gmail.com

# भावपूर्ण श्रद्धांजली



- हिंगणघाट (जि. वर्धा) येथील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते राजेंद्र झोटिंग यांचा एकुलता एक मुलगा मोहित वय १८ याचे अल्पशा आजाराने निधन झाले. मोहितला सिकलसेलचा आजार होता. त्यावर नियमित औषधोपचार सुरू होता. त्याने १२ वी परीक्षा नुकतीच उत्तीर्ण केली होती. आयुर्वेद डॉक्टर होण्याची त्याची धडपड सुरू होती. त्याची अचानक प्रकृती बिघडल्याने दि. ११ ला सकाळी त्याला नागपूर हालविण्यात आले. परंतु १२ ऑगस्ट ला दुपारी १२ वाजताचे दरम्यान त्याचे निधन झाले. काळाने अचानक झडप घालून त्याला त्याचे ध्येय्या पासून दूर नेले. त्याची डॉक्टर होण्याची इच्छा जरी पूर्णत्वास आली नाही तरी डॉक्टर घडविण्यात त्याच्या शरीराचा खारीचा वाटा असावा या हेतूने परिवारावर आकस्मिक दुःखाचा डोंगर कोसळला असताना सुद्धा सगळं दुःख बाजूला ठेवून राजेंद्र झोटिंग यांनी मोहितचे पार्थिव शरीर नागपूरच्या मेडिकल कॉलेजला दान करण्याचा निर्णय घेतला. मोहीतच्या पार्थिवाचे दान म्हणजे झोटिंग परिवाराची त्या आभाळभर दुःखाला घातलेली गवसणीच ठरली आहे.



- अण्णा आपटे हे सोलापूर जिल्ह्यात शेतकरीसंघटनेचे एक आधारस्तंभ होते.त्यांच्या जाण्यामुळेशेतकरी चळवळीची अपरिमित हानी झाली.शेतकरी संघटनेच्या वतीने विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.त्यांच्या सर्व कार्यातील यशस्वितेच्या रूपाने ते कायम आपल्या सोबत आहेत असा विश्वास व्यक्त करण्यात आला.
- वर्धा जिल्ह्यातील कोल्हापूरचे सुनील लुंगसे यांचे अकस्मात निधन झाले. सक्रीय आणि धडाडीचा कार्यकर्ता व कोल्हापूरची मुलुख मैदानी तोफ म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख होती.



- शिंदखेडा तालुक्याचे तरुण अध्यक्ष स्व. धनराज दौलत पाटील रा. भडणे यांचे १०/१०/१७ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी शिंदखेडा तालुक्यात ७/८ महिन्यात गावोगांव जाऊन संघटनेचा प्रचार व प्रसार केला. नांदेड अधिवेशनात येवून ते इतके भारावून गेले होते की माझे राष्ट्रवादी, शिवसेने बरोबर खुप दिवस वाया गेले.

  त्यांना संघटनेत येवून खुप समाधान व आनंद होता. त्यांच्या पश्चात १० वर्षाचा १ मुलगा व २ मुली असा परिवार आहे. त्यांची मोठी मुलगी १२ वीला शिंदखेडा कॉलेजला पहिल्या क्रमांकात उत्तीर्ण झाली.

**गुलाबसिंग रघुवंशी**
**धुळे अध्यक्ष**

# शेतमाल - महागाईची परिभाषा व ग्राहकांची मानसिकता

अन्नधान्यांचे, दूध, फळे / भाजीपाल्यांचे भाव थोडे वाढले की शहरामध्ये महागाई वाढल्याची ओरड सुरू होते. शहरी मध्यमवर्गियाची ही मानसिकता बदलण्याचे फार मोठे आव्हान आहे. महागाई विरुद्ध बोंब मारायची असेल तर ती पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस वगैरे बद्दल मारा. पण खबरदार जर कोणी शेतमालाच्या किमती वाढल्यावर विरोध केला तर.

राजकीय पक्ष, सामाजिक संस्था शेतमालाला भाव मिळावा म्हणून गावाकडे मागणी करतात. तर शहरामध्ये जीवनावश्यक वस्तू भाववाढी विरुद्ध मोर्चे काढतात. अशी दुटप्पी भूमिका चालणार नाही. वर्तमानपत्रे/मीडियावाले ह्यांनी शेतमाल, साखर, दूध, डाळ, किंवा मेथी/कोथिंबरीची जुडी महागली असे शीर्षक दिले तर वर्तमानपत्राची होळी करण्यात येईल. कांदा सफरचंदापेक्षा महाग किंवा बँकेत कर्ज काढायला चाललो आहे, कारण कांदे खरेदी करायचे आहेत अश्या अर्थाची व्यंगचित्र काढणाऱ्याला कार्यकर्त्यांनी घरात घुसून मारहाण करावी. येथे शेतकऱ्यांचा जीव जातो आहे आणि तुम्हाला विनोद सुचतो.

**तुमची महागाईची परिभाषा आहे तरी काय ?**

गेल्या काही वर्षात इतर वस्तूंचे भाव कितीतरी पटीने वाढले आहेत. शहरी लोकांच्या बदललेल्या जीवनशैलीमुळे, चंगळखोर संस्कृतीमुळे महिन्याचा खर्च तिप्पट झाला आहे. ह्या पडद्याआडच्या अदृश्य महागाईकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष केले जाते. पण मेथीची जुडी ५ रु. ने वाढली की महागाई झोंबते?शहरी मध्यमवर्गियांच्या मासिक खर्चाच्या विविध वस्तूंचे वर्गीकरण करता येईल.

(अ) इतर खर्च: लाइट बील, गॅस, पेट्रोल, औषधे, मॉल/पिक्चर्स, सोसायटी मेंटेनन्स/घरभाडे, मोबाईल बील, स्कूटर/कार सर्व्हिसिंग, एल.आय.सी./घरकर्ज हप्ता, कामवाली पगार, हॉटेलिंग, टी.व्ही. केबल, शिक्षण फीस, वीक एन्ड सहली, प्रासंगिक खर्च/भेटवस्तू, डॉक्टर, कपडालत्ता, चैनीच्या वस्तू खरेदी वगैरे.

(ब) किराणा - पॅक अवस्थेत, एम.आर.पी. सहित : टूथपेस्ट, चहा, शॅम्पू, साबण, पावडर, मीठ, सौंदर्य प्रसाधने, बेकरी पदार्थ, मॅगी, मसाले, सूप, शीत पेय, आइसक्रीम, तेल, तिखट/गोड पदार्थ वगैरे.

(क) शेतमाल - पॅकिंग व एम.आर.पी. किंमत नसलेले: फळे, भाज्या, साखर, गहू, तांदूळ, डाळी, ज्वारी, दूध वगैरे.

विविध कुटुंबांच्या खर्चाचा अभ्यास केल्यावर असे लक्षात आले की शेतमालाचा खर्च, वर्गवारी (क), हा एकूण मासिक खर्चाच्या केवळ ५. २ टक्के आहे. हेच प्रमाण उत्पन्नाच्या तुलनेत अजूनही नगण्य आहे. मग शेतमालाचे, भाजीपाल्याचे भाव थोडे वाढले की स्वयंपाकाचे अर्थकारण कोलमडले, आम्ही कसे जगायचे, सामान्यांचे कंबरडे मोडले, महागाई गगनाला भिडली, भाज्यांनी रडवले रे अशी बोंब का मारता? शहरातील मध्यमवर्गीय हे ग्रामीण भागात राबणाऱ्या शेतकरी, शेतमजुरांच्या तुलनेमध्ये अती श्रीमंत आहेत. शेतीच्या निविष्ठा, आदानांच्या (ळपर्िीीं) उदा. रासायनिक खते, पंप, अवजारे, बी- बियाणे, वीज, पाणी, यंत्रसामुग्री, मजूर, वाहतूक, चारा ह्यांच्या किंमतींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. त्यावेळी कोणी महागाई वाढली म्हणत नाही, मोर्चे काढत नाही.

**केंद्रशासनाने जाहीर केलेल्या शेतमालाच्या किमान आधारभूत किंमती खालील प्रमाणे आहेत.**

| धान्याचा प्रकार | २०१२-१३ (रु/क्विंटल) | २०१६-१७ (रु/क्विंटल) | ५ वर्षातील वाढ (टक्के) |
|---|---|---|---|
| धान (प्रत-सर्वसाधारण) | १२५० | १४७० | १७.६ |
| ज्वारी | १५०० | १६२५ | ८. ३ |
| बाजरी | ११७५ | १३३० | १३. २ |
| तूर | ३८५० | ५०५० | ३१. २ |
| कापूस (माध्यम धागा) | ३६०० | ३८६० | ७. २ |
| सोयाबीन (पिवळा) | २२४० | २७७५ | २३. ९ |
| गहू | १३५० | १६२५ | २०. ४ |
| ऊस | १७० | २३० | ३५. ३ |

( एफ.आर.पी.: गेल्या चार वर्षात फक्त २० रु. वाढ, माहिती स्रोत: Directorate of Economics Statistics, DAC & FW)

म्हणजे गेल्या पाच वर्षातील शेतमालाच्या भावातील वाढ ही नगण्य आहे. खरे तर ती चलनवाढीच्या प्रमाणात व्हावयास हवी होती. चलनवाढीचा दर हा उपभोक्ता निर्देशांकावर आधारित असतो. (Inflation Rate is based on Consumer Price Index - CPI). सन २०१५-१६ साठी घाऊक किंमत निर्देशांक वाढ दर, आधारभूत वर्ष २००४-०५=१०० गृहीत धरल्यास, खालील प्रमाणे आहे. (स्रोत : Ministry of Commerce Industries)

अन्नधान्य (food Grain) : (-) २.५ %
भाजीपाला, फळे : (-) १. ३ %
कापूस : (-) ७. ९ %

ह्याच १२ वर्षाच्या काळात चलनवाढ २५१. ५ % एवढी झाली आहे. ह्याचा अर्थ, ह्या काळात इतर वस्तूंच्या किंमतींमध्ये प्रचंड वाढ झाली असताना शेतमालाच्या किंमतींमध्ये उलटी घट झाली आहे.

ज्यावेळी भाजीपाल्याचे भाव कोसळतात, तेव्हा शेतकऱ्यांच्या काढणीचे पैसे पण सुटत नाहीत. इतर खर्च वेगळाच. एकदा टोमॅटोचे भाव इतके पडले होते की माल परत नेण्यासाठी वाहतुकीचा

खर्च परवडत नसल्यामुळे शेतकऱ्याने माल फुकट घेऊन जा म्हणून सांगितले. तेव्हा शहरी असंवेदनशील लोक तो माल फुकट घेऊन जातानाचा एक व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाला होता.

**आवश्यक वस्तू कायदा – शेतकऱ्यांचा फास :**

इसेन्शिअल कमोडीटी ऍक्ट (Essential Commodity Act) चे भाषांतर करताना आवश्यक वस्तू कायदा न करता जीवनावश्यक वस्तू कायदा असे करून दिशाभूल केली जाते. ऐन दिवाळीच्या तोंडावर साखर महागली अशी बातमी वर्तमानपत्रात येऊ नये म्हणून सरकार घाबरून अगोदरच साखर आयात करते. साखर खाल्ल्याने अनेकजण मरतात पण न खाल्ल्यामुळे कोणी मेल्याचे ऐकिवात नाही. मग साखर जीवनावश्यक वस्तू कशी ? हा सगळं पारंपरिक मानसिकतेचा पगडा आहे, त्याला छेद देणे जरुरी आहे. ह्या कायद्याचा दुरुपयग करून सरकार शेतमालाच्या किंमती कमीत कमी ठेवतात. शेतमालाचा तुटवडा असेल तर ह्याच कायद्याचा आधार घेऊन संपूर्ण नियंत्रण आणतात. मोठ्या प्रमाणात आयात करून भाव पाडतात. ह्या आयात व्यापारामध्ये राज्यकर्त्यांचे व अधिकाऱ्यांचे हितसंबंध (कमिशन) गुंतलेले असतात. परकीय चलनाची गळती करून परदेशातील शेतकऱ्यांना भाव देणारे सरकार, भारताच्या शेतकऱ्यांची गळचेपी करतात.

भारत स्वयंपूर्ण असताना, २०१५-१६ ह्या साली अन्नधान्यात सरकारने १ लाख ४० हजार कोटी रुपयांची आयात केली. गेल्या पाच वर्षात ही आयात १९९. ९ टक्क्यांनी वाढलेली आहे. आणि दुसरीकडे स्वदेशी  चा घोष चालवायचा. पाकिस्तानातून ४६ रु. किलो दराने कांदा आयात केला व इथल्या शेतकऱ्यांना १० रु. भाव मिळाला नाही. तूर १३५ रु./ किलोंनी साल्यांनी आयात केली व येथे २ कि. मी. लांब रांगेमध्ये आमची तूर भिजत होती. व नाईलाजाने ३५ रु. नी विकावी लागली. सरकारने खरेदी केलेल्या धान्याचा बफर स्टॉक (राखीव साठा ) वेळोअवेळी बाजारात ओतल्यावर शेतमालाचे भाव अजून कोसळतात. व शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाते. किंवा आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या फोटोपुढे दिवा लावलेला असतो तेवढाच उजेड. आणि जेव्हा धान्याची मुबलकता असेल तेव्हा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देतात. व बाजार खरेदी – विक्री किंवा मागणी–पुरवठा मूलतत्त्वाप्रमाणे लिलाव करा असा उपदेश करतात. शेतमालाला निर्यातीचे स्वातंत्र्य नाही. बंधने आहेत. गहू निर्यात करता येत नाही पण त्यापासून तयार झालेला शुद्ध आटा व बिस्किटांना मात्र मुभा आहे.

१९९१ साली स्वीकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांना स्वातंत्र्य आणि स्थान का नाही? जगामध्ये ज्या ठिकाणी जरुरी असेल तिथे निर्यात करून शेतकऱ्यांनी सरकारला परकीय चलन मिळवून दिले असते. ह्या सर्व षडयंत्रातून सरकारचे अनेक फायदे होतात .

(अ ) शहरी मतदार लोकांचे लांगूलचालन व त्यांना खूश करणे.

(ब ) आयातीतील भ्रष्टाचारातून कमिशन मिळवणे.

(क ) उद्योगपतींना शेतीमाल प्रक्रियेसाठी मातीमोल किमती मध्ये मिळणे.

(ड ) शेतकऱ्यांनी शेती सोडून स्थलांतरित / विस्थापित होऊन उद्योगपतींना व शहरांमध्ये अकुशल मजूर, महीला, अर्धशिक्षित तरुण कमी पगारावर उपलब्ध करून देणे. (skill India ?)

आवश्यक वस्तू कायद्याचा अजून एक तोटा म्हणजे त्याच्या अधिकारान्वये राज्य सरकारला कधी पण एखादा अध्यादेश काढून शेतमालाच्या साठा मर्यादेवर, ठराविक काळासाठी, बंधने  घालता येतात.  ह्या वारंवार साठ्यांच्या मर्यादेवरील बदलामुळे व्यापारी साठे करण्यासाठीची मोठी गोदामे, शीतगृह ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास धजावत नाहीत. तसेच अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये, उत्पादन सातत्याने चालण्यासाठी (continuous production), मोठ्या प्रमाणात साठे करण्याची जरुरी असते. परंतु वरील धरसोड धोरणांमुळे अन्नप्रक्रिया उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली नाही व ग्रामीण कृषी औद्योगिक क्रांती खुंटलेली आहे. वाढलेल्या बाजारभावासाठी केंद्र शासन, राज्यशासन, खाजगी कारखाने कर्मचाऱ्यांना / कामगारांना वेळोवेळी महागाई भत्ता वाढवतच असते. उदाहरणात सप्टेंबर २०१७ मध्ये राज्य सरकारने महागाई भत्ता ४ टक्के वाढवून १३६ टक्के केला आहे. इतर गरीब, कष्टकरी, कामकरी, कामगार वगैरे साठी अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत रेशन व्यवस्थेमार्फत स्वस्त धान्य विक्रीची सुविधा उपलब्ध आहे. शासनाने त्यातील त्रुटी काढून त्याची व्याप्ती वाढवावी. जेणेकरून दारिद्र्य रेषेखालील लोकांचे कुपोषण होणार नाही.

६२ वर्षापूर्वी आलेल्या ह्या कायद्यामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होणे आवश्यक आहे. आवश्यक वस्तू कायद्यामधून शेतीमाल वगळण्यात यावा व त्याच संदर्भात सरकारला कायद्याने जे नियंत्रणाचे अधिकार दिले आहेत ते संपुष्टात यावेत. तसेच गॅस पुरवठा व्यवस्थेप्रमाणे शेतमालाचे घरगुती (Domestic) ग्राहकांना कमी दर व प्रक्रिया उद्योग करणाऱ्या उद्योगपतींसाठी (Industrial Commercial) जादा दर अशी द्विस्तरीय किंमत व्यवस्था निर्माण करावी. उदाहरणात घरगुती वापरासाठी साखर स्वस्त मिळेल. पण मिठाई, आइसक्रीम, चॉकलेट, कोकाकोला, शीतपेय वगैरे बनविणाऱ्यांसाठी ती जादा दराने मिळेल.

शेतमालाचे भाव स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे व्हावेत. व शहरी लोकांची फार काळजी वाटत असल्यास फरकाची रक्कम त्यांच्या खात्यात सरकारने अनुदान म्हणून जमा करावी. शेकडो वर्षे शेतकऱ्यांच्या वरकड उत्पन्नावर पोसणाऱ्या शहरी ग्राहकांच्या मानसिकतेमध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. त्यामध्ये राजकीय पक्ष, वर्तमानपत्रे, टी. व्ही. मीडियानी मोलाची भूमिका निभवावी हे अपेक्षा.

**– सतीश देशमुख, पुणे**

ईमेल : deshmukhsk29@gmail.com

# शेतकऱ्यांची फसवणूक करणारी स्वामिनाथन यांची शिफारस

डॉक्टरने दिलेली औषधाची चिठ्ठी फेकून देऊन वकिलाने लिहून दिलेल्या चिठ्ठीवरून औषधाची मागणी करणे जेवढे हास्यास्पद आहे, तेवढेच स्वामिनाथन आयोगाची शिफारस लागू करा म्हणणे हास्यास्पद आहे.स्वामिनाथन हे अर्थतज्ज्ञ नाहीत. ते कृषितज्ज्ञ आहेत. संकरित वाण कसे करावे? हे ते सांगू शकतात, त्यांचा त्या क्षेत्रात अधिकार आहे. शेतकऱ्यांच्या बाजारपेठेतून व्यापारी हद्दपार करून त्यांच्या जागा सरकारी नोकरशाहीला देणे म्हणजे भीषण संकटाला आमंत्रण देणे आहे.

दीडपट हमी भावाची शिफारस त्यांनी केली व अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले उतावीळ नेते तीच मागणी घेऊन शेतकऱ्यांची दिशाभूल करीत फिरत आहेत. ज्यांना, शेतकऱ्यांना सरकारच्या दावणीला बांधायचे आहे व ज्यांनी, जमिनीच्या राष्ट्रीयकरणाचा पुरस्कार केला आहे ते या नेत्यांना फूस देत आहेत. हे लक्षात घेतले पाहिजे.दीड पट भाव द्यायचा ठरला, असे समजा. कोण देणार? सरकार देणार! म्हणजे देशात पिकणारा सगळा माल सरकार खरेदी करणार. सगळे व्यापारी हद्दपार होणार, ते हद्दपार झाले तरी त्यांचे काही बिघडत नाही, त्यांना ठिकाण बदलता येते, धंदा बदलता येतो, शेतकऱ्याला ना ठिकाण बदलता येते ना धंदा, सरकारी खरेदी कंपल्सरी होणार. (ज्यांना नुकताच तुरीच्या सरकारी खरेदीचा अनुभव आला त्यांना विचारा. कुठे कुठे पोळले ते दाखवतील) सगळा शेतीमाल हमी भावावर विकत घेणारा जगात एक तरी देश आहे का? अगदी कम्युनिस्ट देशात तरी अशी खरेदी केली जाते का?

भारतात पिकणारा सगळा माल सरकारला विकत घ्यायचा झाला तर नुसते भारताच्या अख्ख्या बजेटने भागणार नाही, अनेक देशांचे बजेट एकत्र करावे लागतील, अर्थशास्त्राचा ओ का ठो कळत नाही असाच नेता या शिफारशीचे समर्थन करून शेतकऱ्यांना फसवू शकतो,निवडणुकीच्या आधी स्वामिनाथनच्या शिफारशींचे नाव घेऊन नरेंद्र मोदीने फसविले, आता विरोधक फसवायला निघाले आहेत.स्वामिनाथन आयोगाचा अहवाल नीट वाचला तर लक्षात येईल की दीडपट हमी भावाची शिफारस सगळ्या पिकांसाठी नाही. काही पिकांपुरती मर्यादित आहे, त्यात आपण बसतो का? वाचला तर कळेल, त्याचे नाव घेऊन फसवणूक करणाऱ्यांना वाचायची गरज वाटतात नाही,

शेतीचा आणि शेतकऱ्यांचा मूळ प्रश्न शेतकरीविरोधी कायद्यात अडकला आहे, सीलिंग, आवश्यक वस्तू आणि जमीन अधिग्रहण हे तीन कायदे शेतकऱ्यांचा गळफास बनले आहेत, ते रद्द करण्याच्या मागणी कडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांना दीड पटाचे आमिष दाखविणे म्हणजे त्यांची दिशाभूल करणे आहे,सरकारीकरणात शेतकऱ्यांचे कल्याण नसून पायातील बेड्या तोडण्यात आहे, हे किसानपुत्रांनी समजून घ्यावे.

**– अमर हबीब,**
**अंबाजोगाई**

# शून्यातून विश्व

**ग.दि.माडगूळकर –**
मॅट्रिक नापास झाल्यावर उदबत्त्या विकल्या.अनवाणी आयुष्य जगले.त्यांनी गीतरामायण लिहिले.

**गुलजार –**
फाळणी नंतर दिल्लीला आले.मोटार गॅरेजमध्ये काम करायला सुरुवात केली. बिमल रॉय भेटले.मोटार गॅरेजमधले आयुष्य फिल्म इंडस्ट्रीत आले.

**सुधीर फडके –**
चहा भाजीचा व्यापार करत होते.प्रारंभीच्या काळात त्यांना पोटासाठी वाद्य विकावी लागली.भटकंतीतून त्यांना सुर शोधला.ते गायक झाले, संगीतकार झाले .

**नीळू फुले –**
पुण्याला कॉलेजमध्ये अकरा वर्षे माळी होते.झाडांची निगराणी करता करता ते राष्ट्रसेवादलाच्या पथकात सामील झाले.नटसम्राट निळू फुले महाराष्ट्राला माहीत झाले.

# हिंदु जातिप्रथा और ब्राह्मणों की निंदा के पीछे का वैश्विक एजेंडा

पश्चिमी देशों के आम नागरिक शायद ही भारत के बारे में कुछ जानते हो. हाँ, एक चीज से वे सारे अवगत है, कि भारत में एक अमानवीय' जाति प्रथा है जोकि हिंदु धर्म का सबसे महत्वपूर्ण आयाम है. अधिकांश यह भी जानते है कि ब्राह्मण नामक एक उच्चवर्णीय जाति है, जोकि उस देश की निम्नवर्णीय समझी जानेवाली जातियों का शोषण करती है, और इनमें भी अछूतों के हालात तो बेहद बदतर है.

मुझे इस बात को अपने प्राथमिक विद्यालय में ही सिखाया जा चुका था, भले ही कुछ ही वर्षों पूर्व हो चुके नाजी जर्मनी के हत्यारे गैस चैम्बर्स, उपनिवेशवाद और दासत्व-प्रथा के अत्याचारों के बारे मुझे कुछ भी ज्ञात नहीं था. १९६० के दशक के आरंभिक वर्षों में भारतीय जातिप्रथा और उसके ब्राह्मण खलनायक मेरे पश्चिमी बवेरियन स्कूल्स के पाठयक्रम का अभिन्न हिस्सा थे और आज भी है हालात वही है. कुछ समय पूर्व मैंने ऋषिकेश में तीन युवा जर्मन नागरिकों से पूछा कि वे हिंदुधर्म को किस चीज को जोड़कर देखते हैं, उनका तत्काल उत्तर था- जातिप्रथा. निश्चित ही वे यह भी सुन चुके थे कि यह प्रथा बेहद आमानवीय है. इसमें कोई संदेह नहीं है कि सारी दुनिया के स्कूली बच्चों को अमानवीय जातिप्रथा के बारे में पाया जाता है.

क्या इसके पीछे कोई कारण, किसी एजेंडे की संभावना है?

इससे कोई इंकार नहीं करेगा कि जातिप्रथा आज भी मौजूद है और आज भी अछूत जातियाँ अस्तित्व में है. और ऐसा केवल भारत ही नहीं, बल्कि सारी दुनिया में मौजूद है. आश्चर्यजनक बात है, क्लास' को पोर्तुगीज में जाति अर्थात कास्ट कहा जाता है. वास्तव में तो यह भारतीय संज्ञा भी नहीं है.

प्राचीन भारतीय वेद चार वर्णों का जिक्र करते है- ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य एवं शुद्र, जोकि एक सामाजिक शरीर की रचना करते है, वैसे ही जैसे कि मस्तक, भुजा, जांघे और पाँव, एक मानवीय शरीर की रचना करते है. वैसे तो यह स्वयं में ही एक बेहद खूबसूरत व्याख्या होती जो इशारा करती है कि मानव शरीर के सभी अंग अपनेआप में महत्वपूर्ण है. हाँ, यह सही है कि मस्तक को सदैव ज्यादा आदर दिया जायेगा, किन्तु क्या आप अपने पांवों की उपेक्षा करेंगें? हर व्यक्ति प्रतिभाशाली कार्य के लिए ही तो नहीं जन्मता है. कोई भी समाज किसानों, व्यापारियों और श्रमिकों के बिना कैसे खड़ा होता? सभी की अपनी-अपनी भूमिका है. और भविष्य में इस भूमिका के बदले जाने की भी पूरी संभावना होती है.

वर्ण भी अपने मूल रूप में आनुवंशिक नहीं थे. वे किसी व्यक्ति के सबसे प्रमुख चारित्रिक गुण और उसके व्यवसाय पर निर्भर थे. ब्राह्मणों का मूल कर्म था- वेदों का एकदम परिशुद्ध अंदाज में स्मरण करके उन्हें सुरक्षित रखना और आगामी पीयिों को सौंपना. इसलिए उनमें सत्व गुण की प्रधानता अनिर्वाय मानी गयी और उन्हें पवित्रता का जतन करने के लिए बाकी जातियों की तुलना में अधिक कष्टपूर्ण नियमों से बंधे रहना होता था.

ब्राह्मण वेदों की पवित्रता के रक्षक और पालक थे. अतः यह समझनेलायक बात है कि वे उन लोगों को नहीं छुएंगें जो नालियाँ साफ करते हो या मृत जानवरों का चमड़ा निकालते हो, हालांकि समाज के लिए ऐसे काम करनेवाले लोग भी आवश्यक है. पश्चिम में भी लोग कहाँ उनसे हाथ मिलाना पसंद करते हैं, किन्तु क्या वहां कोई इसे मुद्दा बनाता है?

अपने सत्व गुणों के कारण ब्राह्मणों द्वारा समाज के दूसरे समूहों के प्रति अपशब्दों के प्रयोग किये जाने की भी न्यूनतम संभावना थी. आमतौर पर हर समाज में एक समूह होता है जो स्वयं को सामाजिक रूप से दूसरों से ऊपर और दूसरों को अपने से कमतर आँकता है. यह ग्रंथी सभी समकालीन समाजों में मौजूद रहती है. यह भी सत्य है कि कालान्तर में भारत में दुर्भाग्य से चार वर्ण जन्म की आनुवंशिकता से तय किये जाने लगे, ना कि कर्म की. आज ऐसे कई ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य और शुद्र मिल जाएगें जो शायद ही अपने वर्ण धर्म का पालन करते हों, अतः उन्हें अपने आपको अपने जन्म के वर्ण से संबंधित नहीं मानना चाहिए.

किन्तु क्या कारण है कि जहाँ भारत में समाज की इस संरचना को निरंतर लताड़ा जाता है, वहीं पश्चिम में वहां के उच्चवर्णीय, राजसी कुलों को कोई दोषी नहीं ठहराता कि वे अपने श्रमिकों के साथ उठते बैठते नहीं है या उनके आस-पड़ौस में रहने को तैयार नहीं है?

मुझे एक बू भारतीय ने बताया था कि कर्नाटक के मडीकेरी गांव और सारे देश में अंग्रेज अपने क्लबों में केवल गोरे लोगों को ही प्रवेश की अनुमति देते थे? यदि मेरी याददाश्त ठीक है, तो उसने कहा था कि क्लब के प्रवेश-द्वार के सूचना फलक पर ही लिखा होता था- कुत्तों और भारतीयों का प्रवेश निषिद्ध है. इस बात से क्यों कोई क्षुब्ध नहीं है?

क्यों कोई भी इस बात से क्षुब्ध नहीं है कि ब्रिटिश उपनिवेशवादी कृषिनीति ने ढाई करोड़ भारतीयों को भूखों रखकर मौत का निवाला बनने को मजबूर कर दिया था. ये ढाई करोड़ भारतीय, स्त्री, पुरुष और बच्चे, शनैः शनैः मौत की और रेंग रहे थे क्योंकि उनके पास, एक ऐसे देश में जो अंग्रेज आने से पूर्व दुनिया के सबसे अमीर देशों में शुमार था, खाने के लिए कुछ भी नहीं था? इंटरनेट पर उस दौर के तिल-तिल मरते, केवल चमड़ी और हड्डियों को दर्शाते, बमुश्किल जिंदा भारतीयों के भयावह चित्र

आज भी उपलब्ध है.

क्यों कोई भी इस बात से प्रक्षुब्ध नहीं होता है कि अंग्रेजो ने दासप्रथा समाप्त होने के बाद भी अपनी बंद दमघोंटू नावों में ठूंस-ठूंस कर भारत से दीन-हीन श्रमिकों को दुनिया के कोने-कोने में भेजा था, जिनमें से अधिकांश तो यात्रा के बीच में ही मौत का निवाला बन गए और जो बच गए थे, वे गन्ने के खेतों में होनेवाले अंतहीन अत्याचारों के शिकार बन गए?

क्यों कोई हिंदुओ और विशेषकर ब्राह्मणों की उस बदहाली का जिक्र नहीं करता जो मुस्लिम आक्रमणों के कारण हुयी थी? कितने क्रूरतापूर्ण थे वे आक्रमण? अनगिनत हिंदू मार डाले गए और कितने ही गुलाम बना दिए गए. कितनी ही हिंदु नारियों ने मुस्लिम आक्रांताओं के हाथों पड़ने की तुलना में सामूहिक जौहर करके अपने प्राणों की आहुति देने का चुनाव किया था.

इसी वर्तमान में आयसिस(ISIS) के कारण हम उन घटनाओं का अनुमान लगा सकते है, जो सदियों पहले घटित हुयी होगी, किंतु बावजूद इसके वामपंथी विचारक और आदरणीय ब्रिटिश सांसद इसे लेकर किंचित भी चिंतित दिखाई नहीं देते. हाँ, वे चिंतित अवश्य है भारत की घोरतम अमानवीय जातिप्रथा के बारे में.

हम इसे आसानी से समझ सकते है कि औपनिवेशिक प्रशासन ने १८७१ के पश्चात अपनी जनगणना में वर्णों की पुरानी लचीली अवस्था को सख्त बनाकर जातियों के बीच के आपसी सामंजस्य को नष्ट करने का प्रयास किया था. आज उन्ही के लोकतांत्रिक उत्तराधिकारी, भारत में जिनका कोई राजनैतिक आधार नहीं है, केवल जोड़तोड़ में प्रवीण चालाक मिडिया और अपने ही देश के संसदीय कानूनों के बल पर इस सामंजस्य को नष्ट करने पर तुले हुए है.

मेरा तर्क कहता है: जो कुछ ब्राह्मणों ने दूसरों से स्वयं को अलग रखकर या मान लो कि दूसरों का तिरस्कार करके किया था, वह ईसाई उपनिवेशवादीयों और मुस्लिम आक्रांताओं ने जो कुछ किया था, उसके सामने तो रत्ती भर भी नहीं है.

फिर क्यों जातिप्रथा के कथित अत्याचारों को इतना बाचा कर दिखाया जाता है? इसका स्पष्ट कारण तो सिर्फ उन लोगों से ध्यान बंटाना हो सकता है जिन्हें वास्तव में भारत में अतीत में किये और आज भी जारी अपनी करतूतों पर अपराधबोध महसूस होना चाहिए. निश्चित ही ये लोग ब्राह्मण तो नहीं है. आज भी कई ब्राह्मण बेहद गरीब होने के बावजूद आरक्षण व्यवस्था के कारण धार्मिक अल्पसंख्यकों और दलितों को मिलनेवाले फायदों से वंचित है.

जातिप्रथा और ब्राह्मणों की दुनियाभर में जारी निंदा के लिए केवल यही कारण पर्याप्त नहीं है. उनका दूसरा प्रमुख एजेंडा है- ब्राह्मणों को शर्मिंदा करना, उन्हें उनके पूर्वजों के कर्मो के लिए अपराधबोध से भरना और उन्हें वेदों की शिक्षा ग्रहण करने और उसे दूसरों को प्रदान करने के अपने ही धर्म के पालन के प्रति संकोची बनाना. उनका उद्देश्य है- वैदिक ज्ञान को भारत में से ही लुप्त कर देना, क्योंकि यह ईसाईयत और इस्लाम के लिए तगड़ी चुनौती पेश करता है. यह उन धर्मों के कथित उद्घाटित सत्यों (Revelaed truths) को बड़ी आसानी से चुनौती देता दिखाई देता है. वैदिक ज्ञान तर्कपूर्ण है और इसीकारण यह ईसाईयत और इस्लाम के वैश्विक विस्तार के रास्ते की सबसे बड़ी रूकावट है.

दुर्भाग्य से वैदिक ग्रंथों का बड़ा हिस्सा पहले ही लुप्त हो चुका है. कांचीपुरम के भूतपूर्व शंकराचार्य श्री चंद्रशेखरेंद्र सरस्वती अपनी पुस्तक द वेदाज में कहते है कि वेदव्यास द्वारा ५००० वर्ष पूर्व चार वेदों में विभाजित कुल ११८० शकों में से आज केवल आठ का ही उपयोग होता हैं. (मैं सोचती हूँ- क्या इंग्लैंड, जर्मनी और अन्य देशों में खोजबीन की गई तो इस संपदा में से कुछ की फिर से खोज हो सकती है?)आज वक्त आ चुका है कि इस ब्राह्मण निंदा कार्यक्रम को विराम दिया जाये और भारतीय जातिप्रथा को मानवता के ऊपर घटित हुआ सबसे भीषण संकट दर्शाना बंद किया जाये. यह पूरीतरह बनावटी लगता है, विशेषकर तब जब आयसीस (ISIS) का उल्लेख बिना किसी भावुकता का रंग भरे या निंदा करते हुए केवल तथ्य दर्शाकर कर दिया जाता है. जैसे कि- आयसीस (ISIS) ने १९ यजीदी महिलाओं को लोहे के पिंजरे में जला कर इसलिए मार डाला क्योंकि उन्होंने आयसीस सैनिकों के साथ सेक्स करने से इंकार कर दिया था.

कुछ वर्षों पूर्व मैंने एक बू ब्राह्मण दंपत्ति को दक्षिण भारत के एक मंदिर में देखा. उनमें बेहद गरिमा थी, किन्तु वे काफ़ी कमजोर और कृशकाय थे. जब प्रसाद का वितरण हो रहा था- वे पंक्ति में मेरे सामने खड़े थे. बाद में वे उस पंक्ति में फिर से खड़े हो गए. इस बात की पूरी संभावना है कि ऐसा उन्होंने अपनी गरीबी के कारण किया था. ब्राह्मणों को अपने पूर्वजों के प्रति अपराधबोध रखने की कोई आवश्यकता नहीं है. उन्हें तो उनपर गर्व होना चाहिए, क्योंकि केवल उनके योगदान के कारण आज भारत दुनिया का अकेला ऐसा देश है, जिसने अपने बहुमूल्य प्राचीन विवेक को, अशंतः ही क्यों ना हो, बचा कर रखा है.

हाँ उन दूसरों ने अवश्यही अपराधबोध रखना चाहिए, किन्तु वे अन्य तो बेशर्म है, वे ऐसा नहीं करेंगें. वे तो इसके बजाय वातावरण को हिंदुओं के प्रति तर्कहीन घृणा और ब्राह्मणविरोध से दूषित करते रहेंगें.

**लेखक- मारिया विर्थ**

**अनुवाद- एड. दिनेश शर्मा**

ईमेल : dgsharma07@gmail.com

(मारिआ विर्थ एक जर्मन नागरिक है और हैम्बर्ग विश्वविद्यालय से उन्होंने मनोविज्ञान का अध्ययन किया है. वे पिछले चार दशकों से भारत में रह रही हैं.)

# शिक्षणव्यवस्थेची प्रचलित रचना मोडायलाच हवी

*शिक्षणावर इतका खर्च करून ही गुणवत्ता सुधारत नाही. महाविद्यालयात मुले बसत नाहीत. शासनाला गांभीर्य नाही. शिक्षक संघटना हक्कासाठी फक्त आक्रमक. पालक हतबल. मुले अनभिज्ञ. ही शिक्षण व्यवस्था सुधारेल असे मला खरंच आता वाटत नाही. यावर एक पर्याय मांडतो आहे. यात ही दोष निघतील पण आजच्या या बोगस व्यवस्थेपेक्षा नक्कीच कमी असतील.पालकांना आक्रमक करणे हाच उपाय वाटतो.*

नुकताच जागतिक शिक्षणाचा अहवाल आला. देशपातळीवर आपली गुणवत्तेची घसरण सुरूच आहे. अब्जावधी रुपये खर्च करूनही किमान वाचन लेखनही बहुसंख्य मुलांना ८वी पर्यंत येत नाही. पुन्हा गुणवत्तेचा हा प्रश्न प्राथमिक ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत आहे.जागतिकीकरणात आज रोजगाराच्या इतक्या चांगल्या संधी उपलब्ध असताना तो लाभ घेण्याची कुवतच गुणवत्ताविहीन शिक्षणातून निर्माण केली जात नाही. त्याचा परिणाम हा ग्रामीण व आदिवासी भागाचा अनुशेष वाढण्यात होतो.शहरी भागात खाजगी क्लासेसची जोड असल्याने किमान ही मुले टिकू शकतात.शिक्षणाचा दर्जा वेगाने ढासळत असल्याने शहरी व ग्रामीण विषमता वाढत आहे. आज परदेशात उच्च पॅकेज घेऊन नोकऱ्यांना गेलेले महाराष्ट्रातील मोठ्या शहरातील किती व तालुक्यापेक्षा छोट्या गावातील किती हा आकडा शोधला तर मुद्दा स्पष्ट होईल. भारतातील आयआयटीचा जो अभ्यास झाला त्यात बहुसंख्य विद्यार्थी भारतातील केवळ सात महानगरांतून आलेले आहेत, शहरातील मुले सिलिकॉन व्हॅलीत जाताना, आदिवासी मुले मेलघाट व्हॅलीत पाखरं मारत आहेत

शिक्षणाच्या गुणवत्ते बाबत कुणाचेच उत्तरदायित्व नक्की नसल्याने केवळ खर्च होतो पण हिशोब विचारला जात नाही. तेव्हा सुधारणा करणार आहोत म्हणजे काय करणार आहोत? आज राजकीय हस्तक्षेपामुळे संघटना ताकदवान असल्याने साधे साधे बदलसुद्धा मुष्किल झाले आहेत. तीव्र राजकीय स्पर्धेमुळे शिक्षकांच्या संघटित शक्तीला दुखावणे कठीण होते आहे. जे अधिकारी प्रामाणिक काम करतात त्यांच्यावर संघटना राजकीय दडपण आणतात.तेव्हा राजकारणी व नोकरशाहीच्या हातून गुणवत्ता निर्माण होणे कठीण वाटते.मला पालकांच्या हातात शिक्षणाची सूत्रे द्यावीत असे वाटते आहे.

तेव्हा व्यवस्थेअंतर्गत सुधारणा जरूर करू पण त्या मर्यादा लक्षात घेऊन वर्तुळाबाहेरचे उत्तर शोधले पाहिजे. पुन्हा प्राथमिक शिक्षणाचा नाही तर माध्यमिक महाविद्यालयीन व्यावसायिक अभ्यासक्रम यांचाही दर्जा समाधानकारक नाही.माध्यमिक शिक्षणात मध्यंतरी ९ वीच्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण झाले. त्यात ६३ टक्के विद्यार्थी अप्रगत ठरले. गरीब देशात प्राध्यापकांना लाखांनी पगार देऊनही जगातल्या पहिल्या ४०० विद्यापीठात एकही विद्यापीठ नसते. तेव्हा गुणवत्तेसाठी शाळा कॉलेजचे अनुदान पालकांच्या हातात द्यायला हवे.या सर्व परिस्थितीत मला केजी टू पीजी पर्यंत एज्युकेशन व्हौचर्स हाच भारतासाठी पर्याय वाटतो.

प्रत्येक विद्यार्थ्यावर शासन जितका खर्च करते,तितकी रक्कम थेट त्या त्या विद्यार्थ्याच्या पालकांना कुपण स्वरूपात द्यावी, या पद्धतीलाच व्हाऊचर सिस्टिम' म्हटले जाते. या पद्धतीमुळे गरीब असो वा श्रीमंत, शाळा निवडीचा हक्क पालकांना राहतो. यात खर्च तर शासनच करणार आहे व शाळांना अनुदानही शासनच देणार आहे.फक्त ते अनुदान शासन थेट देण्यापेक्षा पालकामार्फत शाळा कॉलेजला देतील यातून पालकांचे नियंत्रण शिक्षणावर येईल.

आपल्या देशाच्या अकराव्या पंचवार्षिक योजनेतील मसुदा पुस्तिकेत या कल्पनेचा पुरस्कार करण्यात आला आहे.अर्थशास्त्राच्या दृष्टीने मुद्दा हा आहे की तुम्ही सेवा देणार्युपेक्षा सेवा घेणार्याषला जर सबसिडी दिली तर ती अधिक प्रभावी होते.जगातील एकूण ११ देशात १८ प्रकारचे व्हाऊचर्स कार्यक्रम राबविण्यात आले.स्वीडन, चिली, कोलंबिया, इटली, डेन्मार्क,न्यूझीलंड, इंग्लंड, अमेरिका, बांगला देश इत्यादी प्रमुख देशांमध्ये व्हाऊचरची अंमलबजावणी देशपातळीवर करण्यात आली आहे. या देशांमध्ये यामुळे निकोप स्पर्धा निर्माण होऊन गुणवत्ता कशी वाढली याचे अनेक अहवाल उपलब्ध आहेत परंतु देशादेशात फरक असल्याने मला त्या देशांमधील यशस्वी व अयशस्वी अहवाल संदर्भ म्हणून घेणे गैरलागू वाटतात. आपण भारतात ही संकल्पना यशस्वी ठरेल का याचा आपल्या देशातील स्थिती लक्षात घेऊन उत्तरे शोधायला हवीत म्हणून मी परदेशी संदर्भ टाळले आहेत .

आज १२ वीला शहरी भागातील बहुसंख्य विद्यार्थी कॉलेजमध्ये केवळ ॲडमिशन पुरतेच येतात आणि क्लास च्या आधारे शिकतात. महाविद्यालयातही झालेले प्रवेश आणि उपस्थिती हे प्रमाण असेच आहे.वरिष्ठ महाविद्यालयात उपस्थित विद्यार्थी व खर्च यांचे प्रमाण काढले तर मुलांना व्हाऊचरच्या आधारे बाहेरून शिकविणे परवडेल अशीच अवस्था आहे . देशभर प्राथमिक शाळेतील२८ टक्के लहान मुलेसुद्धा खाजगी शिकवणीला जातात. बिहार ओरिसात तर अनेक सुशिक्षित झालेल्या तरुणांनी खेडेगावात शिकवणी वर्ग सुरू केले आहेत.मुलांची नावे प्राथमिक शाळेत आणि मुले या क्लासेसला बसतात. शरद जोशी एकदा म्हणाले होते की जर मुले क्लासेसच्या आधारेच शिकणार असतील तर क्लासेसलाच शाळेचा दर्जा द्यायला काय हरकत आहे. तेव्हा

उच्च शिक्षणात व्हाऊचर्सच्या आधारे वेगळा दृष्टिकोन घ्यायला हवा

गुणवत्तेतील महत्त्वाचा अडथळा हा नोकरीतील सुरक्षिततेचा व उत्तरदायित्व नसण्याचा आहे. एकदा पास झाल्याच्या प्रमाणपत्रावर मी ५८ व्या वर्षापर्यंत चांगले काम करील हे गृहीत धरले जाते. मुलांच्या गुणवत्तेचा व माझ्या पगारवाढीचा काहीच संबंध नसतो. त्यामुळे नोकरीतला कायम शिक्षक हा वर्गावर ५ मिनिट उशिरा जातो कारण त्याची पगारवाढ त्या मुलांच्या गुणवत्तेवर अवलंबून नाही आणि क्लास घेणारा हा पहाटे ५ वाजता उठून तास घेतो कारण त्याचे पोट त्या मुलांवर अवलंबून असते.तेव्हा जोपर्यंत ही नोकरीतील सुरक्षितता आपण काढत नाही तोपर्यंत गुणवत्ता येणार नाही. व्हाऊचर्स पद्धती शिक्षकांना अधिक कार्यप्रवण करील व त्यातून शाळा कॉलेज मध्ये एक निकोप स्पर्धा निर्माण होऊन त्यातून गुणवत्ता निर्माण होईल.

अर्थात प्रतिवाद म्हणून सरकारी अनुदानित शाळेत सुरक्षित असूनही अनेक शिक्षक उत्कृष्ट काम करतात असे म्हटले जाईल.पण ही संख्या किती आहे?कोणत्याही व्यवस्थेत २० टक्के लोक स्वयंप्रेरणेने काम करणारे असतातच पण बहुसंख्य तसे नसल्याने आपल्याला व्यवस्थात्मक बदलाची उत्तरे शोधावी लागतात. खाजगी शाळा कॉलेज दर्जेदार नाहीत असेही म्हटले जाईल. पण पालक जिथे चांगले शिक्षण देतील त्या सरकारी किंवा चांगल्या खाजगी शाळेला व्हाऊचर देतील त्यामुळे दोन्ही प्रकारच्या वाईट शाळा बंद पडतील.

आजची सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे शाळांची गरीब व श्रीमंत अशी विभागणी होत आहे. आज सरकारी शिक्षणात गरीब विद्यार्थीच जास्त उरले आहेत. गरिबांसाठीच्या सुविधा नंतर अधिकचगरीबसुविधा' (दर्जाहीन) बनत जातात असे अमर्त्य सेन म्हणतात. याचा अर्थ कोणताच अंकुश नसल्याने या सुविधा अधिकच बेताल होत जातात. ग्रामीण रुग्णालय घ्या किंवा रेशन दुकान घ्या किंवा शाळा कॉलेज घ्या, या सर्व ठिकाणी जिथे जिथे गरीब लाभार्थीची संख्या वाढत जाते तिथे तिथे नियंत्रणच निर्माण होत नाही. अशावेळी या गरीब पालकांचेच ग्राहक म्हणून सक्षमीकरण करायचे हाच मार्ग आहे. पालकांच्या हातात ग्राहक म्हणून जर सत्ता दिली तर पालक हे अधिक चांगले नियंत्रण ठेवू शकतील.

देशात श्रीमंतांना शाळा निवडण्याचा अधिकार आहे पण गरिबांना तो हक्क नाही. समान शिक्षण याचा अर्थ ही सर्व गरीब मुले उचलून तातडीने तमाम श्रीमंतांच्या शाळांमध्ये व खासगी मध्यमवर्गीय शाळांमध्ये व्हाऊचर्स पद्धतीने दाखल श्रीमंत शाळांना त्यांना सक्तीने शिकवायला लावली पाहिजेत. आजची कोंडी फोडायला हाच एकमेव मार्ग आहे.

ज्या शाळेत–कॉलेजमध्ये फक्त गरीब विद्यार्थीच जास्त संख्येने उरतील त्या शाळा तात्काळ बरखास्त करून त्या विद्यार्थ्यांना व्हाऊचर्स' देऊन ते विद्यार्थी त्याच शहरातील सर्व खासगी शाळांमध्ये विभागून टाकले, तर किमान विषमतेचा पहिला टप्पा आपण मोडून टाकू.गरीब व श्रीमंतांना एकाच शाळेत शिकायला आपण भाग पाडण्यासाठी हे करणे अत्यंत आवश्यक आहे. मान्य आहे की गरीब श्रीमंत विद्यार्थ्यांना एकत्र शिकण्यात समस्या येत आहेत परंतु त्यावर उत्तरे शोधणे आजची व्यवस्था सुधारण्यापेक्षा नक्कीच आटोक्यात आहेत. आश्रमशाळाचे रूपांतर तालुकास्तरावर वसतिगृहांमध्ये करून त्या गावातील इतर मुलांसोबत आदिवासी मुलांना शिकवता येईल व दोनपेक्षा जास्त वसतिगृहे काढून या विद्यार्थ्यांना व्हाऊचर्स द्वारे प्रवेश दिले तर स्पर्धेतून दर्जावर नियंत्रण राहील. बालकामगार, शालाबाह्य मुले, स्थलांतरित मजुरांची मुले,वेश्यां ची मुले, रस्त्यावरच्या मुलांसाठी जर व्हाऊचर्सची दुप्पट रक्कम देण्याची कल्पना मांडली, तर खासगी शाळा स्वतः होऊन ही वंचित मुले शोधून काढतील.

**व्हाऊचर्स योजनेचे शिक्षण क्षेत्रात पुढील लाभ होतील**

१) पालकांचे शाळांवर थेट नियंत्रण राहील. गुणवत्तेबाबत शाळा कॉलेज पालकांना उत्तरदायी राहतील.

२) शिक्षकांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळेल. सरकारी शाळा कॉलेजातील गुणवंत शिक्षकांना खूप मागणी राहील.

३) शासन केवळ वर्षातून एक केंद्रीकृत परीक्षा घेईल व त्यातील पात्र विद्यार्थ्याच्या प्रमाणातच व्हाऊचर्सचा खर्च देईल. शासनाला अभ्यासक्रम ठरविणे व परीक्षा घेणे व शाळा कॉलेजची तपासणी एवढेच काम राहील.

४) शिक्षकविद्यार्थी आकर्षित करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवतील. त्यातून शाळांमधील उपक्रमशीलता उंचावेल.शाळांमधील स्पर्धा अधिक निकोप होऊन ती विविध उपक्रमांची होईल. त्याचा अंतिम परिणाम हा शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात होईल.

५) आज पालकांच्या हातात काहीच अधिकार नाही तेव्हा त्या पालकांना शाळा कॉलेज जुमानत नाहीत पण पालकांच्या व्हौचर्सवर ते अवलंबून असल्याने पालकांना दबतील.

६ ) वेतन ठरविण्याच्या पद्धतीतही एक योग्य पद्धत विकसित होईल. आज शिक्षक प्राध्यापक संघटना मागतील तितके वेतन दिले जाते. परंतु जेव्हा व्हाऊचर्स पद्धती येईल तेव्हा समाजात ज्या प्रकारचे वेतन दिले जाते तितकेच वेतन मिळेल. आज प्राध्यापक दरडोई उत्पन्नाच्या कितीतरी पट वेतन घेतात आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक बाजाराच्या दराने पैसे मिळवतो ही विषमता संपू शकेल. शाळा कॉलेजला व्हाऊचर्स मिळाले तरच नोकरी राखता येईल अशी ही व्यवस्था आहे . त्यामुळे स्वत:ला सतत सिद्ध करावे लागेल

मात्र व्हाऊचर्स आले तरी शाळा कॉलेज चे तपासणीने मानांकन करून चांगल्या शाळांनाच स्पर्धेत ठेवावे लागेल व पालकांना चांगली शाळा निवडण्याचे निकष आपल्याला शिकवायला हवेत.

केवळ चांगली इमारत आकर्षक कार्यक्रम उपक्रम यावरून ते मत बनवितात. त्यासाठी अगदी सोप्या पद्धतीने मुलांना त्या इयत्तेत काय यायला हवे याचे ठोकताळे निकष शिकवावे लागतील.

सरकारी शाळा यात बंद पडतील का हा प्रश्न नेहमी विचारला जातो, चिली सारख्या देशात सरसकट सर्वच मुलांना व्हाऊचर्स दिले तरीसुद्धा ५५ टक्के विद्यार्थी हे सरकारी शाळेतच शिकत होते. त्यामुळे ज्या सरकारी शाळा खूप चांगल्या आहेत त्यांना काहीच धोका नाही. आजही राज्यात कितीतरी सरकारी शाळा अत्यंत दर्जेदार आहेत. कर्डेलवाडी या पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील शाळेत इतर गावातील पालकांनी मुले टाकली आहेत. तेव्हा ज्या दर्जेदार शाळा आहेत त्यांना खूप व्हाऊचर्स मिळतील व त्या शाळा अधिक दर्जेदार होतील. खाजगी शाळांच्या चकचकाटाला भुलून काही पालक तिकडे जातीलही पण जर तिथे गुणवत्ता नसेल तर पालक मुलांना तेथून काढून घेतील आणि खाजगी शाळा म्हणजे केवळ उद्योगपती नव्हे,शांतिनिकेतन पासून तर महाराष्ट्रातील सर्व प्रयोगशील शाळा यासुद्धा खाजगी शाळा आहेत. तेव्हा असे वेगळे प्रयोग आज आर्थिक अडचणीत आहेत पण त्यांना जर अशी व्हाऊचरच्या रूपाने मदत मिळाली तर ते प्रयोग फुलतील हे ही आपण लक्षात घेतले पाहिजे. गुणवत्ता सुधारायला कॉमन स्कूल हा उपाय मांडला जातो पण महाराष्ट्रातील छोट्या गावात तर एकच शाळा व एकच कॉलेज असते पण गुणवत्ता अभावानेच असते तेव्हा ते सिद्ध होत नाही .

आपल्याकडे खुल्या व्यवस्थेची मांडणी केली की थेट त्याला जागतिक बँकेचा दलाल ठरवले जाते.मलाही असेच अनुभवआलेत. समोरच्याचा प्रामाणिकपणालाच वादग्रस्त बनविले की मग प्रतिवाद करण्याची जबाबदारी येत नाही. माझ्यासारखा आदिवासी भटके यांच्या शिक्षणाचा सतत विचार करणारा कार्यकर्ता आजच्या व्यवस्थेकडून निराश होवून व्यवस्थेबाहेरची उत्तरे शोधाच्या या निर्णयापर्यंत का येतो याचा विचार करायला हवा.६० वर्ष आपण सरकारी नियंत्रित शिक्षणाचा प्रयोग राबविला, आता किमान प्रायोगिक तत्त्वावर तरी हा प्रयोग काही वर्षे राबवून बघायला काय हरकत आहे?

**– हेरंब कुलकर्णी**

**भ्रमणध्वनी– ९२७०९४७९७१**

# शेतकरी पुत्रांचा स्वाभिमान

शनिवार २२ जुलै २०१७ दुपारची वेळ होती. कामानिमित्त वाघोलीला गेलो होतो. अचानक धुवांधार पाऊस सुरू झाला म्हणून आडोसा घ्यायला दुचाकी रस्त्याच्या बाजूला लावून एक छोट्या हॉटेलात थांबलो. पाऊस लवकर उघडण्याची चिन्हे दिसत नव्हती म्हणून तिथेच एक चहा घ्यायचं ठरवलं. बाजूला आचारी गरम गरम कांदाभजी तळत होता. छान वातावरण तयार झालं होतं. माझ्याच बाजूला एक मजुराचं कुटुंब आडोशाला आलं, आई वडील व त्यांच्यासोबत अनुक्रमे अंदाजे ८ आणि ५ वर्षांचा मुलगा. आई वडील कसल्या तरी चिंतेत चर्चा करण्यात मग्न होते. दोन्ही मुले बराच वेळ खूप कुतूहलाने कांदाभजी कशी तयार केली जात आहे पाहत होते आणि मी त्यांच्याकडे पाहत होतो. माझा लहान भाचा जसा अशा गोष्टी आवडीने मागवून खातो अगदी तसंच काहीतरी मला त्यांच्या विषयी वाटलं. म्हणून ना राहवून मी त्यांना विचारलं की बाळा कांदाभजी खाणार का? मी देतो पैसे हॉटेलवाल्याला. पहिल्याच प्रश्नात ज्येष्ठ मुलगा नाही म्हणाला. मग मी विषयांतर करत मोठ्या मुलाला कुठून आला काय करतोस विचारलं. तेव्हा तो बोलू लागला की मी अकोल्याचा आहे आणि शाळेत तिसरीला जातो. त्याच्या सोबत बोलताना जाणवलं की ते कुटुंब अकोल्याहून सततच्या दुष्काळ आणि नापिकीमुळे गाव सोडून वाघोली येथे मजुरी करत आहे. मग मी परत एकदा त्याला सांगितलं की तू मागशील ते देणार मी खाण्यासाठी. तू सांग काय हवंय या हॉटेल मधून? त्याने परत उत्तर दिलं की नकोय मला काही आणि छोट्या भावाकडे बोट दाखवत म्हणाला की याला विचारा काय पाहिजे. मी लहान भावाकडे पाहिलं तर तो आईला जाऊन बिलगला. मी परत विचारलं की अरे सांगा पटकन तुम्ही काय खाणार? तुम्ही मागाल ते देणार आज मी तुम्हाला!

मोठ्या मुलाने परत नकारार्थी मान हालवली आणि म्हणाला की आम्ही आताच घरून पोटभर जेवण करून निघालोय. त्यांचं उत्तर ऐकून खरंच मी भारावून गेलो आणि ठरवलं की नको आता यांचा स्वाभिमान दुखवायला. ८ वर्षे वय असलेला मुलगा किती समंजस आणि स्वाभिमानी आहे. किती विलक्षण गोष्ट आहे की त्याला त्याच्या परिस्थितीची याच वयात जाणीव आहे. काही झालं तरी कोणापुढे झुकायचं नाही हात पसरायचे नाही हा गुण जणू काही त्याच्या रक्तातच आहे असं जाणवलं.

आपला देश हा भारत आणि इंडिया या दोन विचारसरणीमध्ये विभागला गेलाय. इंडिया मधील उद्योगधार्जिने सरकार आणि बेशिस्त प्रशासन विविध फसव्या योजनांच्या नावे शेतकऱ्यांचा पदोपदी अपमान करून त्यांना दुय्यम वागणूक देत असताना, ही अशी गुणवान मुले भविष्यात भारताचं नेतृत्व नक्कीच करतील. भारताचं भवितव्य उज्ज्वल असल्याचं समाधान मला सुद्धा वाटलं.

जसा पाऊस बंद झाला तसा मी पटकन जायला निघालो आणि दुचाकीवर बसताना दोघांचा निरोप घेताना त्यांना स्मितहास्य केलं. माझ्याकडे पाहून गोड हसत त्या दोघांनीही चटकन हात उंचावून मला निरोप दिला. त्यांच्या चेहऱ्यावर जे भाव होते तेच खरं समाधान होतं.

**– पंकज गायकवाड**

ईमेल : pankaj_gaikwad@rediffmail.com

# सुगीचा सण - दिवाळी

**सौ. प्रज्ञा बापट**
यवतमाळ

ज्वारी, बाजरीची खळी झाली. कापसाचे वेचे सुरू झाले. तिळाचे कोचरे छपरावर गेले की दिवाळी येते. दिवस थोडा लहान होतो. धान्याच्या चुंगळ्या आणि कापसाच्या गाठोड्यांनी घर कसं भरल्या सारखं दिसतं. अंगणात गायी म्हशींची वासरं, वगारं असतात. दुभत्या गायी, म्हशी हिरवा चारा खाऊन चरवी भरून दूध द्यायला लागल्या की दिवाळी येते.

शेतकऱ्याच्या घराला घरपण येतं. पेरण्याच्या दिवसात, शेतात गेलेली लक्ष्मी घरात येते. दिवाळी हा सुगीचाच सण. शेतकऱ्यांचाच! शेतकरी बायकांचा वसुबारसेला दिवसभर उपास. संध्याकाळी गाईवासराची पूजा करायची गाईला ओंजळभर बाजरी खाऊ घालायची आणि सगळ्यांनी बाजरीची भाकरी, गवारीच्या शेंगांची भाजी, तिळाची चटणी असं जेवण करायचं.

मग धनतेरस, त्याला धनत्रयोदशी धन्वंतरी जयंती अस जोड शब्दात म्हणतात. हा दिवस शेतकरणींच्या आवडीचा. लसूण जिऱ्याच्या डब्यातली बचत ह्या दिवशी बाहेर निघते. आणि बाई हकानी नवीन भांडी घ्यायला जाते. असेल तालेवारीन तर सोन्या चांदीचे मणी घेते. नाहीतर ठोक्याची पितळेची परात आणि पुजेचा गडवा एखादा गंज तरी घेतला जातो.

दिवाळीचा फराळ - आजीकडून, आईकडून, सासूकडून शिकलेले पदार्थ, शेजारणीकडून नव्यानी आलेल्या, जावेकडून, भावजयीकडून, शिकून घेतलेले पदार्थ हौशीनी केले जातात. गरिबी आणि कष्ट जन्मभरासाठी आहे. पण म्हणून कायम रडतच राहयच कां? चार दिवस का होईना, आनंद द्यायचा आनंद घ्यायचा! दिवाळीला आणि फराळाला नाक मुरडणाऱ्यांकडे काणाडोहा करायचा.

नरकचतुर्दशीला सगळ्यांच्या डोक्यात अंगाला तेल लावून, गरम पाण्याच्या आंघोळी.

मग लक्ष्मीपूजन, त्यासाठी नवीन धान्याच्या बोळक्यांची उतरंड, सीतादेवी झाल्या बरोबर त्याच पड्डीत वेचलेला कापूस, एखाद दुसरा दागिना आणि थोडे नगद नारायण! लेकीसुना अंगणभर रांगोळ्या काढतात. आता विजेचे चमचमते दिले आले. आधी छोट्या छोट्या पणत्या चमचाभर तेलांत शांतपणे उजेड देत असायच्या. लक्ष्मीपूजनाला प्रसाद तिहाचा लाडू, अनरसा आणि सीताफळ!

मग पाडवा, बली प्रतिपदा, बळीला वामनानी पाताळात गाडलं तो दिवस. हजारो वर्ष झाली, हा दिवस अजूनही सगळ्या शेतकऱ्यांच्या लक्षात आहे. काय घडलं होत तेव्हा? कोण हा बळी? हा वामन कोण ?

हजारो, हजारो वर्षापूर्वी फक्त नद्या, तलावांजवह रहाणारा माणूस, जमिनीकडे वळला. आधी फक्त कंदमुळे मासे आणि शिकार करून त्यावर पोट भरत होता. मग जमिनीत खणून बिया पेरायला माणसाच्या बायकोनी सुरूवात केली. पुढे बैलाच्या मदतीनी शेती सुरू झाली आणि माणूस शेतीचा मालक ठरला. जगण्याच्या एका नव्या पद्धतीची सुरूवात झाली. माणसाला नातीगोती समजायला लागली होती. त्याचं कुटूंब तयार झालं. वाड्या, वस्त्या उभ्या झाल्या. शेतीत कष्ट करणाऱ्यांची, शेती पिकवून जगणाऱ्यांची एक जमात तयार झाली. धान्य चोरीला जाऊ नये म्हणून काहींनी फक्त राखणीचच काम स्वीकारलं. त्यांच्या म्होरक्याला राजा म्हणत.

शेतकरी जमातीचा म्होरक्या बळी, शेतात कष्ट करून धान्याचे डोंगर उभे करायचा. मूठभर पेरून टोपलंभर धान्य पिकवण्याचं तंत्र शेतकऱ्यांना अवगत झाल. ही जमात कष्टकरी श्रमिकांची होती. बळीचा शेतकरी समाज सगळ्यांना जेऊ घालत होता. आता उत्पन्नाचा सहावा हिस्सा राजाला देण्याची पद्धत सुरू झाली. बळी आणि शेतकरी, उत्पन्नाचा सहावा हिस्सा प्रामाणिकपणे राजाला देत असत.

कष्ट केले की धरणीमाता हजारो हातांनी देते असं अनुभवणाऱ्या शेतकऱ्यांची दानत अफाट होती. कुणालाही काहीही द्यायची त्यांची तयारी असे. फक्त मागायचा अवकाश. ही दिलदारी, ही दानात वाढत गेली. इतकी की दान देण्यावरूनच अनिष्ठा मोजली मापली जाऊ लागली.

बळी आणि त्याच्या शेतकरी जमातीची, त्यांच्या कष्टाची, समृद्धीची, दानतीची किर्ती सगळीकडे पसरली. त्या जमातीला सन्मान मिळू लागला. शुक्राचार्य नावाचे ब्राह्मण त्यांचे गुरू. ज्ञानी, विचारवंत सगळ्यांचे स्वभाव, गुणदोष ओळखणारे. बळी आणि त्याच्या जमातीचे खरे हितचिंतक, दूरदृष्टीच्या शुक्राचार्याचे तत्वज्ञान तर्कशुद्ध आणि विचारांची मांडणी स्पष्ट, रोख-ठोक होती. बळीला दान देण्याचा चढलेला उन्माद त्याला संकटात आणेल याची ते वेळोवेळी त्याला जाणिव करून देत. आणि बळी दुर्लक्ष करी.

बळी अनेक शिबीरं होत असे. त्याला यज्ञ म्हणत. यज्ञासाठी आलेल्या सगळ्यांना दान देऊन संतुष्ट करण्याचा त्याला कैफ चढला होता. राजानी आपल्या चतुर ब्राह्मण अमात्याला यज्ञात पाठवलं. त्याचं नाव वामन. ठेंगणा, भाषेवर प्रभुत्व, गोड बोलणं, मनातला हेतु दुसऱ्याला कळू न देणं, ही त्याची वैशिष्ट्य. राजाच्या प्रशासनात असल्यामुळे सुखवस्तु व्यक्तीमत्त्व. बळीच्या यज्ञात वामन आलेला बघून शुक्राचार्य सतर्क झाले. वामनानी बळीची अफाट स्तुती केली. ''तू किती चांगला, किती प्रसिद्ध, करण

दानशूर! तू, तुझे वाडवडील कसे कुळवंत, धनवंत'' बळी सुखावला. शुक्राचार्यांनी पुन्हा पुन्हा सांगूनही वामनाच्या गोउ बोलण्याला फसला. आणि त्याला शुक्राचार्यांच बोलण ही आवडेना. त्यांचा सल्ला घेणं दूरच. बळीचे वडील विरोचन आणि आजोबा प्रल्हाद यांच्यापासून सगळ्यांची वारेमाप स्तुती वामनानी सुरू केला. यज्ञाच्या दानसत्राचा दिवस आला. दान घेणाऱ्यांमध्ये वामनाला बघून शुक्राचार्यांनी धोका ओळखला ते स्वत: तिथे ठाण मांडून बसले. पण उन्माद चढलेल्या बळीनी आपल्या गुरूंचा अधिक्षेप केला. त्यांच्या बोलण्याकडेच नव्हे तर त्यांच्याकडेच दुर्लक्ष केले.

दान घ्यायला वामन पुढे सरसावला बळी आपल्याच दानशूरतेच्या उन्मादात. दानाचा संकल्प वामनाच्या हातावर पाणी सोडून करण्यापूर्वी शुक्राचार्यांनी निकटाने विरोध केला. पण बळीने त्यांना धुडकावून लावले. आणि वामनाला तीन पावलं जमिनीचे दान दिले. वामनानी दोन पावलात स्वर्ग आणि पृथ्वी व्यापली तिसर पाऊल बळीच्या मस्तकी ठेवून त्याला पाताळांत गाडलं. पुराणातल्या रूपकात वर्णन अस आहे. की दान संकल्पाच पाणी वामनाच्या हातावर पडू नये म्हणून शुक्राचार्य बळीच्या पाण्याच्या झारीत जाऊन बसले. झारीतून पाणी पडेना. वामनाला शुक्राचार्यांची भिती होती. त्याने बळीला उपहासाने म्हटले संकल्पाचे पाणी माझ्याहातावर पडू तर दे. तुला मनापासून दान द्यायचे आहे का? झाले, आता हा बळीच्या प्रतिष्ठेचा प्रश्न झाला. बळीने झारीत टेंभीची काडी घातली आणि झारीतल्या शुक्राचार्यांचा डोळा फुटला. म्हणजे बळीने शुक्राचार्यांचा दृष्टीकोन नाकारला. या रूपकाचा अर्थ असा की फक्त शेतमालाच्या उत्पन्नाचा सहावा हिस्साच नाही तर शेतजमिनीची मालकी राजाकडे आली. शेतमालाचे व्यवहार, शेतसारा आणि कर यावर राजाची त्याच्या प्रशासनाची पकड बसली. बळी नुसता नावाचा राजा त्याची मालकी फक्त कष्टावर!

आजही बळी शुक्राचार्यांच ऐकत नाही. वेगवेगळे वामन त्याच्याकडे दान मागायला येतात. काही काही वामन शुक्राचार्यांचाच आव आणतात. शुक्राचार्यांच्याच भाषेत बोलतात. आता ते मतदान मागतात. आणि अजूनही बळीचा उन्माद ओसरला नाही. बावळटपणा संपला नाही. कुणी कौतुक केलं. बापजाद्यांची आठवण करून दिली की आपल्या आयुष्याच्या पाच वर्षांच्या बऱ्यावाईटाचे हक तो कोणत्याही वामनाला देतो.

म्हणून प्रत्येक शेतकऱ्याने दिवाळीच्या पाडव्याची ही आठवण ठेवावी. पुराणातल्या वामनाला शिव्या आणि आजच्या वामनाच्या गळ्यात हार! असे वागून काहीही होणार नाही. स्वत:तला उन्माद काढून टाकावा. (उन्माद म्हणजे फाजील आत्मविश्वास) बावळटपणा सोडून द्यावा. सत्ताधीशांनी बुद्धीवान प्रशासनाला पुढे करून. आपल्याला जेरबंद केल आहे, याची जाणीव ठेवावी. या जाणीवेची एक जरी पणती तेवत राहिली तर बळीच्या उद्धाराची काही शक्यता आहे. अन्यथा आपल्याच उन्मादात, वामनाला शिव्या घालत पाताळातच रहावे लागेल.

♦ ♦ ♦

---

# शून्यातून विश्व

**दारा सिंह –**
पंजाबमधल्या एका सामान्य खेड्यात आखाड्यात कुस्ती खेळत होते.रानात गुरं चरायला जात होते.गुरांना सांभाळता सांभाळता कुस्तीची आवड निर्माण झाली.जगभर कुस्त्या जिंकल्या.चित्रपटात कामे केली.राज्यसभेत खासदार म्हणून जाताना मनात एकच भावना असायची. एका खेडेगावात आखाड्यात कुस्ती खेळणारा मुलगा खासदार झाला.

**धिरुभाई अंबानी –**
वडील प्राथमिक शिक्षक होते. सासरे पोस्टमन होते.भाऊ रेशनिंग ऑफिसात नोकरीला होता. स्वतः ते पेट्रोल पंपावर क्लार्क म्हणून तीनशे रुपये पगारावर नोकरी करत होते.अशा वातावरणात स्वतःचे औद्योगिक साम्राज्य निर्माण केले.

**स्टीव्ह जॉब्ज –**
कोकच्या रिकाम्या बाटल्या विकून जेवणासाठी पैसे मिळवावे लागले.जगातल्या मोठ्या कॉम्प्युटर कंपन्यांपैकी एक 'ॲपल' ची स्थापना केली.

**लक्ष्मणनराव किर्लोस्कर –**
दहा वर्षे ड्राइंग टीचर होते. त्यांनी नांगराचा कारखाना निर्माण केला.

# सुकाणू समितीची बैठक

माझा जन्म शिक्षण सर्व काही पुण्यातच. माझं गाव चाकण जवळ अगदी १० १२ की.मी. अंतरावर. मी शरद जोशी कधी प्रत्यक्ष पाहिले नाही किंवा ऐकले नाही याची नेहमी खंत वाटायची. जेव्हा सुकाणू समितीच्या जिल्हावार तारखा जाहीर झाल्या त्या दिवसापासून ठरवलं की आपण तिथे जायचं. मी शरद जोशी सरांची जेवढी शक्य तितकी पुस्तके आधीच वाचून काढली होती. त्यामुळं शरद जोशींचे शिष्य कसे बोलतात कसे विचार मांडतात एवढं पाहायची मला खूप उत्सुकता होती. आणि तिथे जाण्यापूर्वी खूप काही प्रश्न सुद्धा तयार करून गेलो होतो की जेणेकरून जर तिथे संवाद झाला तर आपण त्यांना काही विचारू शकतो.सभेसाठी वेगवेगळ्या गावातून शेतकरी जमले होते. मंडप आणि इतर नियोजन पाहून मी जरा गोंधळून गेलो पण मनात म्हणालो की इथे राजकीय सभा नाही त्यामुळं इतका विचार करायला नको. व्यासपीठावर अनेक हौशे नवशे स्वयंघोषित शेतकरी नेते जमा झाले होते. त्यापैकी काही सन्माननीय व्यक्ती सुद्धा होत्या. कार्यक्रमाची सुरुवात उत्साहाने झाली पण नंतर कार्यक्रमात रट्याळपणा वाढला. कोणी यायचा आणि संधी साधून भाषण करायचा. हमाल संघटनेचे नेते आदरणीय बाबा आढाव त्या वक्त्यांना नम्र विनंती करत होते की आपलं म्हणणं २ मिनिटांत सांगा. पण माइक हातात आल्यावर ऐकतील ते वक्ते कसले!

कार्यक्रम सुरू असताना अनेकदा पावसाच्या सरी येऊन गेल्या पण पावसात भिजणारा एकही शेतकरी आडोसा घेण्यासाठी उठला नाही कारण तो आला होता त्याच्या न्याय्य हक्कांसाठी, हमीभाव आणि कर्जमुक्तीसाठी. एवढ्या भर पावसात शेतकरी बांधव ४ तास बसून राहिले आणि वक्ते बोलतच राहिले. ज्या डाव्या पक्षांनी नेहमी शेतकरी विरोधी भूमिका घेतली त्यांची व्यासपीठावरील उपस्थिती ठळकत होती आणि त्यांच्या लाल बावट्याच्या घोषणा सुद्धा व्यासपीठ गाजवत होत्या.

सुरुवातीला सन्माननीय बाबा आढाव यांनी १४ ऑगस्ट चे आंदोलन कसे करावे याची रूपरेषा मांडली. अगदी सरळ सोप्या शब्दात त्यांनी सत्याग्रही आंदोलनाच स्वरूप मांडलं. काही वेळाने आमदार बच्चू कडू यांनी आंदोलन कसं करावं याबद्दल सांगितलं आणि सोबत मिरची पूड वगैरे खिशात बाळगण्याचा सल्ला दिला!

व्यासपीठावरून सरकारी योजना कशा मारक आहेत याबद्दल बोललं जाईल असा मला वाटलं होतं. काही अंशी सर्व वक्त्यांनी ते स्पष्ट केले सुद्धा पण काही वक्त्यांनी सरकार वामनांच आहे, मुख्यमंत्री ब्राम्हण आहे, हे सरकार आपल्याला पाडलं पाहिजे अशी घातक विधाने केली. हे मला अजिबात नाही पटलं. देशात इतर पक्षांची सरकारे होतीच की! सरकार बदलून काही साध्य होऊ शकत नाही. शेतकरी चळवळीचा राजकीय व्यासपीठ म्हणून वावर होतोय असे मला जाणवू लागले.

कोणी कस आंदोलन करावं किंवा कसं आंदोलन असावं याबद्दलचे प्रत्येकाचे विचार स्वतंत्र असू शकतात पण एकाच व्यासपीठावर आंदोलनाबाबत दोन वेगवेगळ्या विरोधाभासी संकल्पना मांडल्या जात असतील तर ते चळवळीच्या ऱ्हासाला पोषक वातावरण बनवतं अस माझं स्पष्ट मत आहे.

४ तासानंतर कार्यक्रम संपला तेव्हा मात्र मी निराश होऊन बाहेर पडू लागलो. तिथे बाजूला एक नेते दिसले, मी त्यांना जाऊन भेटलो आणि विचारलं की सर्वजण स्वामिनाथन आयोगाचा आग्रह करत आहेत पण कोणीच शरद जोशी यांच्या मार्शल प्लॅनचा उल्लेख कोणीच का नाही केला बरं? त्यांचं उत्तर खूपच चकित करणार होत. अरे मार्शल प्लॅन असो किंवा स्वामिनाथन आयोग काहीतरी हातात पडू दे आपल्या. एक मंजूर झाला की बाकी घेऊच की आपण.

क्षणभर मीच गोंधळून गेलो आणि निराश होऊन घराकडे पाउले टाकत निघालो. आणि मनात ठरवूनच टाकलं की जिथे शरद जोशींच्या संघटनेव्यतिरिक्त इतर संघटनांच्या कार्यक्रमाला हजेरी लावणार नाही.

**– पंकज शिवाजीराव गायकवाड**
ईमेल : pankaj_gaikwad@rediffmail.com

# शेतकरी आंदोलकांची शीरगणती

शेतकरी आंदोलनाला उण्यापुऱ्या ४० वर्षाचा दैदिप्यमान इतिहास असून या आंदोलनांच्या होमकुंडात सलग ५ वर्षांपेक्षा जास्त काळ सक्रिय राहून व स्वतःच्या खिशातून खर्च करून आंदोलन तेजस्वी करण्यात आपले योगदान देणाऱ्या शेतकरी योद्ध्या पाइकांची संख्याही काही लाखाच्या घरात आहे. पण इतिहासाकडे मागे वळून पाहिले तर या भूमिपुत्रांची इतिहासाने नाममात्र सुद्धा दखल घेतली असल्याचे दिसत नाही.

शेतकरी आंदोलकांची शीरगणती करण्याचा एक उपक्रम बळीराजा डॉट कॉमने हाती घेतला आहे. तन/मन/धनाने किंवा तनमनधनाने ज्यांनी ५ वर्षांपेक्षा जास्त काळ शेतकरी आंदोलनात सहभाग घेतला आहे त्यांनी आपापली नावे नोंदवून हा उपक्रम यशस्वी करावा, अशी विनंती करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीची पद्धत जाणून घेण्यासाठी http://www.baliraja.com/ganti येथे क्लिक करा.

# शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे करणार?

**अंतराची आंदोलने**

शेतकरीविरोधी कायदे कायम ठेवून शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे दुप्पट करणार हे कोणीच सांगत नाही.सरकारची (मग ते कोणत्याही पक्षाचे असो) अशीच शेतकरी विरोधी धोरणे सुरू राहिली तर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याऐवजी आत्महत्या दुप्पट होतील हे मात्र निश्चित आहे. जोपर्यंत शेतकरी सुखी होणार नाही तोपर्यंत कोणीच सुखी होऊ शकत नाही. शेतकरी सुखी व्हावा म्हणून कोणालाही काहीही करण्याची गरज नाही. शेतकरी त्याच्या मालाला भाव सुद्धा मागत नाही त्याच्या मालाला भाव मिळू नये म्हणून तुम्ही (सरकार) जे प्रयत्न करत ते बंद केलं पाहिजे व शेतकरी विरोधी कायदे रद्द केले पाहिजेत. शेतकऱ्यांनी व त्यांच्या तरुण पोरांनी हताशपणे निराश होऊन आत्महत्या करण्यापेक्षा संघटित होऊन सरकार विरुद्ध लढायला तयार झाले पाहिजे, सरकारला शेतकरी विरोधी धोरणे बदलण्यास भाग पाडले पाहिजे.

मला तुम्हाला हे सांगण्याचा नैतिक अधिकार आहे कारण मी स्वतः आदरणीय शरद जोशींच्या नेतृत्वाखाली गेल्या ३७ वर्षा पासून शेतकरी संघटनेचे काम करत आहे. मी वकील होण्याआधी माझ्यावर अनेक गुन्हे दाखल झाले होते म्हणून मी स्वतः वकील झालो. आता आख्खाच्या आख्खा शेतीमाल फुकटच्या भावात गेला तरी मला काही फरक पडणार नाही पण शेती करत असताना मी जे अनुभवलं व जे चटके सोसले ते मला आजही स्वस्थ बसू देत नाही म्हणून मी वकिली करत असताना माझ्या परीने हे काम करतो.

संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे की बुडता हे जन पाहवेना डोळा, म्हणोनि कळवळा येत असे. त्यांनी असेही सांगितले आहे की जे जे आपणासी ठावे, ते ते दुसऱ्याशी जाऊन सांगावे, शहाणे करून सोडावे, सकळ जण मी काही संत महात्मा नाही पण संत वाययाचा तुटपुंजा अभ्यासक आहे म्हणून माझ्यावर संत वाययाचाही थोडाफार प्रभाव आहे म्हणून लेखन प्रपंच.

**– ॲड प्रकाश पाटील,**
**औरंगाबाद**

---

# शून्यातून विश्व

**जॉनी वॉकर –**

बस कंडक्टर होता.प्रवाशांची तिकिटे फाडता फाडता त्याच्या सिनेमाची तिकिटे लोकांनी घ्यायला सुरुवात केली.एका तिकिटाचा प्रवास दुसऱ्या तिकिटावर स्थिरावला.

**महेमूद –**

ड्रायव्हर होता.चलती नाम गाडी,सबसे बडा रुपया त्याने म्हणायला सुरुवात केलीआणि गाडीचे व्हील हातातून केव्हा निसटून गेले व ते नायक कसे झाले हे त्यांना स्वतःलाही समजले नाही.


**ग्रेटा गार्बो –**

गरीब शेतकऱ्याच्या घरात जन्म झाला.तेराव्या वर्षी गरिबीमुळे शाळा सोडावी लागली.दुकानात सेल्सगर्ल म्हणून नोकरी करत असताना अचानक हॉलिवूडचे दरवाजे उघडले.

**चार्ली चॅप्लिन –**

प्रचंड गरिबी अनुभवली. विद्यार्थीदशेत फुले विकण्यापासून अनेक कामे केली.आपल्या विनोदाने जगभरच्या लोकानं हसवले.

# शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष भास्करराव बोरावके यांना भावपूर्ण श्रद्धांजली



शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष व कार्यकर्त्यांचे भाऊ भास्करराव शंकर बोरावके (वय ८६) यांचे दिनांक १७/१०/२०१७ रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा हेमंत, मुलगी गीतांजली रासकर, नातवंडे असा परिवार आहे. शेतकरी संघटना स्थापन करण्यात बोरावके यांचा पुढाकार होता. शरद जोशी यांचे ते उजवा हात आणि 'संघटनेची आई' असे त्यांना संबोधले जाई, राष्ट्रसेवा दलात व साईबाबा संस्थानावर त्यांनी विश्वस्त म्हणून काम केले. शंकर फळबाग सोसायटीचे ते संस्थापक होते. १९५२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी या बागेची पाहणी केली होती. त्यावेळी नेहरू यांनी बागेचा 'कोपरगावचा कॅलिफोर्निया' असा उल्लेख केला होता. स्वामी सहजानंद भारती, बाबा आमटे, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, बापूसाहेब काळदाते, भाई वैद्य, मधू दंडवते, किशोर पवार, बाबा आढाव यांचे ते सहकारी होते. रामचंद्रबापू पाटील भास्करराव बोरावके यांच्या निधनामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शरद जोशी यांचे माधवराव बोरस्ते, माधवराव मोरे, प्रल्हादपाटील कराड व भास्करराव बोरावके हे राज्यातील प्रमुख साथीदार होते. भास्करराव बोरावके शेतकरी चळवळीबाबत अत्यंत एकनिष्ठ असल्यामुळेच पंजाब व हरियानातील शेतकऱ्यांच्या मनातही त्यांच्याविषयी मोठी आदराची भावना होती.

# शोकसंवेदना

**अनिल घनवट (अध्यक्ष, शेतकरी संघटना) :** दि. १५/१०/१७ ला स्व. मोहन गुंजाळांच्या स्मृती दिनी येवला येथे झालेल्या कार्यक्रमाचे फोटो वॉट्सॲपवर पाहिले. ललित बहाळे बरोबर भास्करभाऊंचा हसतमुख चेहरा पाहून आनंद झाला. आदल्या दिवशीच माझ्या पत्नीचे मणक्याचे ऑपरेशन झाल्यामुळे मी पुण्याला दवाखान्यातच होतो. दुपारी अनंत देशपांडेंचा फोन आला व भाऊ गेल्याचा संदेश दिला. काळजात धस्स झाले. आताच काही मिनिटां पूर्वी भाऊंचा हसरा चेहरा पाहिला होता अन् आता ही बातमी. संध्याकाळी ७ वा. कोपरगाव येथे अंत्यविधी असल्याचे सांगितले. पुण्याहून कोपरगाव पर्यंत चारचाकीने प्रवास करायचा म्हटले तर अगदी कट टू कट वेळ हाती होता. पत्नीला लागणारे औषधांची व जेवणाची सोय करून तडक निघालो. संघटनेसाठी आपलं सर्वस्व अर्पण करणाऱ्या या देव माणसाचं अंतिम दर्शन चुकवायचं नाही ठरवलं होतं. नगर जिल्ह्यात शरद जोशींना घेऊन येणारे व पुढे संघटनेला आर्थिक आधार देणारे भाऊ बोरावके. साहेबांना त्या काळात भाऊंची साथ मिळाली नसती तर कदाचित संघटना इतकी बलशाली झाली नसती. आम्ही काही कुटाने करून तुरुंगात गेलो की सोडवायची धडपड भाऊ करायचे व बाहेर आल्यानंतर सत्कार करायला पण न चुकता हजर असायचे. सतत हसतमुख व सागरासारखे शांत. त्यांना मी कधीच खवळलेले पाहिले नाही. पण साहेबांचा एखादा निर्णय चुकला तर तोंडावर सांगण्याची हिंमत फक्त भाऊचीच. नेहरू नीतीचा विरोध करण्यासाठी साहेबांनी ऩेहरुंचे पुतळे खाली खेचण्याचा आदेश दिला होता. कशाला मेलेले मुडदेउकरून काढता? असे भाऊ म्हणाल्याचेसाहेबांनी एका कार्यकारिणीत सांगितल्याचे मला आठवते. अतिशय प्रांजळ अंतःकरण, सज्जनपणाची व्याख्या जगलेला देव माणूस. कार्यकर्त्यांच्या मनात काही खदखद असेल तर भाऊ जवळ मन मोकळं करायला कोणी संकोच करीत नसे. या वयातही संघटनेच्या कामाचा उत्साह कणभरही कमी झालेला नव्हता. 'संघटनेचा बिल्ला बरोबर घेऊनच जाणार'असे ते नेहमी म्हणत व तो शब्द त्यांनी पाळला सुद्धा. भाऊंच्या जाण्याने संघटनेचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे. आम्ही पोरके झाल्याची भावना मनात आहे. मी, माझे कटूंबिय व शेतकरी संघटनेचे सर्व कार्यकर्ते चि. हेमंत बोरावके व कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहोत. भाऊंच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच भावपूर्ण श्रद्धांजली!


**ॲड प्रकाशसिंग बी पाटील** (अध्यक्ष शेतकरी संघटना वकील आघाडी औरंगाबाद) :शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ नेते, शेतकरी संघटनेचे आधारवड, ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व व युगात्मा शरद जोशी यांचे सहकारी, आदरणीय भास्करराव भाऊ बोरावके ह्यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. परमेश्वर मृत आत्म्याला चीर शांती देवो व त्यांच्या मृत्यूमुळे झालेला आघात सहन करण्याची शक्ती त्यांच्या व आमच्या परिवाराला देवो.

**डॉ. गिरधर पाटील :** भास्करराव बोरावके यांनी सुरवातीपासून शरद जोशी यांच्या खांद्याला खांदा लावून महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर शेतकऱ्यांचे लढे उभारले. भास्करराव राष्ट्र सेवादलाचे काम करायचे; पण शरद जोशी यांची भेट झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण जीवन केवळ शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढण्यातच व्यतित केले. शरद जोशी यांचे खंदे कार्यकर्ते म्हणून त्यांची नोंद घेतली जाईल.

**संतू पाटील झांबरे :** दोन दिवसांपूर्वीच शेतकरी संघटना नेते मोहन गुंजाळ यांच्या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाला भास्करराव धुळगावला आले होते. त्यावेळी त्यांनी तरूणांना चळवह हाती घेण्याचे आवाहन केले होते. शेवटपर्यंत शेतकऱ्यांसाठी लढणारा नेता गेल्याने दुःख झाले आहे. अतिशय संयमी, हुशार, आपलासा करणारा नेता गेल्याने नक्कीच शेतकरी चळवळीचे न भरून येणारे नुकसान झाले आहे.

# कार्यकर्त्यांचे ''भाऊ'' भास्करभाऊ

**–ॲड. अनंत उमरीकर**



राजकीय पक्षांच्या लोकांचा एक छाप असतो. छापाचा गणपती असतो ना, तसा, निदान पूर्वी तरी होता, आजकाल असं नाही. हल्ली सर्व राजकीय पक्षांच्या लोकांचा एकच छाप असतो. कडक इस्त्रीचे, तलम, टेरी खादीचे शुभ्र पांढरे कपडे. हाताच्या बोटात कुठल्या ना कुठल्या महाराजांच्या अंगठ्या. कानाशी सतत मोबाईल, कपडे फाडून बाहेर येऊ पाहणारी शरीरयष्टी, चेहऱ्यावर संपन्नतेची तकाकी, वागण्यात उद्दामपणा, प्रसंगी लाचारी. या वर्णनाचा कुणी माणूस दिसला, की नक्की समजावं हे महाशय कुठल्या न कुठल्या पक्षाचे नेते आहेत. मी वेगवेगळ्या छापाचे कार्यकर्ते म्हणतोय ते आजचे नाही तर जुन्या काळचे. म्हणजे गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, एस.एस. जोशी, नानासाहेब गोरे यांच्या काळाचे. त्या काळच्या समाजवादी लोकांचा एक छाप होता. खादीचे जाडेभरडे धुवत कपडे. त्यावर कोट किंवा जाकीट, तेही धुवट. खांद्याला शबनम, डोईवर बीन कुंपणाचे केस. पायात अंगठा तुटलेली चप्पल, किमान टाचा घासलेली तरी. या वर्णनाचा माणूस दिसला, की समजावं हा नक्की समाजवादी! हे लोक शक्य तो आपापला कळप करून राहणार, छोटे छोटे कळप! चेहरा सदा गंभीर. बोलले तर भाषण देताहेत असं वाटणार पण या वर्णनात बिलकूल फिट न बसणारा माणुस म्हणजे भाऊ. भास्कर भाऊ बोरावके. खादीचे, स्वच्छ धुतलेले, पांढरे शुभ्र कपडे, म्हणजे विजार अन् सदरा तेही नीट नीट इस्त्री केलेले. केस नीटनेटके, भांग काढलेला, चेहऱ्यावर ओळखीची दाद आणि पांढरे शुभ्र दात दाखवणारे हास्य! समोरचा माणूस अगदी अनोळखी असला तरी भाऊंशी बोलताना त्याला काही अवघडल्यासारखं वाटायचं नाही. भाऊंचं मोठेपण त्यांच्या बोलण्यात ते जाणवू देत नसायचे. नंतर केव्हा तरी समोरच्या माणसाला आपण कुणाशी बोलत होतो हे कळत तेव्हा तोही उद्‌गारायचा, ''म्हणजे ते प्रसिद्ध भास्करराव बोरावके हेच तर!'' घोडा घोडा म्हणतात तो हाच! समोरच्या माणसाशी भाऊ ओळखीच्या गप्पा मारणार. गप्पा म्हणजे शुद्ध गप्पा, भाषणबाजी नाही. असे असमाजवादी भाऊ समाजवादी राहिले कसे हे मला पडलेलं पहिलं कोडं आणि या मेळाव्यातून बाहेर पडून शेतकरी संघटनेत आले कसे हे दुसरं कोडं. या दोनही कोड्याचं नाव भाऊ, भास्कर भाऊ बोरावके!

शेतकरी संघटनेचे अनेक अध्यक्ष झाले; पण नेमके अध्यक्ष होते तेव्हा आणि नव्हते तेव्हाही सामान्य कार्यकर्त्यांना भाऊ नेहमी जवळचे वाटायचे. भाऊंच्या वागण्यातही कधी हा नेता, तो कुणी मोठा कार्यकर्ता, हा तर सामान्य कार्यकर्ता अशी वर्गवारी नव्हती. सर्वसामान्य कार्यकर्तेसुद्धा भाऊंशी अगदी सहजतेने बोलत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातली शालीनत: वागण्यातला, राहण्यातला साधेपणा, हा माझ्यासाठी एक उत्सुकतेचा विषय राहिला आहे.

भाऊ शाळेत असताना त्यांचा संबंध सेवादलाशी आला. एव्हाना भाऊंचं घर पंचक्रोशीत लौकिक कमावून प्रसिद्धीस आलेलं. त्यांच्याकडे अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन यांसारख्या लोकांचं येण जाणं सुरू झालेलं. त्या काळी ही पटवर्धन मंडळी नावाजलेली. त्यांच्या संपर्कात आल्यामुळे भाऊ सेवादलात जायला लागले. शाळकरी वयात, या लोकांच्या संपर्कात आल्यामुळे कळत न कळत त्यांच्यावर काही संस्कार होत गेले. या महनीय माणसाचे आदर्श समोर होते. स्वातंत्र्यपूर्व काळात अच्यूतराव पटवर्धन म्हणजे खऱ्या अर्थाने तरूणांच्या दिलाची धडकन. त्या काळात दूर निझामी राजवटीत माणसांना, विशेष करून आम्हा पोरा सोरांना अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, सुभाष बाबू, कॅप्टन लक्ष्मी, वीर सावरकर या नावांबद्दल विशेष आकर्षण होतं. ''त्या वयात या लोकांना एवढं जवळून पाहण्याचं भाग्य मला लाभलं.'' या शब्दांत भाऊ त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायचे. वयाच्या पंधराव्या, सोळाव्या वर्षी भाऊंनी काँग्रेसच्या सेवादलात प्रवेश केला. त्यानिमित्ताने ते साने गुरूजी. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, बॅरिस्टर नाथ पै अशा लोकांच्या संपर्कात आले. साहजिकच या लोकांचा एक जबरदस्त प्रभाव भाऊंच्या मनावर पडलेला. ही सारी मंडळी स्वातंत्र्याच्या लढ्यात अग्रणी राहिलेली; पण स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेच्या राजकारणापासून दूर, काही विशिष्ट तत्त्वांना चिकटून राहिलेली, हाही गुणविशेष भाऊत उतरलेला. सत्तेच्या परिघात इतकं जवळ जाऊनही भाऊंना राजकीय पक्षाचं आकर्षण वाटलं नाही. मला नेमकी या प्रश्नाची उत्सुकता होती. ''मग तुम्ही सत्तेच्या राजकारणाकडे आकृष्ट झाला नाहीत, हे कसे ? तुम्हाला कुणी आपल्या रिंगणात ओढण्याचे प्रयत्न केले नसतील यावर विश्वास बसत नाही.'' यावर भाऊ हसले. एवढंच म्हणाले होते, ''तसे प्रयत्न झाले; पण मला त्याचं आकर्षण वाटलं नाही.'' आणि वाटणार तरी कसं, पूर्वायुष्यातला बराच काळ थोरामोठ्यांच्या सहवासात घालवल्यावर खुज्या माणसाचं आकर्षण राहणारी तरी कसं? 'उम्र तमाम बिताई बुत परस्ती मे, अब आखरी वक्त क्या खाक मुसलमां होंगे।'

भारताला स्वातंत्र्य तर मिळालं. एक टप्पा पूर्ण झाला. या टप्प्यात किशोर वयातील स्वयंसेवक म्हणून भाऊंनी कामगिरी बजावली. नाही तरी ते किशोरवय. त्या वयात स्वातंत्र्य समरात भाग घ्यावा ही अपेक्षा नव्हती. पुढे जेव्हा आणि जी गरज पडली ती भाऊंनी पार पाडली. पुढच्या टप्प्यात भाऊंनी संघटनेच्या

झेंड्याखाली जो लढा दिला तो काही कमी महत्त्वाचा नव्हता. त्या टप्प्याला नाही तरी शेतकरी संघटना 'स्वातंत्र्याची दुसरी लढाई' असं संबोधतेच ना. या टप्प्यात राजकारणविरहित जे करता येईल ते सारं भाऊंनी केलंच. कुठल्याही पक्षाशी बांधिलकी न ठेवता ते व्यक्तित्ववादी राहिले. भाऊ समाजवादी होते असा एक सार्वत्रिक समज. ''सेवादलाच्या विश्वस्तापैकी मी एक; पण माझी बांधिलकी समाजवादी पक्षाशी नव्हती. मी समाजवादी पक्षापासून तितकाच जवळ, जितका काँग्रेसच्या. दोनही पक्षांतल्या अनेक कार्यकर्त्यांशी माझी वैयक्तिक मैत्री आहे. मी सेवादलाच्या विश्वस्तांपैकी एक, तसा शिरडीच्या साईबाबा संस्थानच्या विश्वस्तापैकीही एक. अनेक सामाजिक संस्थांशी माझा संबंध आजही आहे तरीही लोक मला समाजवादी म्हणतात याला माझा नाइलाज आहे,'' असे ते सांगायचे तरी मला नेहमी प्रश्न पडायचा, वागण्याबोलण्यात भाऊ इतके असमाजवादी कसे? उलगडा त्या वेळी झाला. एक कोडं या उत्तरानं सुटलं. शेतकरी संघटना मुक्त अर्थव्यवस्थेची पुरस्कर्ती. कमीत कमी प्रशासन आणि मुक्तव्यापार ही तिची आग्रही मागणी. 'सूट-सबसिडीचे नाही काम, हवे घामाचे दाम' ही तर फार पूर्वीपासूनची तिची घोषणा आणि समाजवाद्यांची धोरणं नेमकी या साऱ्या विरूद्ध! मला नेहमी वाटायचं. ही दोनही टोकं भाऊ धरून ठेवतात तरी कशी! वाघ आणि शेळी एकाच टोपल्यात मेळवण खाणार तरी कसे? पण भाऊंनी हा खुलासा केला आणि त्याच्यावर लोकांनी जबरी टाकलेली समाजवादी झूल झटकून टाकली. तरी साहेब भाऊंचा 'माजी' समाजवादी रंगावरून थट्टा करत. भाऊ हे सारं थट्टेवारी नेत. समाजवाद्याचा उल्लेख करताना साहेब भाऊंना थट्टेत म्हणायचे, ''भाऊ, तुमच्या त्या अमक्यातमक्याचं स्टेटमेंट वाचल कां?'' भाऊ यातील 'तुमच्या' ला विसरून बोलायचे. 'वन्स ए डावा' नेहमीच डावा हे निदान भाऊंच्या बाबतीत खरं नाही हे माहित असूनही साहेब भाऊंची अशी थट्टा करायचेच.

तसं खऱ्या अर्थानं भाऊ क्रियाशील आंदोलनात सहभागी झाले ते शेतकरी संटघनेच्या माध्यमातून. त्याआधी त्यांनी शेतीचे भलेबुरे अनुभव घेतले होते; पण चटके काही बसले नाहीत. शेतीचा विस्तार खूप मोठा आणि शेती पाण्याखालील, उसाचा आणि फळबागांचा मोठा आधार. त्यामुळे एकीकडे ओहोटी तर तर दुसरीकडं भरती हा प्रकार चालायचाच. तेव्हा आर्थिक संतुलन फारस बिघडत नसे; पण शेतीच्या अर्थकारणाकडे त्यांचं लक्ष होतं जरूर. १९७८-८० च्या सुमारास शरद जोशीचं आगमन कृषीक्षेत्रात झालं. त्यांनी 'वारकरी' या नावानं नियतकालिक सुरू केलं. या 'वारकरी' चे भाऊ नियमित वाचक. त्यातील शरद जोशींचा लेख भाऊ आवर्जून वाचीत. त्याच सुमारास इतर नियतकालिकांतूनही साहेबांचे लेख येत. तेही भाऊ आवर्जून वाचित. या लेखांचा एक निश्चित परिणाम भाऊंवर होत गेला. तोपावेतो सर्व आंदोलनांपासून काहीसे दूर राहिलेले भाऊ कळत न कळत साहेबांच्या लेखामुळे शेतकरी आंदोलनाकडे हळूहळू ओढले गेले. शेतीतले भलेबुरे अनुभव घेतलेल्या भाऊंना दुखण्यावर नक्की बोट ठेवता येत नव्हते; पण काही तरी चुकते आहे ही जाणीव होत होती. शेतीचा एवढा पसारा असूनही म्हणावं तशी प्राप्ती नाही आणि नेहमी उद्याची चिंता असायची. मोठ्यांच्या चिंताही मोठ्या. नुकसान झालं म्हणजे लाखांनी व्हायचं. जमाखर्चाची मिळवणी व्हायची; पण नुकसानीचा बॅकलॉग राहायचाच. हे असं का होतं? हा प्रश्न त्यांना नेहमी पडायचा. साहेबांचे लेख वाचले. डोक्यात लख्ख प्रकाश पडायला अगदी काही वडाच्या सावलीतच बसायला नको. 'वारकरी' किंवा इतरत्र येणाऱ्या साहेबांच्या लेखांच्या सावलीत बसूनही असा प्रकाश पडतोच की.

आणखी शेतकरी संघटनेची रीतसर स्थापना व्हायची राहिली होती. त्यामुळे भाऊ साहेबांना नावानेच ओळखून होते. याच सुमारास शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन पुकारण्यात आलं. हे आंदोलनमात्र भाऊंसाठी वळण देणारं ठरलं. इथून भाऊ शेतकरी आंदोलनात उतरले ते कायमचे. आजवर संघटनेने अनेक चढउतार पाहिले. अनेक लोक आले आणि संघटना पटलावरून अस्तंगातही झाले; पण भाऊ मात्र ध्रुवताऱ्याप्रमाणे संघटनेत अढळ राहिले.

शेतकरी संघटनेनं हे आंदोलन पुकारलं ज्यात भाऊही पहिल्यांदाच सहभागी झाले. त्यांनी कोपरगावी या आंदोलनात सहभाग दिला. त्यांच्या या सहभागाचा विलक्षण चांगला परिणाम झाला. भाऊंसारखा एवढा मोठा माणूस या आंदोलनात सहभागी होतो आहे हे पाहून या भागातील अनेक प्रतिष्ठत नागरिक, डॉक्टर, वकील आणि फार मोठ्या प्रमाणावर शेतकरी सहभागी झाले. जवळजवळ सात हजार लोकांनी अटक दिली. भाऊंची रवानगी इसापूरच्या तुरुंगात झाली आठ दिवसासाठी. त्यांच्यासोबत बावीस वकील लोकही इसापूरला अटकेत होते. कोपरगावच्या या साऱ्या आंदोलकांनी नेता म्हणून भाऊंची एकमताने निवड केली. तुरूंगात एवढ्या मोठ्या प्रमाणावर इतक्या लोकांना एकत्र ठेवलं याचा एक चांगला परिणाम झाला. दिवसभर एकमेकांशी विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली आणि भाऊनांच नव्हे तर इतरही सत्याग्रहींना आपापले विचार घासूनपुसून घेता आले. परिणामी संघटनेचा विचार फैलावण्याचं काम आपोआपच साधलं गेलं.

यावेळी तुरुंगात भरती केलेल्यांमध्ये स्वत: शरद जोशी यांचाही समावेश होता. या तुरुंगातच भाऊंची आणि साहेबांची ओळख-भेट झाली. यावेळी झालेल्या भेटीचं मैत्रीत अन् मैत्रीचं दाट मैत्रीत रूपांतर झालं आणि आयुष्यीर टिकलं. साहेबांसाठी भाऊ म्हणजे मित्र, सल्लागार आणि कुटुंबीयसुद्धा हे नातं इतकं जवळचं झालेलं की साहेबांच्या मुलीचा साखरपुडा झाला तेव्हा विधी केला भाऊ आणि माईंनी. साहेबांपेक्षा भाऊ वयाने पाचेक वर्षांनी मोठे

म्हणून साहेब भाऊंना मोठा भाऊ मानायचे. दोघांच्या संबंधात एवढी जवळीक, की प्रसंगी साहेब भाऊंची थट्टाही करायचे, त्यांचा 'इंग्रजीत पायही ओढायचे'. शेवटपर्यंत हे नातेसंबंध निष्कलंक राहिले.

तुरुंगात साहेबांना भेटण्यासाठी त्यांच्या पत्नी लीलाताई वारंवार येत राहिल्या. त्यांची आणि भाऊंची ओळख, भेट याच तुरुंगात झाली. पुढे चालून साहेबांच्या एकूणच कुटुंबाशी घरगुती संबंध जुळून आले. त्याची सुरूवात ही अशी तुरुंगात झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात तुरुंगात घडलेल्या मोठमोठ्या माणसांच्या कथा आम्ही ऐकल्यात; पण स्वातंत्र्याच्या या दुसऱ्या लढ्यानं ही माणसं घडवण्याचं महत्त्वपूर्ण काम केलेलं आहे. तुरुंग ही मोठी माणसं घडवण्याची शाळा आहे हेच खरं. कालही आणि आजही.

या वेळेपासून साहेबांच्या मागे अटकेचं जे सत्र सुरू झालं ते कित्येक महिने चालू राहिलं. तेव्हाचे काँग्रेस सरकार शरद जोशी यांच्यामागे बेड्या घेऊन लागलेलं. एका खटल्यात अटक करायची, न्यायालयीन कस्टडी घ्यायची. त्याची मुदत संपण्याच्या आत दुसऱ्या खटल्यात न्यायालयीन कस्टडी, मग तिसऱ्या, चौथ्या.... त्याला अंतच नव्हता. पोलिसच्या लोकांनी एकदा सूड घ्यायचा ठरवलं तर ते कुठल्या टोकाला जाऊ शकतात याचा धडाच या वेळी त्यांनी घालून दिला. 'क्या खूब निभाई दुष्मनी अंतुलेने' की महाराष्ट्रातील न्यायालयेही कस्टडी घेण्यासाठी अपुरी पडली!

आठ दिवसांच्या तुरुंगवासातून भाऊंची सुटका तर झाली. भाऊ तर सुटले; पण साहेब तुरुंगाच्या दलदलीत फसलेले, त्यांना बाहेर कसे काढायचं? रमण शिसोदे या नावाचे एक व्यापारी भाऊंचे मित्र व संघटनेचे चाहते होते. त्यांच्या घरी लीलाताई व भाऊंची बैठक झाली. या तिघांनी ख्यातकीतं वकील श्री. राम जेठमलानी यांची भेट घेण्याचा निर्णय घेतला. आतापर्यंत ज्या अनेक ठिकाणी अंतुलेंनी साहेबांवर खटले दाखल केले होते. त्या त्या ठिकाणी जाऊन जमानतीची व्यवस्था करणे हेच एकमेव काम भाऊ व लीलाताईंना त्यावेळी राहिलेले होते. या कामी त्यांना गावोगावी भटकावं लागलं. तुरुंग साहेबांनी भोगला; पण शिक्षा मात्र भाऊ व लीलाताईंनी! त्या सर्व खटपटीत बबन शेलार हेही या दोघांबरोबर होते. भाऊंची गाडी आणि गाडीत हे त्रिकूट गावोगावी जाणार हा दिनक्रम ठरलेला. खटल्याच्या प्रत्येक गावी जायचं. तिथल्या वकील संघाला भेट द्यायची, वकील संघातील सदस्यांना सर्व आंदोलनाची कल्पना देऊन त्यांच्या साहाय्याने जमानतीची व्यवस्था करायची. जमानत करायची ती एकट्या साहेबांची नाही. त्यांच्यासोबत माधव खंडेराव मोरे अन् प्रल्हाद पाटील कऱ्हाड हेही होतेच. दु:खात सुख एवढंच की साहेबांना या वनवासातही चांगली कंपनी होती. जळगावच्या कोर्टात त्रिकुटाला हजर केलं तेव्हा तर न्यायालयाच्या आवारात प्रचंड गर्दी जमा झालेली होती. याची दखल पोलिसांनी न घेण्याचच ठरवलं. संघटनेला मिळणारा प्रचंड पाठिंबा पायदळी तुडवूनल या त्रिकुटाचे हाल हाल करण्याचे एकेक उपाय पोलिस शोधून काढीत होते. रिमांडसाठी कोर्टात हजर करतांना तुरुंगातून दूर गावी नेण्यासाठी अत्यंत खराब व्हॅन निवडली जाई, ज्यामुळे नेण्याआणण्यात कैद्यांची हाडे खिळखिळी व्हावीत. शेवटी एका न्यायालयात माधवराव मोऱ्यांनी न्यायाधीशाकडे ही तक्रार मांडली, तेव्हा न्यायाधीशांनी पोलिसांना चांगलच झापलं! परिणामी प्रकाशाची ही 'आदळ' थांबली.

साहेबांविरूद्ध शेवटचा खटला! (शेवटचा म्हणजे त्या मलिकेतला शेवटचा, कारण त्याहीनंतर परवापर्यंत साहेबांविरूद्ध खटले दाखल होत गेलेले आहेतच. गिनीज बुक वाल्यांनी सर्वाधिक खटल्यांचा जागतिक विक्रम केल्याबद्दल साहेबांच्या नावाची नोंद घ्यायला काही हरकत नसावी!) हां, तर शेवटचा खटला नेवासा इथे दाखल केला. यादरम्यान लीलाताई आणि भाऊ यानी राम जेठमलानी यांच्याशी सल्लामसलत करून मुंबईच्या उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि या तिघांची खटल्याच्या कटकटीतून, तर लीलाताई, भाऊ आणि बबन या तिघांची जमानतीची सोय करण्याच्या व गावोगावी चक्कर मारण्याच्या कटकटीतून मुक्तता केली. मुक्तता यासाठी, की तुरुंगाबाहेर राहूनही या तिघांना वेगळ्या अर्थाने तुरुंगवास भोगावा लागतच होता. ती मराठी म्हण आहे न, 'घोडं मेलं ओझ्यानं अन् शिंगरू....'

या तुरुंग प्रकरणातून साहेबांचे आणि भाऊंचे संबंध अधिकच घट्ट झाले. साहेब तेव्हा पुण्यातल्या सिंध कॉलनीत राहत होते. भाऊंचं तिथे नेहमी जाणंयेणं होतं. भाऊंच स्वत:चं घरही पुण्यात जंगली महाराज रोडवर होतंच; पण अनेक भाडेकरूंच्या ताब्यात! भाऊंना सिनेमा नाटकाचा शौक, वेळ मिळेल तेव्हा भाऊ तिकिटांचं आरक्षण करून साहेब व लीलाताई यांना घेऊन जात. या दोघांनाही तशी नाटक, सिनेमाची आवड होतीच. संघटनेच्या बांधणीचा तो काळ, तेव्हा कलात्मक हौसेला वेळ मिळत असे.

राजकारणात रमलेले लोक रुक्षच असतात असं काही नाही. होतं काय की कलोपासनेसाठी द्यायला पुरेसा वेळ त्यांच्याकडे नसतो. भाऊ तसे रसिक, जमेल तेव्हा नाटक पहायचे. त्यांच्या रसिकतेचं उत्तम उदाहरण म्हणजे त्याचं राहतं घर. कोपरगावजवळील येसगाव वस्तीवरील त्याचं घर बघण्यासारखं आहे. मोटारसायकल रॅलीच्या शेवटी आम्ही मुक्कामाला भाऊंच्या घरी येसगाव वस्तीवर गेलो होतो. घरापुढे छोटंसं अंगण. वाडाच्या कुंपणानं वेढलेल. त्यात गोलाकार लॉन, मऊमऊ गवत असलेलं. फाटकासमोर गाडीचं एक चाक रंगवून उभं ठेवलेलं. घर म्हणजे इंग्रजकालीन विश्रामगृहाची प्रतिकृती मी त्याबद्दल भाऊंना विचारलं, ''येसगाव वस्तीवर राहायचा विचार डोक्यात होताच. त्या सुमारास इंग्रजकालीन एक विश्रामगृह होतं. ते दूर कुठे तरी. ते मी शासनाकडून विकत घेतल आणि जसंच्या तसं एकेक दगड, एकेक लाकडी बीम नंबर टाकून उतरून घेतला आणि ते डिझाईन

जशाचं तसं कायम ठेवून सारा माल वस्तीवर आणला. एकेक करून याप्रमाणे दगड, बीम रचले.'' आज ते घर उन्हाळ्यात थंड अन् हिवाळ्यात गरम असतं. नैसर्गिकरीत्या एयरकुल्ड!

त्याकाळात 'शेतकरी संघटक' चं मोठ भावंड 'वारकरी'ची चलती होती. शेतकरी संघटनेच्या विचाराला वाहिलेल्या या नियतकालिकाचं कार्यालय साहेबांच्या या सिंध कॉलनीतल्या बंगल्यातच होतं. साहेब एकहाती लिखाण करायचे. भाऊ अधूनमधून मदतीला असायचे. फक्त 'पोस्टमन' असा पुकारा करीत अंकांच घरोघरी वाटप करायचं काम साहेबांना नाही करावं लागलं हे भाग्यच! 'वारकरी' नियतकालिक चालवण्याची हौस सोडता दुसरं काही चालवण्याचा साहेबांना शौक असेल तर तो त्यांच्याकडील 'बुलेट' मोटारसायकल चालवण्याचा आधीच बुलेट ही गाडी दणकटपणासाठी आणि त्याहीपेक्षा वेगासाठी प्रसिद्ध या काळी ही बुलेट गाडी घ्यायची अन् आंबेठाणला भन्नाट वेगानं जायचं हा साहेबांना कैफ! त्यांच्याबरोबर जायचा प्रसंग आला तर भाऊ आवर्जून सांगायचे, ''साहेब, जरा हळू'' ''भाऊ, तुम्ही सायकलवर बसा. मोटरसायकलवर नाही. बुलेटवर बसायचं ते वेगासाठी!'' भाऊ सांगतात. ''मी साहेबांबरोबर असलो म्हणजे डोळे बंद करून देवाचं नामस्मरण करीत मागे बसायचो. मुक्कामावर पोचलो की मी म्हणायचो,'' ''मै कौन हूँ? मैं कहां हूं? धरतीपर या स्वर्ग में?'' यावर साहेब म्हणायचे, ''भाऊ, उघडा डोळे आता. आपण मुक्कामावर सुखरूप पोचलोत, वन पीस!'' यातला थट्टेचा भाग जाऊ देत, पण साहेबांना वेगाचा भलता शौक ''सुरवातीच्या काळात आंबेठाण चाकणच्या परिसरात साहेब प्रसिद्ध होते ते त्यांची बुलेट, वेगाची हौस आणि सुटाबुटासाठी'' बाबूलाल परदेशी एकदा बोलताना म्हणाले होते, ''सुटाबुटातले साहेब आमच्याबरोबर खेड्यापाड्यातून सायकलवर फिरायचे तेव्हा खेडूतांना तोसुद्धा आकर्षणाचा विषय होता.'' बाबूलालनं साहेबांची सांगितलेली ही आठवण.

लीलाताईंची आठवण सांगतांना भाऊ नेहमी भावुक व्हायचे. नेहमीच्या जाण्यायेण्याने साहेबांशी एक कौटुंबिक जिव्हाळा झालेला होता. साहेबांशी आणि लीलाताईंशी केवळ मैत्रीच्याच नव्हे तर वडिलकीच्या नात्यानंही बोलण्याचा अधिकार एकट्या भाऊंनाच होता. भाऊंच्या शांत, निरलस स्वभावामुळे आपोआपच त्यांच्याकडे वडीलकीचा मान आलेला असायचा. ही वडिलकी भाऊंनी टिकवून ठेवली होती हा एक विशेष!

लीलाताईंची ऐन उमेदीची वर्ष परदेशात गेलेली. तिथले व्यवसाय, त्यांतील प्रामाणिकपणा, लोकांची राहणी, त्यांचं जीवनमान या साऱ्यांचा एक पगडा त्यांच्या मनावर असणारच. त्यांनी आंबेठाणला कुक्कुटपालनाचा प्रयोग करून पाहिला. त्यासाठी बँकेचं भलमोठं कर्ज काढलं. हा व्यवसाय आदर्श पातळीवर चालवावा असा त्यांचा अट्टाहास. ताईंनी आणखी भारतीय व्यवस्थेचा बडगा पाहिलेला नव्हता. या खाचाखळगे त्यांना माहित नव्हते. व्यवसायातील लांड्यालबाड्यांपासून तर त्या कोसो दूर होत्या. त्यांना हे कुठे माहित होतं की कुक्कुटपालनाचा व्यवसाय करायचा असतो तो त्यातील मिळणाऱ्या सबसिडीसाठी. सर्व आकडे फुगवून सांगायचे. हजार कोंबड्या कागदावर दाखवून प्रत्यक्षात शंभरच घ्यायच्या. जमाखर्चात आकड्यांची जादूगिरी करायची अन् एक दिवस व्यवसायाची गुंडाळपट्टी करून काखा बगला वर करायच्या. जमेल तेवढं कर्ज माफ करून घ्यायचं. नवीन प्रस्ताव बँकेसमोर ठेवायचा. नवीन विटी नवीन राज्य.परत दुसऱ्या धंद्यात सबसिडी मिळवायची. ताईंना पहिल्याच फटक्यात या कोंबड्यांनी कु कूऽच कूऽ करायला लावलं. या व्यवसायात त्या फसत गेल्या, त्या वरच नाही आल्या, कसंतरी करून वाढलेल्या कर्जाची बुजवाबुजव करून या झमेल्यातून त्या मुक्त तर झाल्या; पण या अनुभवानं त्यांच्या मनावर एक खोल जखम झाली. याही काळात ताईंना भाऊंचा मानसिक आधार होताच. पण या धक्क्यानं त्यांच मानसिक संतुलन बिघडलं, ते शेवटपर्यंत त्यांना त्रासच देत राहिलं. त्यांचा शेवटही या असंतुलनात झाला. याही वेळी साहेबांना खंबीर आधार दिला तो भाऊंनीच. लीलाताईंच्या मृत्यूची बातमी साहेबांना विलक्षण धक्का देऊन गेली. साहेब धाय मोकलून रडले ते भाऊंच्या खांद्यावर मान ठेवूनच. मोठ्या माणसांची दु:खं तशी मोठीच. दु:ख पचवायचं तेही एकट्यानं, अपयश पचवायचं तेही एकट्यानंच, चेहरा हसरा ठेवत!

शेतकरी संघटनेच्या सर्व सभा, मेळावे, अधिवेशन आणि आंदोलनात भाऊ हजर राहिले यात विशेष काहीच नाही. तसे हजारो कार्यकर्ते आहेत. भाऊ काही काळ शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राहिले यातही काही विशेष नाही. हे पद भूषवणारेही अनेक आहेत. काही राहिले. काही परपक्षवासी झाले. त्यांचं वैशिष्ट्य हे, की अध्यक्षपदावर राहूनही ते सामान्य कार्यकर्ते म्हणूनच वावरले. सामान्य कार्यकर्त्यांत समन्वयक म्हणूनच त्यांनी काम केलं. अध्यक्ष म्हणून त्यांचा महाराष्ट्रभर दौरा अपेक्षित होता आणि तो त्यांनी केलाही; पण अध्यक्ष नसतानाही महाराष्ट्रभर फिरत राहिले, हे विशेष. १९८६ च्या प्रभावशाली कापूस आंदोलनात ते शेतकरी संघटनेचे अध्यक्ष होते. या काळात भाऊंच्या पायाला अक्षरश: भिंगरी बांधलेली होती. महाराष्ट्रात ठिकठिकाणी कार्यकर्त्यांना तुरुंगातून हजारोंच्या संख्येने डांबून ठेवलेलं. सुरेगावच्या गोळीबारात तर तिघांचा बळी पडलेला. त्या परिसरात विलक्षण दहशत पसरलेली. या तप्त वातावरणात डोकं विलक्षण शांत ठेवायचं अन् कार्यकर्त्यांच सांत्वन करायचं. त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरवायचा. ठिकठिकाणच्या तुरुंगांना भेटी देऊन सत्याग्रहींना, त्यांच्या निकटवर्तीयांना दिलासा द्यायचा हे अवघड काम चेहऱ्यावरची स्मितरेषा ढळू न देता भाऊंनी पार पाडलं. भाऊंचं मोठेपण आहे, ते त्यांच्या या कसबात.

सामान्य कार्यकर्त्यांना तर भाऊ म्हणजे आपली गाऱ्हाणी

ऐकवण्याचं हक्काचं ठिकाण वाटायचं. अध्यक्षपदी ते होते तेव्हाही आणि नव्हते तेव्हाही. परभणीच्या त्यांच्या दौऱ्याप्रसंगी मला स्वत:ला एक प्रसंग अनुभवायला मिळाला. माझ्याविरूद्ध काही कार्यकर्त्यांनी भाऊंकडे प्रत्यक्ष भेटीत, फोनवर, पत्राद्वारे तक्रारी केल्या होत्या. माझी कामाची पद्धत त्यांना आवडली नसेल किंवा वैयक्तिक रागलोभापायी असेल, कारण काहीही असो पण लोकांनी तक्रारी तर केलेल्या होत्या. भाऊंनी त्यांच्या पद्धतीने मला थांगपत्ता न लागू देता त्या तक्रारीची चौकशी केली. त्यांचा स्वत:चाही याबाबत काही अनुभव होताच. पुढे परभणीच्या दौऱ्यात त्याच कार्यकर्त्यांनी भाऊंची भेट घेऊन तक्रार केली, तेव्हा माझ्यासमोर भाऊंनी त्यांना चांगलाच झापलं. भाऊंचच झापणं ते. ''तुम्ही नेहमी तक्रारी करता, तुमच्या साऱ्या तक्रारी खोट्या आहेत. तुम्ही ढीगभर तक्रारी करूनसुद्धा वकील साहेबांनी तुमच्या विरूद्ध एक पण तक्रार केली नाही हे कसं? संघटनेत अशा कुजकट तक्रारींना अजिबात स्थान नाही. जमल्यास संघटनेत रहा, नाही तर बाहेरचे दरवाजे खुले आहेत.'' भाऊंना एवढ्या चढ्या आवाजात बोलताना मी ऐकलं, ते पहिलं आणि शेवटचं. त्यांच्या आणि माझ्या भेटी आधी आणि नंतरही होत राहिल्या. पण माझ्या वाट्याला त्यांचं स्मितहास्यच येत राहिलं. माझ्याकडे भाऊ अनेक वेळा आले; पण या भेटीत त्यांनी कधीही कुणाविरूद्धही तक्रारी केल्या नाहीत किंवा गाऱ्हाणीही.

भाऊ थोडं लांबच्या प्रवासाला निघाले म्हणजे एक छोटी व्हीआयपी बॅग आणि खांद्याला एक शबनम त्यांच्या अघोषित समाजवादीपणाची एक जुनी आठवण हे ठरलेलं. मुक्काम छोटा असला तर फक्त बॅगच, शबनमला सुटी. त्यांच्या स्वभावातच एक हिशेबीपणा आणि शिस्त. प्रवासाला बाहेर पडतील तेव्हा रोज लागणाऱ्या साऱ्या वस्तु बरोबर घेऊनच. कुणाला पेस्ट माग, कुणाला साबण हा प्रकार नाही. डोक्याला लावायचं तेल, कंगवासुद्धा सोबतच. स्नान झालं, की स्वच्छ कपडे घालून कार्यक्रमासाठी तयार होऊन बसणार. रेल्वे, बसचं आरक्षण करायचं काम पडलं असेल तर आल्या आल्या भाऊ पैशाचा चुकारा करणार. समोरचा माणूस पैसेवाला असो की नसो, सुरेगावला झालेल्या हुतात्मादिनासाठी भाऊ आवर्जुन डिग्रस कऱ्हाळे (हिंगोली जिल्हा) या गावी हजर झाले होते. खूप मोठ्या प्रमाणावरील उपस्थितीत कार्यक्रम पार पडला आणि भाऊ परत जायला निघाले तेव्हा ब.ल. तामसकरांनी येण्याजाण्याचा खर्च म्हणून भाऊंना पाचशेची नोट देऊ केली. तेव्हा भाऊ बलंवर भडकले. भाऊंनी पैशाकडे पाहून कधी काम केलेलं नाही. तसं असतं तर भाऊ कधीच पक्षवासी झाले असते; पण बलं ऐकेनात अन् भाऊही. शेवटी डॉ. पातूरकर अन् गुणवंत पाटील मला म्हणाले, तुम्हीच बलंची समजूत घाला. बलंच्या जागी दुसरा कुणी असता तर पैसे देऊन माझा अपमान करता काय असं म्हणून भाऊ विलक्षण भडकले असते. पण बल पुढे प्रत्यक्ष देवानही हात टेकले असते तिथे भाऊंच काय! त्यामुळे भाऊ फार रागावले नाहीत. यावर मी तोडगा काढला, ''बल ही रक्कम भाऊंकडून आजच्या कार्यक्रमाला देणगी म्हणून स्वीकार'' झालं. तो सन्माननीय तोडगा बलंनी विजयी मुद्रेने मान्य केला आणि हा गोड तिढा एकदाचा सुटला. भाऊंनी अध्यक्षपदातले दौरे संघटनेच्या पैशावर नाही तर पदरमोड करून केले. नाही तरी साहेब म्हणायचेच, ''काम करील तो कार्यकर्ता अन् पदरमोड करील तो संघटनेचा कोषाध्यक्ष!''

ऐंशी मधल्या संघटनेच्या आंदोलनानंतर तेव्हाचे मुख्यमंत्री श्री. अ. र. अंतुले यांनी दिल्लीला वाटाघाटीसाठी शासनाच्या वतीने स्वत: मुख्यमंत्री अंतुले, अर्थमंत्री रामराव आदिक आणि मजूरमंत्री नरेंद्र तिडके हे होते. संघटनेच्या वतीने स्वत: साहेब, माधव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील, रामचंद्र बापू पाटील आणि भास्करभाऊ बोरावके यांचे प्रतिनिधी मंडळ होते. वाटाघाटीत काही प्रमाणावर मागण्या मान्य करण्यास अंतुले तयार झाले होते; पण शेतकरी पुत्र रामराव आदिकांनी कोलदांडा घातला.

नरेंद्र तिडकेंनी, ''यांच्या मागण्या मान्य केल्या तर हेसुद्धा कामगारांप्रमाणे उलटतील.'' असं म्हणून विरोध केला. शेतकरीपुत्रांच्या या जहरी विरोधाने माधव खंडेराव मोरे यांनी संतापाच्या भरात जी भाषा वापरली ती इथे लिहिणे कठिण. त्याचा उल्लेख बापूंच्या परिचयात आलेला आहे. यावेळी मोरे यांनी संतप्त होऊन धमकी दिली. ''तुम्ही या वाटाघाटी फिसकटवल्या तर महाराष्ट्रातले शेतकरी तुमचं अख्खं मंत्रीमंडळ जाळून टाकतील!'' हा प्रसंग सांगतांना भाऊ गंभीर व्हायचे. हाच प्रसंग बापू सांगतात ते रामरावांच्या चेहऱ्यावरील भीतीचे भाव आठवून हसून आणि भाऊ सांगायचे ते माधव खंडेराव मोरे यांच्या डोळ्यातील अंगार पाहून.

पन्नासावर वर्षे भाऊंची साथ करणाऱ्या माई काही वर्षापूर्वी गेल्या तेव्हापासून भाऊ फारच गंभीर झाले होते. त्यांचा एकाकीपणा खूपच वाढला होता. पुरूषविना बाईचं भागू शकतं, पण बाईविना पुरुष फारच एकाकी वाटतो. एकटं असलं, की भाऊ माईंची आठवण काढत आढ्याकडे नजर लावून बसायचे. अशा या भाऊंना विनम्र श्रद्धांजली.

♦ ♦ ♦

## शून्यातून विश्व

**लता मंगेशकर –**

वडील वारल्यावर त्यांनी वयाच्या बाराव्या वर्षी कोल्हापूरला स्टुडिओत नोकरी केली.कष्टात दिवस काढले.घर सांभाळले.विविध भाषेत पन्नास हजार गाणी म्हटली.भारतरत्न हा त्यांना सर्वोच्च किताब मिळाला.

# सचित्र वृत्तांत



● दि. १३/८/२०१७ रोजी निरखेडा ता. जालना येथे महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. गंगासागर जगदीश जाधव यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी आणखी काही पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. त्यामध्ये श्री सुधीर शिंदे यांची शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली.या प्रसंगी महिला आघाडी अध्यक्षा सौ. गीताताई खांडेभराड, डॉ. कदम, सुधीर शिंदे, रमेशराव खांडेभराड, श्रीरंग मोहिते, डोंगरे, माधव बापु जाधव आणि सौ कालिंदा कदम, लता भुतेकर व२०० महिला व १५० पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.



● **पुणे :** बुरुंजवाडी येथील मारुती स्टील फॅब्र या कंपनीच्या प्रदूषणामुळे खराब झालेल्या पिकाची नुकसान भरपाई मिळावी व प्रदूषण कायमचे बंद व्हावे, यासाठी शेतकरी व शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल घनवट यांच्या नेतृत्वात,सिमाताई नरोडे शे. सं. महिला आघाडी, अध्यक्ष प. महाराष्ट्र, अभिमन्यू शेलार,राजेंद्र धुमाळ, सरपंच दत्ता पिंगळे, विशाल धुमाळ व संघटनेचे सर्व कार्यकर्त्यांनी दि. २२ सप्टेंबर पासून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालया समोर उपोषण सुरू केले होते.तदनंतर प्रदूषण नियंत्रण मंडळ, कृषी अधिकारी यांनी शेतकरी धुमाळ यांना ५०,००० (पन्नास हजार) नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले, कंपनी मॅनेजमेंटने ३/१०/१७ नुकसान भरपाईची रक्कम सुपूर्द केली व भविष्यात अश्या प्रकारे प्रदूषण करणार नाही याची ग्वाही दिली.

● **प्रशिक्षकांचे सहप्रशिक्षण :** नाशिक येथे दिनांक १६ ते २० ऑगस्ट २०१७ ला पाच दिवसाचे प्रशिक्षकांचे सहप्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणार्थिंची नावे - गंगाधर मुटे, वर्धा, मधुसुदन हरणे, वर्धा, पांडुरंग भालशंकर, वर्धा, भुपेश मुडे, मुंबई, रमेश झाडे, मुंबई, कुशल मुडे, मुंबई, गिता खांडेभराड, जालना, नारायण बिराडे, जालना, सुधिर शिंदे, जालना, गंगाताई जाधव, जालना, गुणवंत पाटील, नांदेड, शंकर वर्णे, नांदेड, देविप्रसाद ढोबळे, हिंगोली, प्रल्हाद राखोंडे, हिंगोली, शेषराव कदम, हिंगोली, संग्राम आनपट, सातारा, अभिमन्यू शेलार, पुणे, सिमाताई नरोडे, पुणे, बापुराव आढाव, नगर, संदिप संधान, नासिक, नाना पाटील, जळगाव, बद्रिनाथ बुधवत, बुलढाना, पुरुषोत्तम पाटिल, धुळे, अनिल मालपाणी, वाशीम, गजानन देशमुख, परभणी, माणिकराव जाधव, परभणी, गणेश घांडगे, परभणी, अनिल चव्हाण, पुणे, दगडू शेळके, जळगाव



# वीज तोडणी: शेतकऱ्यांनी संघटित विरोध करावा

वीज वितरण कंपनीने सुरू केलेली वीजजोड तोडणी मोहीम ही पूर्णपणे बेकायदेशीर असून शेतकऱ्यांनी संघटित राहून वीज तोडणीला विरोध करावा असे आवाहन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल घनवट यांनी केले आहे.

तीन वर्षाच्या दुष्काळानंतर या वर्षी विहिरीत पाणी आहे व काही पीक येण्याची शक्यता असताना वीज वितरण कंपनीने, वीजबील वसुलीसाठी वीज पुरवठा खंडित करण्याची मोहीम बेकायदेशीर व अन्यायकारक आहे. वीज बिल भरण्यासाठी शेतकऱ्यांच्या हाती कोणत्याही पिकातून पैसा आलेला नाही. सर्वच पिके मातीमोल भावाने विकली जात आहेत. नैसर्गिक आपत्तीने झोडपलेली आहेत व उसाचे पैसे मिळण्यास किमान एक महिना अवधी आहे. अशा परिस्थितीत वीज पुरवठा खंडित केल्यास हाता तोंडाशी आलेले पीक वाया गेलेले पाहून शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यास आश्चर्य वाटू नये.

वीज पुरवठा खंडित करण्याअगोदर किमान १५ दिवस संबंधीत वीज ग्राहकाला नोटिस पाठवणे आवश्यक असते, तो नियम कधीही पाळला जात नाही. तसेच वीज उपकेंद्रातुनच वीज पुरवठा खंडित करणे हे कोणत्याच कायद्यात बसत नाही. वीज मंडळाची ही मोहीम बेकायदेशीर आहे.

तसेही शेतकरी वीज वितरण कंपनीचे देणे लागत नाही. वीज वितरण कंपनीला जे अनुदान मिळते (सुमारे १० हजार कोटी) त्या किमतीची वीजसुद्धा शेतीसाठी दिली जात नाही. कायद्याने ४४० वोल्ट दाबाने अखंडित वीज पुरवठा करणे बंधन कारक असताना केवळ २२५ ते २३० व्होल्ट दाबानेच वीज पुरवठा होतो व त्याची वसुली मात्र पूर्ण दाबाच्या विजेची केली जाते. उन्हाळ्यात पाण्याअभावी ५०% कृषी पंप बंदच असतात, त्याचे ही बिल आकारले जाते.

वीज कंपनी आपला भ्रष्ट व गलथान कारभाराचे पाप शेतकऱ्यांच्या माथी मारीत आहे. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात वीज चोरी होते तो तोटा शेतकऱ्याकडून वसूल केला जात आहे. उद्योगांकडून मिळणारी क्रॉस सबसिडी वाढविण्यासाठी शेती पंपांची बिले वाढवली गेली. ३ एचपीच्या पंपाला ५ एचपीचे बिल व ५ एचपीच्या पंपाला ७.५ एचपीचे बिल आकारून एकूण बील फुगवले गेले व त्यानुसार क्रॉस सबसिडी वाढवूनघेतली आहे. कुठलाही शासकीय लेखी आदेश नसताना ही वाढीव आकारणी केली आहे. सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

वीज कंपनी स्वत: कोणतीही जबाबदारी पाळत नाही. ट्रान्सफॉर्मर जळाल्यास ग्रामीण भागात ४८ तासात बसवून देणे बंधनकारक आहे. (वीज बिल थकबाकी असो वा नसो) हा नियम कधीच पाळला जात नाही. कर्मचाऱ्यांना पैसे देऊनही महिना दीड महिना रोहित्र सुरू होत नाही. अनेक ठिकाणी शेतकरी स्वत: रोहित्र खाजगीत भरून आणतात त्याचेही दुरुस्तीचा, वाहतुकीचा खर्च कर्मचारी लाटतात. शेतात उभे केलेल्या खांबांचे व तारांचे आयुष्य संपून अनेक वर्ष झाले पण बदलायचे नाव नाही. कमजोर तारा तुटून झालेल्या अपघातात अनेक शेतकऱ्यांनी आपले प्राण गमावले आहेत. ज्या वेळेला विजेची गरज असते तेव्हा नेमके वीज मिळत नाही व पिकांचे नुकसान होते त्याची भरपाई देण्याची काहीच व्यवस्था नाही. शेतात नवीन लाइन टाकताना शेतकऱ्याकडून पूर्ण पैसे घेतले जातात मात्र सरकार कडून मिळणारी सबसिडी कर्मचारी व कंत्राटदार संगनमताने लाटतात. अनेक प्रभावशाली व्यक्तींनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून अनधिकृत लाइन ओढल्या आहेत, जादा क्षमतेचे रोहित्र बसविले आहेत. या कारणांनी वीज कंपनी तोट्यात आहे.

एकूणच शेतकरी वीज कंपनीचे देणे लागत नाही व कंपनीने वीज पुरवठा खंडित करण्याची मोहीम हा शेतकऱ्यावर दरोडा आहे. घरात दरोडेखोर घुसल्यावर जी वागणूक आपण दरोडेखोराला देतो तीच वागणूक वीज जोड तोडणाऱ्याला द्यावी लागेल. वीज उपकेंद्रातुन पुरवठा खंडित केल्यास पूर्ण गावाने उपकेंद्रात जाऊन बसावे व वीज कंपनीचा सर्व कारभार बंद करावा.

विजेचा प्रश्न कायमचा मिटविण्यासाठी आता वीज निर्मिती व वितरणाचेही खाजगी करण होणे आवश्यक आहे. शेतकरी वीज बिल भरण्यास तयार आहे पण ते बील भरण्याइतके पैसे त्याला शेतीतून मिळाले पाहिजे व पूर्ण दाबाचा व अखंडित वीज पुरवठा झाला पाहिजे.

पंजाब व तामिळनाडू राज्यात शेतीसाठी मोफत वीज आहे. देशातील सर्व राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात शेतीसाठी महाग वीज आहे. शेतकऱ्यावर अशा प्रकारे अत्याचार करणारे सरकार पुन्हा सत्तेत येणार नाही याची काळजी सुद्धा शेतकऱ्यांनी घेतली तरच येणारी सरकारे शेतकऱ्यांना योग्य दराने व योग्य दाबाने वीज पुरवठा करेल हे शेतकऱ्यांनी ध्यानात ठेवावे.

**अनिल घनवट**
**अध्यक्ष, शेतकरी संघटना**

## भाजप व काँग्रेस कार्यकर्त्यांचा शेतकरी संघटनेत प्रवेश

राजुरा विधानसभा क्षेत्रातील अतिदुर्गम समजल्या जाणाऱ्या जिवती तालुक्यातील अनेक गावातील भाजप व काँग्रेस च्या कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेच्या विचारावर व ॲड. वामनरावजी चटप यांच्या कणखर नेतृत्वावर विश्वास दाखवत शेतकरी संघटनेत प्रवेश केला. शेनगाव येथील महादेव मंदिराच्या प्रांगणात ॲड.वामनराव चटप माजी आमदार राजुरा, प्रभाकर दिवे, अरुण



पा. नवले, नीलकंठराव कोरांगे, कपिल इद्दे, मधुकर चिंचोलकर, अनंता येरणे, बंडू राजुरकर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी शेनगाव येथील दिनकर मेश्राम, गणेश रामचंद्र कोटाळे, वासुदेव तेलंग, ज्ञानेश्वर खन्दारे, सूर्यकांत रावणकोळे, वैजनाथ सावरगावे, दत्ता राम शिंदे, खईमभाई गुलाब साव, बालाजी जाधव, गुणवंत जागावे, सय्यद शादुल शेख सर्व भाजपाचे तर बालाजी शिवमोरे, गणपत तांदुळे, विक्की नगराळे, परमेश्वर देवकते आदी काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

मरकागोंदी येथील विष्णू गवाले, व्यंकटि गायकवाड, रामा बेळे, सय्यद लैला इसुब, शेख मेहबूब भाई, रामा कांबळे, व्यंकटि चांदे आदींनी प्रवेश घेतला.

राहापल्ली येथील देवीदास कांबळे , भोक्सापुर येथील एकनाथ गजबे, आम्बेझरी येथील राजू सिडाम, जग्गू आत्राम, आनंदा आत्राम सरपंच सर्व काँग्रेस, शामराव मडावी, सोमु कोडापे, टेकाअर्जुनी येथील उमाकांत हाम्पळे, परमेश्वर वारे( भाजप), नंदप्पा येथील शेखू वेलादी, जैतु सिडाम, प्रकाश सिडाम, बापूराव फुगनर( सर्व काँग्रेस), आभंग राव महाते, अजय टेकाम, रामचंद्र कुमरे, रामकिशन कदम(सर्व भाजप), प्रकाश चटेकर, विठ्ठल जाधव, पिट्टीगुडा येथील दिगंबर जाधव, होनगाव येथील संभाजी कते, अनिल पस्तापुरे, लक्ष्मण सावरगावे आदींनी प्रवेश केला.

**(वृत्त संकलन : रत्नाकर चटप)**

# संक्षिप्त वृत्त

- नायगाव, ता. भोर, जि. पुणे येथे शेतकरी संघटनेच्या शाखेचे उद्घाटन व सभा. या प्रसंगी अनिल घनवट, अनिल चव्हाण, सीमाताई नरोडे, अभिमन्यू शेलार, शरद गद्रे, धनाजी धुमाळ, प्रकाश बढे यांची उपस्थिती. शाखा स्थापनेसाठी उपजिल्हाध्यक्ष लक्ष्मण रांजणे यांनी विशेष प्रयत्न केले.

♦ ♦ ♦

***एका माणसाने दुसऱ्यासाठी करुणेपोटी काम करावे हे दोघांनाही घातक आहे, असे मी मानतो. मी जर का सुरुवातीलाच डोळ्यातून पाण्याचे चार थेंब गाळीत मांडणी केली असती तर मला खात्री आहे मी आतापर्यंत महात्मा या पदवी पर्यंत पोहोचलो असतो, हे मी जाणीवपूर्वक टाळीत आलो...***

***दु:ख आणि यातना सोसून मी केवळ दुसऱ्याच्या भल्याकरता हे दिव्य करतो आहे असे कोणी म्हटले की माझ्या मनात भीतीच्या घंटा वाजू लागतात. असे म्हणणारा निरोगी मनाचा नाही असे मला वाटू लागते. सभेत सांगतात शरद जोशीमोठा पगार सोडून शेतकर्यांदची कीव आली म्हणून आले पण मी करुणेच्या पोटी आलेलो नाही .सत्यशोधनासाठी आलो आहे. या कामात आनंद मिळतो म्हणून काम करतो आहे. हा आनंद जोपर्यंत वाटणार आहे तोपर्यंत मी काम करणार आहे.***

**– युगात्मा शरद जोशी**


## शून्यातून विश्व

**सुशीलकुमार शिंदे –**

सोलापूरला कोर्टात शिपाई होते. कोर्टाच्या आवारात त्यांनी आयुष्याचा अर्थ शोधला. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

# ऊस परिषद, सांगली

सांगली - गुजरातमध्ये उसाला प्रती टन ४४४१ रु दर मिळत असताना महाराष्ट्रातील साखर कारखाने का कमी भाव देत आहेत, अशी विचारणा करत गुजरात पॅटर्न प्रमाणेच राज्यात देखील उसाला भाव मिळाले पाहिजेत, अशी मागणी दि. ८ नोव्हेंबरला सांगली येथील दीनानाथ नाट्यगृहात संपन्न झालेल्या ऊस परिषदेत करण्यात आली.



**परिषदेला संबोधित करताना सर्वश्री अनिल घनवट, डॉ. मानवेंद्र काचोळे, संजय कोले सुधीर बिंदू, सीमा नरोडे आणि अभिमन्यू शेलार**

# ऊस परिषद, सांगली ठराव

१) ऊस दरासंबंधी अन्य शेतकरी नेते आणि साखर कारखानदार यांचेत झालेली तडजोड अमान्य.

२) उचलीत २०० ची वाढ, मात्र अंतिम बिलास मोठी कपात अमान्य.

३) रंगराजन समितीची ऊसदराची शिफारस - साखरेच्या एकुण उत्पन्नाच्या ७५:२५ शिफारस अमान्य.

४) गुजरात राज्यातील साखर कारखाने साखर उत्पन्नाचे १०० टक्के रक्कम ऊस बिल म्हणून देतात. महाराष्ट्रातही गुजरात पद्धतीने दर ठरवावेत.

५) शेतकरी संघटनेने विरोध केलातरीही साखर कारखानदार आणि अन्य शेतकरी नेत्यांनी ७५:२५ सुत्र ऊसदर नियमक समितीच्या सुत्रात घेतले आहे हा शेतकऱ्यांचा विश्वात घात आहे. साखरेची पुर्ण रक्कम शेतकऱ्यांना मिळावी.

६) अन्य शेतकरी नेत्यांनी साखर कारखानदाराची केलेली यंदाची तडजोड अन्यायकारक आहे. केवळ स्पर्धेमुळे साखर कारखानदार खुप जास्त देता आहेत. यावरून ही तडजोड शेतकरी हिताची नाही हे स्पष्ट होते.


७) भाग विकास निधीसाठी कपाती करणे बंद करावे.

८) ऊस दर नियमक समितीमध्ये गुजरात पद्धतीने साखरेचे १०० टक्के ऊस दर देण्याचे सुत्र स्विकारले जावे. यासाठी पुढील वर्षात प्रबोधन जागर आणि आंदालनाचा मार्ग स्विकारला जाईल.

९) साखर कारखान्यांच्या वजन काट्या संबंधी संशय आहे. वजनात फेरफार करता येत नाही. अशी संगणकीय वजनकाटे व्यवस्था काही कारखान्यांनी केली आहे. ते सर्वांना सक्तीचे करावे.

१०) पुढील वर्षे शेतकरी आंदोलनाऐवजी शेतकरी प्रबोधनाचे काम करून ऊसपट्ट्यात नगर, पुणे सोबत सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यात प्रबोधन यात्रा काढून डॉ. रंगराजन समितीच्या ऊसदर शिफारशी संबंधी शेतकरी जागरण यात्रा काढली जाईल व आंदोलन केले जाईल.

♦ ♦ ♦


BSE
INVESTORS' PROTECTION FUND
Investing all your money in one source
may not reap you the ideal results.
Diversify your investments.
Diversifying your investments helps you reach your
financial goals faster by protecting you against significant losses
and increasing your chances of getting better returns.
To report any market irregularity,
call 022 22728097
THE WORLD'S FASTEST EXCHANGE WITH A SPEED OF 6 MICROSECONDS.
www.bseindia.com | Follow us on: /BSEIndia | @BSEIndia | /BSEIndia | /BSEIndia
Disclaimer: Issued in public interest by BSE investor protection fund.

# संपूर्ण कर्जमुक्तीसाठी शेतकरी संघटनेचा राज्यभर धडक मोर्चा

























शेतकऱ्यांची सरसकट संपूर्ण कर्जमुक्ती, शेतीमालाला रास्त भाव, बाजारपेठेचे स्वातंत्र्य, तंत्रज्ञान स्वातंत्र्य, शेतकरी विरोधी कायदे बदलणे इत्यादी मागण्यासंदर्भात शेतकरी संघटनेच्या वतिने दि. १ ऑगस्ट २०१७ रोजी राज्यभर धडक मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

To,

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

From :
ANGARMALA
At/Post. Arvi Chhoti-442307
Tah-Hinganghat, Dist-Wardha (MS)
Mob : 9730582004, 9730786004

अंगारमळा





आता तयार व्हावे। लढण्यास लेखणीने।। रक्षण अबोलतेचे। करण्यास लेखणीने।।
भाकड-वृथा कथांच्या। कक्षेपल्याड जावे।। अभिजात सृजनाला। पुजण्यास लेखणीने।।

## चौथे अखिल भारतीय मराठी

# शेतकरी साहित्य संमेलन, मुंबई

**दिनांक : बुधवार, ३१ जानेवारी २०१८**

**स्थळ : रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, दादर, मुंबई**

**सकाळी ८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत भरगच्च कार्यक्रम**

**संमेलनाध्यक्ष**



**डॉ. विठ्ठल वाघ**

**प्रमुख अतिथी**



**सौ. सरोज काशीकर**

**प्रमुख पाहुणे**



**रामचंद्रबापू पाटील**

**स्वागताध्यक्ष**



**अभिजित फाळके**

**कार्याध्यक्ष**



**गंगाधर मुटे**

**प्रा. कुशल मुडे** — आयोजन समिती अध्यक्ष

**प्रा. रमेश झाडे** — व्यवस्थापन समिती अध्यक्ष

**प्रा. भुपेश मुडे** — नियोजन समिती अध्यक्ष

**ॲड सतीश बोरुळकर** — सल्लागार समिती अध्यक्ष

**जनार्दन म्हात्रे** — स्वागत समिती अध्यक्ष

**कार्यक्रमाची रुपरेषा**

सकाळी ०८.०० ते ९.०० : अल्पोपहार व चहापान
सकाळी ०९.०० ते ९.३० : प्रतिनिधी नोंदणी

**सत्र-१ :**
सकाळी ०९.३० ते १२.०० : उद्घाटन सत्र
मराठी गौरवगीत, दीपप्रज्वलन, शेतकरी नमनगीत, उद्घाटन आणि स्वागत समारोह

**सत्र-२ :**
दुपारी १२.०० ते ०१.३० : शेतकरी कवी संमेलन
दुपारी ०१.३० ते ०२.३० : मध्यावकाश (स्नेहभोजन)

**सत्र-३ :**
दुपारी ०२.३० ते ०४.०० : परिसंवाद-१
विषय : आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासकीय धोरण

**सत्र-४ :**
दुपारी ०४.०० ते ०४.५० : परिसंवाद-२
विषय : स्वामिनाथन आयोग : शेतीला तारक की मारक?
सायं. ०४.५० ते ०५.०० : मध्यावकाश (चहापान)

**सत्र-५ :**
सायं. ०५.०० ते ०६.३० : शेतकरी गझल मुशायरा

**सत्र-६ :**
सायं. ०६.३० ते ०८.०० : परिसंवाद-३
विषय : शेतकरी विरोधी कायद्याचे जंगल

**सत्र-७ :**
रात्री ०८.०० ते १०.०० : समारोपीय सत्र आणि पुरस्कार वितरण
विषय : सावध: ऐका पुढल्या हाका
रात्री १०.०० ते १०.३० : स्नेहभोजन